साप्ताहिक
# माणूस

७ जानेवारी ८४/ दोन रुपये.

## मुक्काम मिरज



## अरबी फासात अडकलेल्या निरपराध मुली!

## 1984 ऑरवेलची एक राजकीय विद्रोही कृती

## ३१ डिसेंबरची रात्र

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : तेविसावे

अंक : बत्तिसावा

□

७ जानेवारी १९८४

किमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेघा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार १

माणूस

### जागतिक संघ असा हवा

□ आपल्या २४ डिसेंबरच्या अंकातील श्री. चंद्रशेखर संत ह्यांनी जून ८३ च्या विश्वचषकस्पर्धेतील कामगिरीच्या आधारावर एक दिवसाच्या मर्यादित षटकांच्या सामन्यासाठी निवडलेला जागतिक संघ वाचून आश्चर्य वाटले, ते त्यात सुनील गावस्कर आणि मोहिंदर अमरनाथची नावे पाहून. तसेच फलंदाजीच्या क्रमामध्ये सुद्धा माझ्या मते थोडासा बदल आवश्यक आहे. जर जून ८३ च्या विश्वचषकस्पर्धेतील कामगिरीचाच फक्त आधार घेतला तर जागतिक संघ असा असावा—(फलंदाजीच्या क्रमानुसार) गॉर्डन ग्रीनिज, ग्रीम फाउलर, व्हिव्हीयन रिचर्डस्, डेव्हिड गॉवर, इम्रान खान (उपकप्तान) क्लाइव्ह लॉइड (कप्तान) कपिल देव, श्याम बोथम, रिचर्ड हॅडली, सैय्यद किरमाणी (यष्टिरक्षक) आणि मायकेल होल्डिंग. बारावा खेळाडू-अगस्टिन लोगी. खालील आकडे माझ्या संघाला पुष्टी देतील. ह्या स्पर्धेत संबंधित खेळाडूंच्या धावा अशा—गावस्कर ५९ तर फाउलर ३६१ (४ अर्धशतके), मोहिंदर २३७ तर गॉवर ३८४ (एक शतक) नंतरच्या फलंदाजांमध्ये इम्राननी २८३, कपिलनी ३०३, लॉइडनी ११२ तर बॉथमनी ३८ धावा काढल्या. ह्या संघात बारावा खेळाडू म्हणून अगस्टिन लोगीचे नाव पाहून बऱ्याच जणांना आश्चर्य वाटणं साहजिकच आहे; पण त्यानी ह्या स्पर्धेत सर्वोत्तम क्षेत्ररक्षण केले आणि बाराव्या खेळाडूचे काम त्याहून वेगळे काहीच नसते.

श्री. अशोक पानवलकर ह्यांच्या 'भारताच्या नावावरील काही अनोखे जागतिक विक्रम' ह्या मथळ्याखाली एक माहिती चुकीची आहे. एका डावात यष्टिरक्षकांनी घेतलेल्या सर्वात जास्त बळींचा विक्रम किरमाणीच्या नावावर नसून इंग्लंडच्या बॉब टेलर आणि पाकिस्तानच्या वासिम बारीच्या नावावर आहे. दोघांनीही एका डावात सात बळी नोंदवण्याचा पराक्रम केला आहे. बारींनी न्यूझीलंड विरुद्ध तर टेलरनी खुद्द भारताविरुद्ध १९८० मधील मुंबईच्या सुवर्ण महोत्सवी सामन्यात. दुसरं म्हणजे विजय हजारे आणि गुल मोहम्मद ह्यांचा ५७७ धावांचा भागीदारीचा विक्रम प्रथम श्रेणी सामन्यात फक्त चौथ्या विकेटसाठीच नसून कोणत्याही विकेटसाठी आहे. अजून एक गोष्ट म्हणजे त्यांनी जे विक्रम नमूद केलेले आहेत त्यात अनोखे म्हणण्यासारखे काहीच नाही.

२६ डिसेंबर ८३ — मिलिंद गोखले, औरंगाबाद

□ सुनील गावस्करवर नेहमी टीका होते (विशेषत: बंगलोरमधून) की त्याच्या खेळाचा भारताचा विजय होताना काहीच वाटा नसतो. श्री. किरण गोखले याचा नक्की मागोवा घेऊ शकतील का ? मला वाटते की, गावस्करच्या आतापर्यंतच्या ९८ सामन्यात भारताचे १८ विजय झाले, भारताने २९ सामने गमावले आणि उरलेले ५१ अनिर्णित राहिले. गोखल्यांकडून अपेक्षित येवढेच आहे की, त्यांनी गावस्करच्या आतापर्यंतच्या (म्हणजे कलकत्ता कसोटीवरून) कसोटीं-मधील कामगिरीचा पूर्ण आढावा घ्यावा म्हणजे प्रत्येक कसोटीतील गावस्करच्या धावा सामना आपण जिंकला का हरलो का अनिर्णित राहिला आणि गावस्कर त्याला किती जबाबदार आहे ? किंवा श्री. अशोक पानवलकर हे काम करू शकतील का ?

२४ डिसेंबर ८३ — श्री. आ. श्रोत्री, धारवाड

¤ मी आपले १० व १७ डिसेंबरचे दोन्ही पर्यावरण विशेषांक वाचले. खरो-खरच दोन्ही अंक संग्राह्य आहेत. मी आपल्या साप्ताहिकाचा नियमित वाचक नव्हतो परतु या दोन्ही अंकांपासून मी आपल्या साप्ताहिकाचा नियमीत वाचक झालेलो आहे. आजच्या परिस्थितीत पर्या-वरणाचे संतुलन हे दिवसेंदिवस बिघडत चालले आहे व जंगलावर चोहोबाजूनी आक्रमण होत आहे व हेच पर्यावरण सतुलन बिघडण्याचे मुख्य एक कारण आहे आपल्या अंकातील सर्वच लेख उत्कृष्ट होते. त्यातल्या त्यात माधव गाडगीळ, कुसुम कर्णिक, प्रा. सुरेन्द्र गजेंद्रगडकर, अ. रा. बापट आणि जगदीश गोडबोले याचे लेख मला फार आवडले. हा अंक घडवण्यात आपल्याला ज्याचे सहकार्य लाभले ते श्री. जगदीश गोडबोले याच्या कार्याने मी फार प्रभावित झालो आहे. व त्याच्या कार्यासंबंधी मला जास्त माहिती जाणून घेण्याची इच्छा आहे.

मी एक निसर्गप्रेमी खेडूत तरुण आहे. मला वनसवर्धनाविषयी फार तळमळ आणि आवड आहे. जर मला श्री. गोडबोले याच्या बरोबर पवनाधरण पाणलोटक्षेत्रात वणी-करण - कार्यक्रमात काम करण्याची सधी मिळाली तर ते मी माझे भाग्य समजेन.

२१ डिसेंबर ८३ प्र. रा. पाटील
सारोळा

¤ पत्र खूपच उशीरा! माणूस दिवाळी अंक वाचून हातावेगळा यापूर्वीच केला. गेले काही दिवस त्यातील दोन लेखाबद्दल खूप चिंतन केले. प्रस्तुत लेख निरनिराळया 'अँगल'नी वाचले, न्याहाळले. (थोडीफार पारायणेच!)

'श्रीकृष्ण एक मोठे स्वप्न' श्री. श. शं. कुलकर्णी यांचा लेख आवडला. श्रीकृष्णा-बद्दल खूपच वाचले वाचतही आहे. श्री. कुलकर्णी यांचा लेखामागील Aspect खूप बोलका तितकाच नाविन्यपूर्ण वाटला त्याना धन्यवाद कळवावेत! 'माणूस'ने त्याचे असेच व इतरही लेखन प्रसिद्ध करावे.

आधुनिक जीवनातील अपरिहार्य विचार घटक 'लग्न आणि सहजीवन' परस्परनाते, परस्परविरोध यावर शोभा भागवत यांनी अचूक बोट ठेवले आहे. वैवाहिक जीवना-नतर असंख्य सुशिक्षित स्त्री - पुरुषाच्यात निर्माण होणारे distance त्याची कारण-मीमांसा व त्याचे rational विश्लेषण खूपच अतर्मुख करणारे! त्याना हार्दिक धन्यवाद!

या लेखकाचे पत्ते कळविल्यास काही शका, जिज्ञासा विचारता येतील!

अर्थात या प्रसिद्धीमागील प्रेरणा तुमची म्हणून सारे श्रेय तुमचे! त्याबद्दल 'माणूस'चे व आपले अभिनंदन!

३१ डिसेंबर ८३ राजाभाऊ ताम्हनकर
सागली

# आक्रोश!

मिरजेतल्या वॉन्लेसवाडी इथल्या कुष्ठरोगी आणि अपगासाठी चालवलेल्या सर विल्यम वॉलनेस चेस हॉस्पिटल या संस्थेवर मागच्या वर्षी 'माणूस'मध्ये 'अजून लढा संप-लेला नाही' हा लेख प्रसिद्ध झाला होता. 'माणूस'चे प्रतिनिधी सुभाष काळे त्या विष-यानिमित्त १०–१५ दिवस मिरज–सांगली भागात राहिले होते. तिकडून ते आले त्याच वेळी मिरजेतल्या अरबग्रस्त वातावरणाचा ठसा त्याच्या बोलण्यात होता. मधे काही दिवस गेले. मिरजेतल्या या अरब–प्रश्नावर सविस्तर वृत्तांत देण्याची कल्पना निश्चित झाली आणि पुन्हा एकदा काळे मिरजेत जाऊन धडकले.

अरबाचा प्रश्न अजून तरी स्थानिक म्हणूनच ओळखला जातो. सागली, कोल्हा-पूर, इचलकरंजी भागामध्ये या रोगाचं गांभीर्य ओळखून आधीच प्रतिबंधक लशी टोचून घेतल्या आहेत. त्यामुळे अरबाचं पाऊल त्या गावात अजून तरी पडलेलं नाही. मिरजेतल्यासुद्धा काही भागातच अरबाचं वास्तव्य. बाहेरून जाणाऱ्याला हे लोक दिसणार नाहीत. मग एकाच वस्तीत एकवटलेले हे लोक एवढा काय धुमाकूळ घालताहेत? जसजशी माहिती मिळत गेली तेव्हा यामागची आखीव यंत्रणा दिसायला लागली. भ्रष्ट यत्रणा समोर यायला लागली. सगळयात मोठ सावट पडलं आहे ते अल्पवयीन मुलींवर!

¤

याच कामासाठी काळे पुन्हा मिरज–इचलकरंजी भागात गेले होते. ते पुण्यात परत आले एक प्रश्नचिन्ह घेऊनच. त्याच्याबरोबर अरबांकडे स्वयंपाकीण–तब्बक–म्हणून काम करणारी एक मुलगी होती. तिच्यावर त्या अरबानी बलात्कार केला होता. ही माहिती प्रथम काळेंनी फोनवर सागितली आणि 'मी तिला घेऊन 'माणूस' ऑफिसमध्ये येतो आहे' असं सांगितलं तेव्हा क्षणभर सुन्नच झाले. तिच्यावरच्या बलात्काराची बातमी तिनं काही 'हिंदू एकता'च्या कार्यकर्त्यांच्या आधाराने पोलीसचौकीत माडली होती आणि मिरजेतल्या स्थानिक दैनिकात– 'प्रतिध्वनी'त त्याच्यावरची मोठी ठळक बातमी प्रसिद्ध झाली होती. अशा पार्श्व-भूमीवर त्या मुलीशी या विषयावर कसं बोलायचं याबद्दल थोडी गोंधळात पडले होते.

काळे तिला घेऊन आले. ती अगदी शांत वाटली. उद्ध्वस्ततेच्या कोणत्याही खुणा तिच्या चेहऱ्यावर नव्हत्या. शांतपणे तिनं बलात्काराच्या वेळी तिथं कोण होतं, फोटो कोणी काढले ते सागितलं. पोलीसस्टेशनमध्ये इन्स्पेक्टर तिच्याबरोबरच्या कार्यकर्त्यांना म्हणाले, 'तिच्या काय मागे लागता? ती तर वेश्या आहे!' हेही तिनं त्याच शातपणे सागितलं.

कोल्हापूर–सांगली भागात या विषयाच्या संदर्भात पत्रकारपरिषद घ्यायची होती; पण त्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. 'प्रतिध्वनी'चे संपादक आणि बलात्कारित मुलगी याच्या जिवाला धोका आहे, अशी कुणकुण लागल्यामुळे काळे तिला घेऊन पुण्यात आले.

दुपारी १२॥ वाजता ती 'माणूस' ऑफिसमध्ये आली. बलात्काराचा गुन्हा स्वतःच्या तोंडाने सांगणाऱ्या या मुलीची हकीकत आणखी लोकापर्यंत पोचावी आणि या प्रश्नाकडं थोडं लक्ष वेधलं जावं, या हेतूनं सकाळ, केसरी, तरुण भारत, मनोहर, स्त्री आणि दोन वृत्तसंस्थांना फोन केले.

'तरुण भारत' आणि यु. एन. आय. चे

प्रतिनिधी या परिषदेला आले. पुन्हा एकदा त्याच अलिप्तपणानं तिनं सर्व माहिती सांगितली. या मुलीच्या नवऱ्यानं दुसरं लग्न केलं आहे. आई आणि लहान भावासाठी ३।४ वर्षं ही तव्बकचं काम करते आहे. एजंट बोलवायला आला की या मुली कामावर जातात. यापूर्वी असा–बलात्काराचा अनुभव आला नसल्याचं तिनं सांगितलं.

दुसऱ्या दिवशी 'तरुण भारत'ने ही बातमी पहिल्या पानावर सविस्तर छापली.

¤

खरं तर बलात्कारासारखा उध्वस्त करणारा अनुभव त्या मुलीला आला. अशा अनेक मुलींवर ही वेळ येतेय. मग काही मर्यादित कार्यकर्ते सोडले तर याविरुद्ध सार्वत्रिक जागृती का नाही होऊ शकत ?


पैसा फेकल्यामुळे येणारा कोडगेपणा याला कारण आहे असं वाटतं. यंत्रणा आणि इथले रहिवासी, दोघांची ही स्थिती. प्रथम जबरदस्तीनं आणि नंतर पैशाची गरज म्हणून काही मुली हे काम बिनबोभाट करत आहेत. त्यामुळं तुमच्या–आमच्यासारख्यांना चीड येऊन धुमसून काही होईल का ? ज्यांच्यामध्ये ही चीड उफाळून यायला हवी त्या निरपराध मुलीच आज मुक्या झाल्या आहेत !

ती मुलगी भेटून गेल्यावर 'आक्रोश' सिनेमा पाहिला होता त्याची आठवण झाली. सिनेमात आवाज उठवणारा आक्रोश वकिलाने करायचा प्रयत्न केला होता. मिरजेतल्या मुलींच्या विरुद्ध काही कार्यकर्ते हा 'आक्रोश' करत आहेत त्यांना आपण पाठिंबा द्यायला हवा. स्त्री–अत्याचार आणि अन्यायविरोधी काम करणाऱ्या संघटनांनी आणि स्त्रियांसाठी वाहिलेल्या नियतकालिकांनी त्यांचा आवाज उचलून धरायला हवा. कारण जाती–धर्मांच्या पलीकडच्या निरपराध मुली त्याला बळी जात आहेत !

¤

अरबांची लागण फक्त मिरजेतच नाही. ती मुंबईतही झाली आहे. जे आज मिरजेत घडत आहे तेच मुंबईतही आहे. निष्काळजी राहिलो तर हे कुठेही घडू शकतं. तेव्हा वेळीच सावध व्हायला हवं. हा प्रश्न स्थानिक म्हणून सोडून देणं म्हणूनच चुकीचं आहे. आज अरब, उद्या पैशांच्या जोरावर माजलेला कोणताही घटक हे करू शकेल ! भारतातसुद्धा काही गोष्टी किमती असतात आणि नैतिक मूल्य म्हणून त्या जपल्या जातात ते अशा लोकांना आपण शिकवलं पाहिजे.

—मेधा राजहंस




## □ नववर्ष, अर्धसत्य, दादा

नवं वर्ष उजाडलंय म्हणतात. आपल्याला नाही बुवा खरं वाटत. अजून नव्या वर्षाची डायरी नाही, की कॅलेंडर नाही. नवं वर्ष कसं समजायचं ? अगदी एअर–इंडिया अन एशियन पेंटस्चं नको; पण किमानपक्षी डोंगरे बालामृतचं तरी नको का एखादं कॅलेंडर ? त्यामुळं नवं वर्ष लागून तब्बल आठवडा उलटत आला तरी आम्ही या कॅलेंडरपायी किंचित सचिंत झालो आहोत.

आता तुम्ही म्हणाल चिंता कसली करताय, चिंतेनं काही होत नाही. अहो, हे आम्हाला समजतंय; पण या मनमोहन देसायांना कोण समजावणार ? 'कुली' पेक्षा 'अर्धसत्य' दणक्यात चाललाय म्हणून देसाई चिंताकुल झाले आहेत. अन् नेमक्या ह्याच कारणासाठी गोविंद निहलानीही चिंताग्रस्त आहेत. 'अर्धसत्य' इतका कलात्मक, हळुवार, संवेदनाक्षम आर्ट–पिक्चर, इतका तडाखेबाज धंदा करायला लागला तर आर्ट-फिल्म्सचं भविष्य चिंताजनक व्हायला फारसा वेळ लागणार नाही. हो की नाही हो स्मिताताई ?

तिकडे वसंतदादा वेगळ्याच चिंतेत आहेत. हा महिना जानेवारीचा आहे ना म्हणून चिंता. अंतुले जानेवारीतच गेले ! भोसल्यांचीही कन्नी गेल्या जानेवारीतच कापली गेली. तेव्हा आता या महिन्यात काय होते म्हणून चिंता !

## □ थंडी रंगतेय दुर्गाबाई !

नाही नाही म्हणता मुंबईत थंडी चांगलीच रंगतेय. त्यामुळे मुंबईत कोणताच मोसम जमून येत नाही, असं म्हणणाऱ्यांचं तोंड गप्प झालं आहे. तरी दुर्गाबाई भागवत नेहमी मुंबईच्या हवामानाविषयी, फुलांविषयी, पक्ष्यांविषयी (पक्षी : कावळे) किती ठणकावून सांगत असतात. पण बाईचं कोणी मुळी ऐकतच नाही. (म्हणून दुर्गाबाई हल्ली आपली मतं लिहून, पोस्टानं वर्तमानपत्रांना पाठवतात. मग ही मतं छापून येतात. अन् म्हणून वाचक ती वाचत असावेत असा तर्क लढवायला हरकत नाही.)

आता, मुंबईचं हवापाणी सुधारलंय म्हणून लोकांचा लोंढा आणखी वाढू देऊ नको. त्या दुर्गाबाईंना मग पुन्हा आपली मतं ठणकावून वगैरे मांडावी लागतील.

## □ क्रांती

माओलाही स्वर्गात गहिवरून यावं इतकी भन्नाट, सांस्कृतिक क्रांती सध्या मुंबईत चालू आहे. वरचेवर गाण्या–बजावण्याचे कार्यक्रम काय, उद्घाटनं, भाषणं, प्रदर्शनं, काय काय अन् किती किती !

मल्लिकार्जुन मन्सूर, भीमसेन, किशोरीबाई यांचे जलसे भुरळ पाडणारे असे होते. खास करून एनसीपीएमध्ये मन्सूरअण्णांनी गायलेल्या लाचारी तोडीतलं सुरेल आर्जव वेड लावणारं होतं.

हॅण्डलूमची आणि क्राफ्टबोर्डची प्रदर्शनं सुरू आहेत. त्यांना बऱ्यापैकी गर्दी आहे. राज्यनाटयस्पर्धेचा उरूस आहेच. हिंदीचं समकालीन साहित्यसंमेलन पार पडलं.

मध्ये राष्ट्रपती येऊन गेले. पंजाबी बुद्धिवंतांच्या सभेला खास हजर होते. सगळेच पंजाबी एकत्र आल्याने पत्रकारमंडळी उत्साहानं हजर राहिली. राष्ट्रपतींसकट सगळेच पंजाबीत बोलले. त्यामुळे पत्रकारांचे मात्र बारा वाजले !

### □ खून–पसीना

डिसेंबरातील थडीपेक्षाही फेब्रुवारीतील महापालिका–निवडणुकांमुळे नगरसेवकांना खरी हुडहुडी भरून आलेली आहे. एकमेकांशी भांडताभांडता पाच वर्षे कशी गेली ह्याचा पुलोदच्या नगरपित्यांना पत्ताच लागला नाही आणि आता तर निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेल्या !

तरीही अजून आशेला जागा आहे. नागपूरच्या विधानसभेत निवडणुकीच्या तारखेबद्दल उलटसुलट विधाने करून रामराव आदिकांनी गोंधळ उडवून दिला आणि ती बातमी येथे पोहोचताच नगरसेवकांनी महापौर बेदी ह्यांच्या अध्यक्षतेखाली भांगडानृत्य सुरू केले !

माजी महापौर मेमन ह्यांनी भाषणात काँग्रेसच्या नगरसेवकांची इमानी कुत्र्याशी तुलना केली. कुणी 'अरे' म्हटल्यावर 'का रे' म्हटले नाही तर ते नगरसेवक कसले ? काँग्रेस आयच्या रामचरित सींग यांनी 'जो खुद कुत्ते होते है वोही दूसरोंको कुत्ते कहते हैं।' असे मेमनना सुनावले. यावर जनता पार्टीच्या शरद रावांनी सिंगना यू. पी. वाल्यांवरून छेडलेच.

मागे एकदा 'खून पसीना' हा हिंदी चित्रपट अर्धवट सोडून आम्ही महापालिकेच्या सभागृहात येऊन बसलो. तीन तास ह्या सभागृहात बसण्यासारखी करमणूक दुसरी नाही !

असो. पण ह्या निवडणुकांचे काही खरे नाही. जानेवारी २३ ला एकदा कमिशनरांनी निवडणुकांची निश्चित तारीख जाहीर केली तरच हा वाद थांबेल.

ह्या अनिश्चिततेमुळे पुलोदमधील पक्षांची अजून बोलणी सुरू झालेली नाहीत; पण तरीही आपली 'युती' झाल्याखेरीज निवडणुकांत आपली धडगत नाही हे ह्या पक्षांना कळून चुकले आहे. ह्या वेळेस शिवसेनेलाही पुलोदमध्ये घेण्याची सूचना आहे. या निवडणुकांत प्रथमच डॉ. दत्ता सामंतांची पार्टी उतरली आहे. सामंतांनी आधीच आपण आपल्या ताकदीवर १०० जागा लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. नाही तरी सामंत सर्वच गोष्टी ताकदीवर करीत असतात ! सामंत आणि भाजप–शिवसेना ह्यांच्यामधून विस्तवही जात नसल्याने सामंतांचा पुलोदशी कोणत्याही प्रकारचा समझोता होणे शक्य दिसत नाही.

### □ पहाटेचं स्वप्न

राजकीय पक्षांचा हा असा घोळ चालू असताना द. म. सुखटणकर आणि जुलीओ रिबेरीओ ह्या संताजी–धनाजीच्या जोडीने मुंबापुरीतील फेरीवाले आणि झोपडपट्टीतील रहिवासी ह्यांच्या गोटात हलकल्लोळ उडवून दिला आहे. फाउंटनमधील फेरीवाल्यांना तर पाण्यात सुखटणकर आणि रिबेरीओ दिसतात असे ऐकले आहे !

निवडणुका अशा ऐन तोंडावर आल्या असताना महापालिका आणि पोलीसआयुक्तांनी रस्ते आणि फुटपाथ अडविणाऱ्या ह्या गरीब बिचाऱ्या लोकांचा छळ सुरू केल्यामुळे काँग्रेस आय. मोठ्या अडचणीत आलेली आहे. भाऊराव पाटील ह्यांच्या नेतृत्वाखाली तर काही आमदारांनी सुखटणकर आणि रिबेरीओ हटाव अशी मोहीम उघडली आहे. त्यांना रामराव आदिकांचा आशीर्वाद आहे असे म्हणतात.

येथे सुखटणकरांनाही मुंबई महानगरपालिकेचे दोन भाग पडले असून आदिकांनी आपल्याखेरीज दोन अॅडिशनल कमिशनर्स नेमले असल्याचे विचित्र स्वप्न पडले ! आता पत्रकारांपुढे जरी त्यांनी आपला स्वप्नांवर विश्वास नसल्याचे सांगितले तरी पहाटे पडलेली स्वप्ने खरी ठरतात असे म्हणतात.

□

एक जानेवारी पासून बेस्ट बसेसमध्ये सुटया पैशांऐवजी कुपनस् घेण्यास सुरुवात होणार आहे. मुंबापुरीतील बऱ्याचशा हॉटेलातही कुपनांची सोय आहे. आता वेस्टर्न आणि सेंट्रल रेल्वेनेही कुपने द्यायला सुरुवात केल्यावर बेलार्ड पिअरच्या टाकसाळीत नाण्यांऐवजी कुपनेच छापायला हरकत नाही.


□

'ग्रंथाली'च्या मंचावर गेल्या रविवारी अंतुले-शरद पवार एकत्र आले. त्यामुळे एक बरं झालं. महाराष्ट्रात राजकीय ध्रुवकरणाची प्रक्रिया सुरू होणार असं लिहिण्यास राजकीय निरीक्षक मोकळे झाले.

आता अंतुले शत्रुपक्षावर कसा वेगवेगळ्या पद्धतीने हमला करतात त्याची प्रात्यक्षिकं 'ग्रंथाली'ने सादर करावीत. 'एल्गार' हे नाव या कार्यक्रमाला छान शोभेल !

—विष्णू जयदेव






# ३१ डिसेंबरची रात्र....मुंबई

¤

३१ डिसेंबरची रात्र म्हणजे
सारी ' जुनेरं ' टाकून
नव्याची गुढी उभारण्याची रात्र...
सरत्या वर्षाला ' ओल्ड मॅन ' ठरवून
इतिहासजमा करण्याची रात्र.

¤




¤

एरवीच्या एकसुरी
आयुष्याच्या डोक्यावर
नव्या वर्षाच्या सुखद चाहुलीने
पिसांच्या रंगीत टोप्या
पिसारतात...

¤


गेटवेजवळच्या अथांग सागरतिरी माणकांचा हा महासागर स्वतःचे चेहरे विसरून एकमेकात घुलमिलून जातो...लाटांसारखा.



□

ठीक बाराच्या ठोक्याला किनारा उजळतो आणि 'हॅपी न्यू इयर' असे एकामागोमाग शब्द भिडत जातात व शब्दांच्या या उल्हसित लाटांवर स्वार होऊन नवं वर्ष शहर काबीज करतं.

□





□

आणि झुंडीच्या झुंडीनं गतवर्षीची 'टूर' संपवून नव्या वर्षाची 'टूर' त्याच 'हाउसफुल्ल' उत्साहाने सुरू होते.

□

छायाचित्रे : विद्या कुलकर्णी

# ती थंडी, तो उत्साह, तो रोमांच...दुधारी

मुंबईला तिन्ही बाजूंनी समुद्राने वेढलंय. आता तर मुबईच्या जमिनीवरही एक लोंढा वाहतोय. अगदी अखंडित. शेकडो प्रवाह असलेला हा लोंढा ' कॉस्मॉपॉलिटिन कल्चर ' नावाने ओळखला जातो. त्यामुळे पाणी आणि मुबई यांना एक समान प्रश्न नेहमी विचारला जातो.

...तेरा रंग कैसा ?

आणि त्याचं उत्तरही तेच असतं,... जिसमे मिलाए लगे उस जैसा ! त्यामुळंच गणपती असो, नवरात्र असो, ईद असो की ख्रिसमस मुंबई फेस्टिवल फीवरने ताबडतोब तापते !

३१ डिसेंबरची रात्र ही सुद्धा अशीच तापणारी रात्र. तिची सुरुवात २५ तारखेपासूनच होते.

रस्त्यावर नव्या कपड्यातले ख्रिस्ती जथे दिसू लागतात. पांढऱ्याशुभ्र चांदण्या इमारतीवर लटकतात आणि ईश्वराचा पुत्र पृथ्वीवर अवतरल्याची वर्दी देतात... यानंतर १ तारखेपर्यंतचे चार दिवस सारे ख्रिस्ती बांधव खाऊन–पिऊन मजेत घालवतात. मुंबईच्या गर्दीनं मात्र ' पिऊन'चं महत्त्वच जास्त ओळखलं आणि नव्या वर्षाचं स्वागत करायचं तर ' सिलेब्रेट ' करूनच करायचं अशी काहीशी ' पॉश ' समजूत वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत पसरत गेली आणि प्रत्येक वर्ग आपापल्या परीने नववर्षाचं स्वागत करू लागला.

श्रीमंतीत लोळणारा वर्ग पंचतारांकित हॉटेलाच्या जाहिरातींना चाळण मारून ' टॉप ' हॉटेलात रात्र बुक करतात. उच्च मध्यमवर्गीय बार, रेस्टॉरंटमध्ये सिलेब्रेट करतात... नंतरची लोक आणि त्याही खालचे सर्व गेट वेसमोर अथांग सागराच्या साक्षीने ' हॅप्पी न्यू इयर ' करतात...

जशी जशी मुबईची सुबत्ता वाढतेय तसतशी मुबईची गर्दी आत्मकेंद्रित होत चाललीय, याचा प्रत्यय ३१ डिसेंबरच्या रात्री आला.

३१ डिसेंबरची रात्र म्हणजे गेटवेला जाऊन नव्या वर्षाचे स्वागत करण्याची रात्र. अगदी सहकुटुंब, मित्र परिवारासह; पण आता परिस्थिती झपाट्यानं बदलतेय. वरचा वर्ग पंचतारांकित स्टेटसनं ही रात्र काचबंद रूममध्ये घालवतो. मध्यमवर्गीय घरातल्या दूरदर्शनने त्याना गेटवेच्या किनाऱ्यापासून ' दूर ' नेलय. काही मध्यरात्रीच्या नाटक/ऑर्केस्ट्राच्या खुर्चीत सुरक्षित.

आता गेटवेच्या किनाऱ्यावर आढळणारी गर्दी अनौरस आहे. तिला कुठलाच सुसंस्कृत चेहरा नाही

ही गर्दी धक्काबुक्कीची आहे. थर्डक्लास शराबीची आहे. एखाद्या पाकिटमारची आणि बीभत्स/किळसवाण्या अंगविक्षेपाची आहे. ही गर्दी आता बकासुरी आहे. तिला भूख आहे पैशाची, मौजेची, बाईची, बाटलीची...

खा, प्या, मजा करा. मजा नाही आली तर ती ' लुटून ' आणा. नव्या वर्षाच्या स्वागतापेक्षा गेल्या वर्षातलं जे जे गमावलं ते हडप करता येईल का ? असल्या अधाशीपणाची ही गर्दी आहे.

एकीकडे माणसातल्या स्थित्यंतरांचे पडसाद तर दुसरीकडे विद्युतरोषणाईची लोड शेडिंग/दुष्काळ इ. इ. मुळे झालेली काटछाट. उत्साह/आनंद याला आता सरकारमान्यता नाही. उलट वाढती बेकारी ! त्यामुळे जन्मणारी गुन्हेगारी आणि बदलती मूल्यं याना आवर कसा घालता येईल. या चिंतेत वावरणारे पोलिसांचे जागोजागचे खडे पहारे हेच सागतात की, आता शांतता आली तर याच मार्गाने येईल...

आणि तेव्हा आकाशातून आलेल्या प्रेषितांच्या स्वागतासाठी जी चादणी इथे पडेल तिच्या सोबतही एक बंदूकधारी असेल.

३१ डिसेंबरच्या रात्री आता मुंबईत उत्साह पंचतारांकित हॉटेलात विकत मिळतो. त्या हॉटेलाच्या दारावर गार्ड आहेत.

मुंबईत मध्यरात्री विकत करमणूक करता येते तिथे ब्लॅक करणारा दादा आहे. मुबईत घरबसल्या करमणूक करता येते; पण तिथे खोली अपुरी आहे किंवा फ्लॅटला अंगचंच कुलुप आहे.

मुंबईत ३१ डिसेंबरच्या रात्री तीच जुनी थडीत कापवणारी, उत्साहाने रोमाच आणणारी, नव्या वर्षाची लाट आहे; पण आता फक्त ती थंडी, तो उत्साह, तो रोमांच दुधारी आहे !

–संजय पवार

## ‘ फिल्मोत्सव ’ – १९८४

# आंतरराष्ट्रीय चित्रपटांची फिरती सर्कस मुंबईत दाखल

‘ फिल्मोत्सव ’ म्हटलं की, ज्या शहरात तो असेल त्या शहराची हवाच बदलते. ‘ फिल्मोनिया ’ नावाच्या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो आणि मग तापात बडबडतात तसे लोक ‘ फिल्मोत्सवा ’ बाबत उलट–सुलट बडबडू लागतात. विदेशी पाहुण्याचे आगत–स्वागत, त्यांची स्फोटक विधाने, समीक्षकाचे टीकास्त्र, पैशाची उधळपट्टी होत असल्याचा काही ‘ विकसनशील’वाल्यांचा इशारा, नोकरशाहीची लुडबूड व सरकारी अनागोंदी कारभारावर वर्तमानपत्रांकडून खरपूस समाचार घेतला जातो. प्रत्येक वर्षी नव्या समस्या घेऊन हा ‘ फिल्मोत्सव ’ येतो आणि निमंत्रकही या समस्याचे आपापल्यापरीने समर्थन करत दर वर्षी त्याच नेहमीच्या ‘औपचारिक हास्याने’ नव्या मंडळीचे, (बऱ्याच वेळा त्याच त्याच निवडक मंडळीचे) स्वागत करतात.

पण ‘ फिल्मोत्सव ’ एवढेच घेऊन येत नाही तर या ‘ औपचारिक हास्याला ’ प्रतिसाद देऊन प्रवेश मिळाला तर दिसतो एक जिवंत रुपेरी पडदा. त्या पडद्यावर सेकंदाला हजारो फ्रेम या वेगाने या पंधरा दिवसात देशोदेशीच्या माणसाची मानसिकता बोलकी होते. आपापले प्रांत, अभिमान; अहंकार विसरून कोणताही अडथळा, अडसर न येता दुसऱ्या देशाच्या मानवी–व्यवहारात मोकळेपणाने आपल्याला डोकावता येते. यंदा ते भाग्य मुबईकरांना लाभले आहे.

‘ फिल्मोत्सव–८४ ’ येत्या ३ जानेवारीपासून मुबईत सुरू होत आहे. गल्लाभरू सिनेमाची जननी समजल्या जाणाऱ्या मुबईत १९७६ नंतर म्हणजे सात वर्षांनी हा महोत्सव भरत आहे.

‘फिल्मोत्सव’ हा सरकारी मामला असल्यामुळे यापूर्वी कोणत्याही आंतरराष्ट्रीय फिल्म–महोत्सवाला मन मानेल तसा अगासाद्यावर खेळवण्याचा हक्क दिल्लीचाच होता आणि अद्यापही तो शाबूत आहे; पण मध्यंतरीच्या काळात कोणा एका शहाण्या–सुरत्या माणसाने ‘ फिल्मोत्सवा ’ ला वार्षिक उपक्रमाचे स्वरूप देण्याची कल्पना माडली आणि विविध भाषिक चित्रव्यवसायाची जन्मस्थाने असलेल्या मद्रास, बंगलोर, कलकत्ता आणि मुंबईत एक आड एक या पद्धतीने फिलमोत्सव दरवर्षी भरू लागला. आंतरराष्ट्रीय चित्रपटाची ‘ फिरती सर्कस ’ या चार गावाना फिरू लागली. यंदा ती मुंबईला आली आहे.

या ‘ फिरत्या सर्कस ’ चे प्रेक्षक कमी आणि टीकाकार अधिक आहेत. आमंत्रित विदेशी पाहुणे व प्रतिनिधी, मोजके चित्रसमीक्षक, वेळ असलेले चित्रव्यावसायिक व नव-सिनेमावाले, सरकारी अधिकारी व त्यांचे कुटुंबीय अशाचे हे ‘ गॅदरिंग ’ असते, अशी टीकाही केला जाते. मात्र हे चित्रपट सर्वसामान्यासाठीही काही चित्रपटगृहांत प्रदर्शित केले जातात; पण ‘ खुर्च्या दहा आणि माणसं हजार ’ अशा स्थितीत या खेळांची निम्मी तिकिट ‘ फोनवर ’ व निम्मी काळ्या बाजारात विकली जातात. तेव्हा तिकीटखिडकीवर गेलेल्या सामान्य (अर्थात आर्थिकदृष्ट्या) रसिकाला मात्र हात हलवत परतावे लागते. त्यातच दिल्ली महोत्सवाच्या वेळी या चित्रपटात ब्ल्यू फिल्मस्च्या तोडीचे प्रसंग असतात असा समज दृढ झाल्यामुळे ‘ थंडीच्या दिवसात गरम चित्रपट’ पाहण्यास थिएटरवर गर्दी ओसंडते. त्यामुळे नोकरशाहीचे कुरण बनलेले हे महोत्सव प्रायोगिकतेच्या नावाखाली अश्लील चित्रपट दाखविण्याचा सरकारी उद्योग आहे इथपासून मूठभर कलावाद्यांसाठी ५०–६० लाखाची उधळपट्टी करणारा उद्योग इथपर्यंत यावर टीका केली जाते. अल्पांशाने त्यात काहीसे तथ्य आहे.

### फेलीनी–न्हेइदा–बर्गमन

पण एवढेच नाही, या महोत्सवाच्या आयोजनाला दुसरी बाजू आहे. बोभाटा मात्र पहिल्याच बाजूचा झाला आहे. हे महोत्सव म्हणजे ‘ जगभरच्या चित्रपटाची ओळख करून घेण्याचा सोपा आणि सुलभ मार्ग ’ आहे. (अर्थात सरकारी असूनही हा मार्ग तितकासा सुलभ नाही, हे खरं ! ) १९५२ पासून आजतागायत झालेल्या १५–२० चित्रपटमहोत्सवानी अप्रत्यक्षरीत्या खूप काही दिले आहे.

एके काळी याच महोत्सवात चित्रपटातील नव–वास्तववादी परंपरेची मुहूर्तमेढ करणारे व्हिक्टोरिया डिसिल्का, रोसॉलॉनीसारखे महान दिग्दर्शक भेटले आहेत. त्यातूनच सत्यजित रे, मृणाल सेन व ऋत्विक घटकसारख्या प्रतिभावानाना प्रेरणा मिळाली आहे. पुढे हे तिघेही कलावंत विश्वविख्यात झाले.

या महोत्सवांमुळेच जपानचे कुरोसोवा, मिझिगुची, रशियाचे आयसेस्टाइन, तारकोव्हस्की, हंगेरीचा जान्स्को, फ्रान्सचे गोदार्द, प्रुफॉ, रेने, स्पेनचा ब्युनेल, इटलीचे अँतिनियोनी, पॅसोलिनी, फेलिनी, पोलंडचा झानुसी अशा मातब्बर दिग्दर्शकाचे चित्रपट आपल्या भेटीला आले. क्वचित ते स्वत.ही या महोत्सवाला उपस्थित राहिले. त्याचमुळे जागतिक चित्रपट संस्कृतीतील या अभिजात दिग्दर्शकाचा परिचय होऊ शकला. चित्रपटीय परिभाषेत ‘ त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांचा त्याच्या आत्मनिष्ठ व प्रगल्भ शैलीचा आपल्या येथील दिग्दर्शकांना अभ्यास करता आला.’ आज ज्या नव–सिनेमावाल्याचा उल्लेख होत आहे त्यातील बरेचजण याच अभिजात कलावंतांशी आपले नाते सांगत आहेत.

यंदाचा महोत्सवही काही वैशिष्टय घेऊन आला आहे. जपानचा नागासी

ओशीमा, स्वीडनचा इग्मार बर्गमन् व पोलंडचा आद्रे न्हेईदा (वाज्दा) याच्या चित्रपटाचा 'सिंहावलोकनविभाग' आहे. बा अदब, बा मुलाहिजा होशियार... अशी आरोळी ठोकण्याइतपत या तिघाचा जागतिक सिनेमावर प्रभाव आहे, दबदबा आहे आणि तिघेही आपापल्या आत्मनिर्भर, स्वतत्र व वैशिष्ट्यपूर्ण अनोख्या शैलीचे वारसदार आहेत.

ओशिमा व न्हेईदा हे आपापल्या देशाची राजकीय-सामाजिक नस जोखलेले कसबी कलावत आहेत. त्यामुळेच ते दोघे सध्या वादग्रस्त ठरले आहेत. जपानमधील विद्यार्थी चळवळीच्या काळात ज्या 'नाइट् अँड फॉग इन जपान' या चित्रपटाच्या प्रदर्शनानतर एका राजकीय नेत्यावर गोळ्या झाडण्याचा प्रयत्न झाला आणि चित्रपटाचे प्रदर्शन थांबविण्यात आले. त्या चित्रपटासह ओशिमा याचे १२ चित्रपट या विभागात दाखविले जाणार आहेत. 'इलेक्ट्रॉनिक'मध्ये अतिम शब्द ठरलेल्या जपानमधील माणसांचा विस्कटलेला सरता इतिहास उसवत नेणाऱ्या ओशिमाचे चित्रपट म्हणजे दीर्घ काल स्मरणात राहणारा एक अनुभव ठरणार आहे.

तर 'मॅन ऑफ मार्बल', 'दाँतॉं' अशा सारखे चित्रपट निर्माण करणाऱ्या आद्रे-न्हेईदा यानी आपल्या अलीकडच्या चित्रपटातून पोलंडमधील सध्याच्या राजकीय मानसिकतेवर नेमके बोट ठेवले आहे. पोलंडमधील शासकीय यंत्रणेला बोचकारे घेणाऱ्या या चित्रपटामुळे न्हेईदा त्याच्या देशात वादग्रस्त ठरले आहेत.

इग्मार बर्गमन या ना त्या निमित्ताने परिचित आहेत. 'सेव्हन्थ सील', 'दि टच' या चित्रपटाच्या या दिग्दर्शकाची बैठक काहीशी तात्त्विक व बरीचशी मानसशास्त्रीय आहे. मानवी मनाच्या 'sub-consious' मध्ये घुसून विविध परिस्थितीतील त्याचे व्यक्तिमत्त्व तपासण्याचा किचकट उद्योग हा दिग्दर्शक आपल्या चित्रपटातून सफाईने करतो. आपण निवडलेल्या कॅरेक्टरमधील 'मानसिक प्रदूषण' तो सबध चित्रपटभर उसवत असतो. त्याचा 'क्राइस् अँड व्हिस्पर' हा चित्रपट झपाटून टाकणारा आहे!

विदेशी सिंहावलोकनाबरोबरच आपल्या येथील काही दिग्दर्शकाची ओळख परदेशी पाहुण्याना व्हावी म्हणून भारतीय दिग्दर्शकाचाही सिंहावलोकन-विभाग आहे. गेल्या वर्षापासून ही एक चागली पद्धत अमलात आणली आहे. साहित्य व सिनेमा याच्यात जवळीक निर्माण करून मराठीत सामाजिक विडबनात्मक सिनेमा आणणारे मास्टर विनायक, पौराणिक पटाची निर्मिती करणारे व ज्यानी 'चद्रलेखा' द्वारे दक्षिणेकडील चित्रपटाना हिंदीच्या बाजारपेठेचे दरवाजे खुले केले ते एस. एस.वासन, सैगलच्या 'देवदास'ने वेड लावले त्याचे दिग्दर्शक पी. सी. बरुआ, आपल्या कारकीर्दीतच आख्यायिका बनलेला संवेदनशील कलावंत गुरुदत्त आणि मल्याळी चित्रपटाचा सत्यजित रे म्हणून ज्याचा अभिमानाने उल्लेख केला जातो ते रामू करियट या पाचजणाचे मोजके निवडक चित्रपट या विभागात दाखविले जाणार आहेत. बहुभाषिक चित्रनिर्मिती करणाऱ्या आपल्या देशातील हिंदी, मराठी, बंगाली,' तामीळ व मल्याळी या पाच प्रमुख चित्रव्यवसायाचे प्रतिनिधित्व या विभागात कुशलतेने साधले आहे. शिवाय १९३५ ते १९६५ या काळातील हे दिग्दर्शक असून त्या काळावर एक धावती नजर फिरविता येईल. सैगल, मीनाक्षी, गुरुदत्त आठवतील, तर 'मि. संपत' मधील मोतीलाल दीर्घकाळानंतर पुन्हा पाहायला मिळेल.

## रसिकांनो, तयारीत रहा!

याच विभागाला जोडून असलेल्या लघुचित्रपटाच्या विभागात २१ लघुचित्रपट व वृत्तचित्रे दाखविण्यात येणार आहेत. त्यात 'चक्कर चदूका चमेलीवाला', 'अण्टार्क्टिका', 'अब्दुलकलाम आझाद' व 'वीर सावरकर' हे दोन राजकीय नेत्यांवरील लघुपट विशेष लक्ष वेधून घेणार आहेत.

अर्थात या सर्वांहून महत्त्वाचा असा 'माहितीविभाग' आहे. त्यात गेल्या दोन वर्षांत जगात विविध ठिकाणी झालेल्या आतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात गाजलेले शभर चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. जगातील ५० देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या चित्रपटात ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान व रशिया याचे चित्रपट अधिक आहेत, तर चीन, क्युबा, नेपाळ, बागलादेश यानी एक-दोन चित्रपटाद्वारे हजेरी लावली आहे. कॉमिक जिनियस वुडी अॅलन, गोदार्द, सर्जी बान्दरचूक, झानुसी, कास्टा, गव्हारस, जेरार्ड औरी आदी मान्यवराच्या चित्रपटांचा यात समावेश आहे.

तिसऱ्या जगताचा भारत बोलका शिपाई असल्यामुळे यंदाच्या महोत्सवात 'फोकस ऑन अफ्रिका' हा खास विभाग ठेवण्यात आला आहे. काही महोत्सवात अफ्रिकन चित्रपटावर बहिष्कार असल्यामुळे या चित्रपटाचा एकत्रित विभाग ठेवण्याचा स्तुत्य उपक्रम आहे. आफ्रिका खंडातील ३३ देशाच्या महासंघातर्फे या विभागात २० चित्रपट दाखविण्यात येणार आहेत.

देशी व विदेशी प्रतिनिधीसाठी 'इंडियन पॅनोरमा'त अर्धसत्य, जाने भी दो यारो, हे हिंदी चित्रपट आहेत तर 'आदि शंकराचार्य' हा पहिला संस्कृत चित्रपट या पॅनोरमाचे आकर्षण ठरणार आहे. 'स्मृतिचित्रे' या लक्ष्मीबाई टिळकाच्या आत्मचरित्रावरील त्याच नावाचा विजया मेहता याचा चित्रपट हा एकमेव मराठी चित्रपट पॅनोरमात आहे. (मराठीची उडी याहून किती पडणार) तर पधरा चित्रपट दाक्षिणात्य आहेत.

महोत्सवात ओशिमा, देईदा, गोदार्दसारखे नामवत दिग्दर्शक तर ज्युली ख्रिस्ती आदी कलावत उपस्थित राहणार आहेत. शिवाय महोत्सव मुबईत असल्यामुळे मुबईतील बरेच चदेरी तारे (आपल्या डेट साभाळून) उपस्थित राहतील. त्यामुळे 'ग्लॅमर' आणि 'आर्ट' याचा अनोखा मिलाफ महोत्सवाच्या प्रागणात होणार आहे.

३ जानेवारीस 'खंडदर' या मृणाल सेन याच्या चित्रपटाने महोत्सवाचे उद्घाटन होत असून पुढे पधरा दिवस सेकदाला हजार फ्रेम या वेगाने महोत्सवाचे घडयाळ सुरू होणार आहे. तेव्हा आता याच घडयाळाचा ठोका ओळखून मुबईकडे लक्ष ठेवणे भाग आहे.

—प्रतिनिधी

# एकोणीसशेचौऱ्याऐंशीमधलं उद्ध्वस्त विश्व

शिरीष सहस्रबुद्धे

जॉर्ज ऑरवेलची 'एकोणीसशेचौऱ्याऐंशी' ही कादंबरी म्हणजे वर्तमानकाळाला भविष्याचं पडलेलं भेसूर स्वप्न.या दु.स्वप्नाच्या दाहकतेचा अनुभव जरूर मूळ कादंबरी वाचून घ्यावा असा आहे, तरी त्याच्या सक्षिप्त अनुवादानही त्याचा बधिर करून टाकणारा चटका वाचकापर्यंत पोचवलाच असेल; पण 'नाइन्टीनएटीफोर'चं यश निव्वळ भविष्यकथनात नाही. 'सायन्स फिक्शन'शी ओळख असणाऱ्या वाचकांना ऑरवेलच्या कादंबरीचा संक्षेप वाचून चटकन् हे वेगळेपण जाणवल असेल की, भूतकाळ आणि वर्तमानकाळ याच्या दाट सावल्या कादंबरीत विखुरल्या आहेत. एक सलगता, साखळी, कंटिन्युइटी त्यात आहे. आयुष्यभराच्या मुशीत ऑरवेलनं भविष्य-वेधाचं हे रसायन शिजवलं, त्यामुळं त्याला वास्तवाचा एक अतूट धागा जोडला गेला.ती सर्वस्वी कल्पना-कथा बनली नाही आणि ऑरवेलची प्रतिभा त्या जातीची नव्हतीही. कल्पनेच्या उत्तुग भराऱ्यात सतत रमण्याची त्याची वृत्तीच नव्हती. कदाचित क्षमताही नव्हती. त्यापेक्षा त्याचा जास्त भर लॉजिकवर असायचा. '१९८४' मधलं विश्व ही सुद्धा १९८४ च्या आसपासच्या विश्वाची तार्किक परिणतीच होती.

ऑरवेलला एक विचार मांडायचा होता, एक इशारा द्यायचा होता. टोटॅलिटेरिअॅनिझम–सर्वंकषवाद–व्यक्तिजीवनावर आणि समाजमानसावर करीत असलेलं संथ आक्रमण पाहून,ऑरवेल अस्वस्थ झाला होता.तात्कालिक दृश्य फायद्यासाठी घातकी व्यवस्थेची लाखो लोकांना कशी भुरळ पडते हे त्यानं सोविएत रशिया, जर्मनी, इटली, जपानच्या उदाहरणांवरनं पाहिलं होतं. ही लाट वेळीच थोपवायला हवी होती. दोन महायुद्धातनं पोळून निघालेल्या लोकशाहीवाद्यांना, उदारमतवाद्यांना तिसर महायुद्ध झेपलं नसतं. ते टळाव यासाठी सर्वंकषवादाला जोरदार टक्कर देणं अत्यावश्यक होतं. साम्यवादानं व्यापलेल्या एकतृतीयांश जगाचा संसर्ग, स्वतत्र असलेल्या भूभागाना बाधू नये यासाठी जपायला हवं होतं. ऑरवेलनं स्वत:च आपल्या कादबरीबद्दल म्हटलंय, 'नाइन्टीनएटीफोर ही कादबरी आहे भविष्यकाळाबद्दल. फॅंटसीच्या तऱ्हेची; पण तिचा घाट मात्र वास्तववादी आहे. अत्यंत केंद्रीभूत अर्थव्यवस्थेमधनं कशा विकृति उत्पन्न होतात, त्याचं विकट रूप यात दिसतं. अशापैकी काही विकृतींचं दर्शन साम्यवाद आणि फॅसिझम यातनं अगोदरच झालेलं आहे. सर्वंकषवादाची बीजं सगळ्याच ठिकाणच्या विचारवंतांच्या मनात रुजलेली दिसतात, त्यांची तार्किक परिणती मी दाखविली आहे.'

वर्तमानाच्या पायावर ऑरवेलनं भविष्यकाळाची इमारत कशी बांधत नेली आहे ते पाहण्यासारखं आहे. कथा लडनमध्ये घडते. लंडन आहे, पण इंग्लंड मात्र शिल्लक नाही. इंग्लंडला नाव मिळालंय 'एअरस्ट्रिप वन्' आणि ओशियानिया या साम्राज्याचा तो एक भाग बनलाय. टेलिस्क्रीनचंही उदाहरण याच स्वरूपाचं. टेलिव्हिजनचच हे पुढच रूप. टेलिव्हिजन 'एकदिश' मार्ग आहे, तर टेलिस्क्रीन दुहेरी मार्ग, त्याच्याद्वारे तुम्ही पाहता तसेच कंट्रोलरूमला दिसताही. ऑरवेलच्या काळात विज्ञानाचा उपयोग गुन्हेगार शोधण्यापुरता आणि सत्यनिदानापुरता मर्यादित होता नाझींनी विज्ञानावर आधारलेले छळाचे प्रकार शोधून काढायला सुरवात केली.नाइन्टीनएटीफोरमधलं प्रगत तत्रज्ञान आरोपीला छळून नुसतं गुन्हेगार शाबीत करत एवढंच नव्हे तर त्याच्या मनातली बडखोरी साफ निपटून पाटी कोरी करू शकतं. ओब्रायनन केलेल्या विन्स्टन स्मिथच्या छळाची तपशीलवार वर्णन अंगावर शहारे आणणारी आहेतच; पण त्यातली तंत्रज्ञानाची आणि मनोविज्ञानाची भूमिकाही महत्त्वाची आहे. ऑरवेलच्या काळात ज्या सायंटिफिक सोशालिझमचा प्रयोग चालू होता, त्याच पूर्णत्वाला गेल्यानंतरचं स्वरूप नाइन्टीनएटीफोरमध्ये चितारलं गेलं आहे. सत्तेसाठी सत्ता हे नागवं तत्त्वज्ञान ओब्रायन विन्स्टनला उकलून सांगतो तेव्हा जनकल्याणाचा वसा घेऊन जादा अधिकार मागणाऱ्या राज्ययंत्रणेचं पूर्ण विकसित रूप तो दाखवून देतो. ऑरवेलच्या काळातल्या अनेक हुकुमशहांचा असा समज होता की, आपण सर्वंकष सत्ता हाती घेतो आहोत ती काही एका उद्दिष्टासाठी आणि तेवढ्याच काळापुरती. जसं हिटलरला जर्मनीचा अपमान धुऊन काढून बलिष्ठ करायचं होत; पण नाइन्टीनएटीफोर' मधल्या ओब्रायनच्या डोक्यात असली काही जळमटं नाहीत. तो जाणतो आणि उघड बोलूनही दाखवतो की, सत्ता सत्तेसाठीच. तेच साधन आणि साध्यही. ऑरवेलनं दाखवलेली ही 'प्रगती' चुकीची आहे, असं आज आसपास पाहून वाटतं का ? अगदी जवळचीच उदाहरणं घेतली तरी बांगलादेशचे ईर्शाद आणि पाकिस्तानचे झिया यांच्या हाती एकवटलेली सर्वंकष सत्ता सत्तेसाठीच नाही का ? त्यांच्या इस्लामीकरणाच्या वगैरे सबबी या पोकळ बढाया आहेत हे जितकं त्यांना, तितकंच त्यांच्या प्रजेलाही ठाऊक आहे. आपल्याकडे अंतर्गत आणीबाणीद्वारा इंदिराजींनी सत्ता बळकावली. तेव्हाही ती वीस कलमांच्या जोपासनेसाठी आहे असा भ्रम ना त्यांच्या डोक्यात होता ना तुमच्या-आमच्या. असे आजचे हुकुमशहा अवाढव्य आणि चिरेबंदी प्रचारयंत्रणा उभारून प्रजेची थोडा वेळ का होईना पण दिशाभूल करायचा प्रयत्न आपल्या परीनं करतात. त्याचंही अगदी पराकोटीचं रूप 'नाइन्टीनएटीफोर'मध्ये पहायला मिळतं. त्यासाठी रशियात झालेलं इतिहासाचं पुनर्लेखन आणि हिटलरसाठी गोबेल्सनं उभारलेली प्रचारयंत्रणा यांच्यापासून ऑरवेलनं प्रेरणा घेतली असणार हे उघड आहे. ज्या पोलिसी व लष्करी दहशतीच्या आणि

दडपशाहीच्या बळावर आजचे सर्वंकष राज्यकर्ते टिकून राहतात, त्यांचं चोख पोलादी दर्शनही 'नाइन्टीनएटीफोर' मध्ये घडतं. त्यात नेहमीच्या पोलिसांबरोबरीनं 'थॉट पोलीस' तर आहेतच; पण चौकात आणि झाडांमध्येही टेलिफोन आणि मायक्रोफोन्स दडवलेले आहेत. साध्या वेशातल्या गुप्तहेरांचा सुळसुळाट तर आहेच; पण स्वतःच्या आईवडिलांवरसुद्धा पाळत ठेवून खबर द्यायचं शिक्षण शाळेत मुलांना दिलं जातं आणि या सततच्या टेहळणीत कुणाचा सशय आला तरी त्याला शिक्षा बहुधा एकच. मध्यरात्री त्याच्या घराच्या दारावर थाप पडते आणि तो नाहीसा होतो तो कायमचा! असा एखादा नाहीसा होतो, तो पाळामुळांसकट. सरकारदप्तरीसुद्धा त्याची नोंद रहात नाही. त्याचं अस्तित्व सुरुवातीपासनच साफ पुसलं जातं. कारण भूतकाळावर पूर्ण ताबा असल्याशिवाय ,सरकार वर्तमान आणि भविष्यकाळाचं नियंत्रण कसं करणार? त्याचसाठी सगळ्या वर्तमानपत्रांचं, पुस्तकांचं, रेकॉर्डस्चं रोजच्या रोज पुनर्लेखन करावं लागतं. 'नाइन्टीनएटीफोर'चा नायक विन्स्टन स्मिथ हे काम करणाऱ्या खात्यातच तर नोकरीला आहे. आयुष्यभर वास्तवाशी इमान ठेवणाऱ्या ऑरवेलनं आपल्या शेवटच्या कादंबरीचा नायक दाखवला तो वास्तवाच विकृतीकरण करून पोट भरणारा!

## कुटुंबकल्पनेची विटंबना

अर्थात ऑरवेलनं एकोणीसशेअठ्ठेचाळीसच्या सगळ्याच घटना काही कादंबरीत टोकाला नेऊन भिडवल्या नाहीत. काही गोष्टी तशाच उचलल्या– फार तर थोडंसं विडंबन केलं त्यांचं. कादंबरीतला 'बिग ब्रदर' आणि त्याचा वैरी गोल्डस्टाइन या स्टॅलिन आणि ट्रॉट्स्कीच्या प्रतिकृतीच आहेत. गोल्डस्टाइनचं बंडखोर पुस्तक आणि तत्त्वज्ञान याही ट्रॉट्स्कीच्या लिखाण–विचाराच्या प्रतिमाच. असाच दुसरा तपशील ऑरवेलनं सहीसही उचललाय तो युद्धजन्य वातावरणाचा. दुसऱ्या महायुद्धात लंडन शहरवासियांनी घेतलेले अनुभव ऑरवेलनं 'नाइन्टीनएटीफोर'मध्ये शब्दबद्ध केलेले आहेत. विजयाचा उन्माद, पराभवाच्या आशंकेनं होणारी घबराट, रक्तपात आणि हिंसेबद्दलचा निर्ढावलेपणा आणि मृत्यूच्या सावलीत वावरतानाही जगण्याबद्दलची वाढती लालसा अशा परिचित घटकांनीच यातलं युद्धाचं वातावरण पूर्ण होत. फरक आहे तो चित्रणातल्या तीव्रतेत. कादंबरीतले रंग जास्त गडद आहेत. युद्धकाळातली उदात्त सोशिकता, देशभक्ती आणि धैर्य याचा मागमूसही इथे नाही. त्या वेळची हलाखी, क्रूरता आणि भग्नता मात्र प्रखरपणे उमटली आहे. आंतरखंडीय प्रक्षेपणास्त्रं, अण्वस्त्रं असलं काही दाखवून कादंबरीची शास्त्रीय नवकथा करायचा मोह ऑरवेलला झाला नाही, हे पाहण्यासारखं आहे.

एका बाबतीत मात्र ऑरवेलनं मोठी झेप घेतली. व्यक्तिजीवन आणि मानवीसबंध हे ते क्षेत्र. 'नाइन्टीनएटीफोर'ला धार फार मोठ्या प्रमाणात या दोन घटकांतून आली आहे. ऑरवेलला हे दाखवून द्यायचच होतं की, सर्वंकषसत्तावाद सगळ्यात भीषण घात कुणाचा करीत असेल तर माणूसपणाचा! व्यक्तिगत जीवनाच्या प्रतिष्ठेचा आणि माणसातल्या परस्परसबंधाचा. त्याच्या या विश्वाला उध्वस्त, भग्नकळा येते ती माणुसकी आणि माणसांमधला जिव्हाळा आटून कोरडे झाल्यामुळे. त्यातलं खरं क्रौर्य हेच की, या नैसर्गिक मनुष्यप्रवृत्ती आपोआप आटलेल्या नाहीत तर पद्धतशीरपणे योजना आखून त्याचा काटा काढण्यात आला. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची आणि मनोविज्ञानाची मदत सत्ताधाऱ्यांनी घेतली. 'नाइन्टीनएटीफोर'मधलं कौटुंबिक जीवन म्हणजे कुटुंबकल्पनेची विटंबना आहे. कारण कुटुंबातल्या घटकात ना प्रेम ना विश्वास. मुलं आईबापांवर नजर ठेवतात. मैत्री हे नातंच अस्तित्वात नाही. त्याऐवजी आहे 'कॉम्रेडशिप'. म्हणजे असं नातं की, ज्यात एक कॉम्रेड दुसऱ्याबद्दल केव्हा थॉटपोलिसाकडे खबर देईल याचा भरंवसा नाही! स्त्रीपुरुषसंबंधावर पार्टीची मजबूत पकड आहे. प्रेम, वासना, शृंगार या सहजसुलभ मानवी भावना हा गुन्हा ठरतो. पार्टीच्या सभासदांना लग्न करणं आवश्यकच वाटलं तर परवानगी घ्यावी लागेल. तीही मिळू शकेल; पण त्यांना त्यासाठी हायकमांडची खात्री पटवावी लागेल की, आमच्यात शारीरिक वा मानसिक आकर्षण नाही. निव्वळ राष्ट्रीय कर्तव्य म्हणून हे लग्न! राष्ट्रीय कर्तव्य एवढ्याच अर्थानं की, पार्टीला स्वयंसेवक हवेत, म्हणून प्रजोत्पादन करायचं. नवराबायकोंनी तेवढ्यापुरताच शरीरसंबंध ठेवावा. लोकांची लैंगिक सुखाची आकांक्षा फोफावूच नये. यासाठी शाळाकॉलेजातून 'अँन्टी–सेक्स लीग' उघडलेले आहेत. कडक ब्रह्मचर्य आणि कौमार्य यांचा प्रचार त्यातून कोवळ्या वयाच्या


*With Best Compliments from :*

Pioneer Medical Stores

**Wholesale & Retail Pharmaceutical Distributors.**

**4/27, Opp. Azad Talkies,**
**Ichalkaranji–416 115**



*With Best Compliments from*

Ninad Electronics

**Radio Taperecorders, Transistors, Calculators, Telivisions' SALES & SERVICE.**

**Biniwale Bldg. Datta–Maruti Rd.,**
**SANGLI 416 416**

मुलामुलींच्या मनावर असा पक्का ठसवला जातो की, काय बिशाद त्यांना मदनबाधा होईल! सर्वंकषवादी राज्यसंस्था हातपाय फैलावते ती व्यक्तिगत आयुष्याची क्रूरपणे गळचेपी करूनच, हा धडा ऑरवेलनं यातनं दिला आहे आणि त्यापेक्षा महत्त्वाचा धडा हा की, व्यक्तिस्वातंत्र्य गमावलं तरी त्या बदल्यात भाकरी किंवा दुसरं काही जास्त मिळत असं बिलकूल नाही. (१९७५–७७च्या दरम्यान आपण भारतीयही हेच शिकलो नाही का?) कारण राज्ययंत्रणेचं धूर्त धोरणच असं आहे की, सामान्य माणसाला कायम रजलागाजलेलाच ठेवायचा. अर्धपोटीच राखायचा. एरवी त्याचं लक्ष आसपास जाईल आणि उद्या कदाचित तो सत्तेत भागिदारीही मागेल. त्यापेक्षा त्याचं सगळं चित्त पोटासाठी धडपडण्यात गुतून राहिलं पाहिजे. त्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा अपुरा असला पाहिजे. तो अपुराच पडावा आणि तरीही त्याबद्दल तक्रार होऊ नये यासाठी अखंड युद्ध चालू राहिलेलंच चागलं. जरुरीपेक्षा जादा राष्ट्रीय संपत्ती अशा युद्धात खलास होऊन जाईल आणि लोक कायम भुकेलेच राहतील. त्याचं खापर युद्धावर आणि पर्यायानं परक्या शक्तीवर फोडून नामानिराळं होता येईल. सर्वंकष सत्ता व्यक्तीचं नुसत बाह्य जीवनच नव्हे तर अतर्मनही पोखरून काढून पोकळ, बाष्कळ, क्षुद्र, अर्थहीन करून टाकते, हे ऑरवेलनं 'नाइन्टीनएटीफोर' मधल्या समाजजीवनातनं जसं दाखवलं आहे तसं चारदोन व्यक्तीच्या आयुष्यातनंही दाखवलं आहे. विन्स्टन स्मिथ आणि ज्यूलिया या नायकनायिकांचीच उदाहरणं पहा. दोघेही दीर्घकाळ असंतुष्ट आहेत. दोघंही सर्वसामान्यच आहेत. त्यांच्यात 'हिरॉइक' असं काही नाही; पण दोघही ठोकळेबाज जगण्यातनं बाहेर पडून स्वतंत्र व्यक्तित्वाच्या शोधात आहेत. या समान धाग्यामुळं दोघंही एकमेकांच्या निकट येतात. प्रेम करण्याचा गुन्हा हातून घडतो, त्यातल्या धोक्याची कल्पना दोघानाही असतेच; पण एक निश्चय मनाशी असतो की, पकडले गेलो, छळ झाला तरी एकमेकाशी प्रतारणा करायची नाही. मनातला प्रेमाचा झरा आटू द्यायचा नाही. सामान्य माणूस असा आत्मिक सामर्थ्य घेऊन उभा रहायला लागतो, तेव्हा तो आपल्या शारीर-अस्तित्वापेक्षा मोठा होत जातो. नेमका यातच राज्ययंत्रणेला धोका दिसतो. चाळिशीला टेकलेला, किरकोळ शरीरयष्टीचा आणि पोटात अल्सर बाळगणारा विन्स्टन अशा वेळी प्रस्थापिताचा दखलपात्र शत्रू होतो. याची शिक्षा त्याला पुरेपूर मिळते ती ओब्रायनकरवी. विन्स्टनच्या मानसिक शुद्धीकरण-मोहिमेतलं ओब्रायनचं यश हे की, तो ज्यूलियाबद्दलचं प्रेम आणि बिग ब्रदरबद्दलचा तिरस्कार पुसून टाकून विन्स्टनच्या मनाची पाटी नुसती कोरी करतो एवढंच नव्हे, तर मनाची पुनर्रचना करून ज्यूलियाबद्दल द्वेष आणि बिग ब्रदरबद्दल प्रेम याची पेरणी त्यात करू शकतो. कादंबरीच्या शेवटी छळातून बाहेर पडलेले विन्स्टन आणि ज्यूलिया एकमेकांना भेटतात, तेव्हा ते स्वतःच्या भुतासारखेच असतात. मूळ अस्तित्वाच्या निव्वळ सावल्या. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि सभ्यता, स्वातंत्र्य, न्याय ही मूल्यं मोलाची मानणारा ऑरवेल आपला धोक्याचा इशारा इथे पुरा करतो. इशारा हा की, सर्वंकषवाद माणसाच्या स्वत्वालाच भगदाड पाडतो, त्याच्या अगदी अतर्मनालाही कीड लावून ते निकामी, उद्ध्वस्त, नपुंसक करून टाकतो. व्यक्तीला पायांखाली पूर्णपणे चिरडूनच त्यावर सर्वंकष सत्तेची इमारत उभी राहत असते.

## धारदार पातं

भावनेबरोबरच बुद्धीचाही बंदोबस्त करणं सर्वच सर्वंकषसत्तावादी आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं महत्त्वाचं मानतात. बंडखोरीचे, असंतोषाचे विचारच प्रजेच्या मनात येऊ नयेत यासाठी ओशियानियामधल्या सत्ताधाऱ्यानी काढलेला नामी उपाय म्हणजे, प्रचलित इंग्लिशऐवजी 'न्यूस्पीक' ही नवी भाषा चलनात आणायची. जगातली ही एकमेव अशी भाषा असेल की, ज्यातली शब्दसंख्या दरवर्षी वाढण्याऐवजी कमी होत जाईल. कारण जितके कमी शब्द तितका विचार करायला वाव कमी. अगदी रोजच्या मामुली गरजांपुरतेच शब्द शिल्लक ठेवायचे. उदाहरणार्थ, 'स्वातंत्र्य' या अर्थाचा शब्दच न्यूस्पीकमध्ये ठेवला नाही म्हटल्यावर लोक स्वातंत्र्याबद्दल विचार करतीलच कसे? न्यूस्पीकचा पुष्कळच तपशीलवार आराखडा ऑरवेलनं कादंबरीत दिला आहे. सर्वंकषवादाचा पूर्णपरिणत, परिपक्व असा आविष्कार 'नाइन्टीनएटीफोर' मध्ये आहे असं आपण मागे पाहिलं त्याचा न्यूस्पीक हा एक ठळक पुरावा. जनजीवनावर सर्वव्यापी नियंत्रण ठेवण्याची आकांक्षा तर सगळ्याच सत्ताधाऱ्यांना असते; पण नाइन्टीनएटीफोरमध्ये खोलात जाऊन, बारीक-सारीक तपशिलाचा विचार करून एक पूर्णाकार यंत्रणा घडवलेली आहे, जिच्या तावडीतून भूतकाळ–वर्तमानकाळ–भविष्यकाळाचं एखाद


*With Best Compliments from :*

Applied Research & Engineering (Pvt.) Ltd.

**Sangli.**



**एशियन रेडिओ हाउस**

**मेन रोड, सांगली**

सर्व नामवंत कंपन्यांचे टेपरेकॉर्डर, टू-इन-वन कार कॅसेटप्लेअर आणि तयार कॅसेट्ससाठी

फोन–ऑफिस : २५८७ ✱ घर : २९७९

कस्पटसुद्धा सुटणार नाही. याच उद्देशानं अगदी विचारपूर्वक सगळी समाजरचना घडवलेली आहे. ओशियानियाचीलोक सख्या तीस कोटी· त्यातले पंच्याऐंशी टक्के लोक हे 'प्रोल्स' म्हणजे तळागाळातले, कष्टकरीवर्गातले. त्यांच्यावर नियत्रणं फारशी नाहीत. ते पशूप्रमाणेच आहार–निद्रा–भय–मैथुनात अगदी गुगून जातील एवढं पाहिल की पुरे. 'पार्टीत' त्यांचा समावेश नाही. 'प्रोल्स आणि पशू हे स्वतंत्र आहेत 'असं म्हटलं जातं. 'प्रोल्स' हे प्रोलेटॅरियनचं लघुरूप आहे हे लक्षात घेतलं म्हणजे ऑरवेलनं 'डिक्टेटरशिप ऑफ द प्रोलेटॅरियट' या साम्यवाद्यांच्या लाडक्या संकल्पनेचा कसा जालिम उपहास केलेला आहे ते ध्यानात येईल. तर प्रोल्स वगळता उरलेले पंधरा टक्के. त्यातले तेरा टक्के पार्टीचे साधे सभासद आहेत आणि दोन टक्केच काय ते अन्तर्वर्तुळातले मान्यवर सदस्य आहेत. त्यांना सोयी-सवलती जास्त आहेत. तेव्हा समाजसत्तावाद आला तरी वर्गभेद नाहीसे होत नाहीत.आहे रे आणि नाही रे वर्गाच्या नव्या श्रेणी निर्माण होतात एवढंच. विन्स्टन स्मिथद्वारा ऑरवेलनं एवढं सुचवून मात्र ठेवलंय की, आता बदलाची काही आशा असेल तर ती प्रोल्समधूनच. दुर्दैव एवढंच की, त्यांना कुणी तरी जागवायला-चेतवायला हवं. ते करू शकेल असा नेता आज तरी त्यांच्यात नाही. बाहेरून जाऊन कुणी त्यांना जागवतो म्हणाला, तर पार्टी त्याचा निकाल लावील. तेव्हा प्रोल्स अंत.स्फूर्तीनंच उभे ठाकले, दडपलेल्या नैसर्गिक प्रवृत्ती उफाळून आल्या तरच नव्या क्रांतीची आशा, एरवी अंधारलेलं जगणं !

'नाइन्टीनएटीफोर' चं जग हे असं भग्नावशेषासारखं आहे; पण ते नुसत विषण्ण करून थांबत नाही. एखादं धारदार पातं गिळण्याचा अनुभव आणि 'नाइन्टीनएटीफोर' वाचण्याचा अनुभव हे सारखेच. आतडं सफाईनं कुरतडल्याची वेदना द्यायचं सामर्थ्य दोघाव्यातही आहे. मौजेखातर वाचून सोडून देण्यासारखी ही कादंबरी नाही. नववर्षाच्या प्रारंभी अशी कडवट चव तोंडात रेंगाळू द्यावी का, हा ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे; पण ज्याची निदान आपल्या पुऱ्या हयातीपर्यंतच्या जगाची तरी काळजी करायची तयारी आहे, त्याला ऑरवेलनं दिलेला सावधानचा इशारा नजरेआड करून चालणार नाही. आजही सोविएत रशिया आपल्या नागरिकांना दडपून वर हंगेरी, पोलंड, चेकोस्लोवाकिया, पूर्वजर्मनी, अफगाणिस्तान इतक्या मोठ्या भूखंडावरून जुलमाचा वरवंटा फिरवू शकतो आणि त्याला थोपवण्याच्या नावाखाली अमेरिकाही चिली, ग्रेनाडा,कोरिया; साल्वादोर आणि व्हिएतनाममध्ये निर्घृण अत्याचार करू धजते, तेव्हा ऑरवेलचा 'रेलेव्हन्स' उत्कटपणे जाणवतो. हेही उमजतं की, सगळं असंच जर चालू राहिलं तर या द्रष्ट्या लेखकानं दाखवलेले अंधाराचे दिवस दूर नाहीत. काही पुस्तकांचा प्रभाव आणि महत्त्व ती वाचून पूर्ण झाल्यावर माणूस डोळे मिटून अंतर्मुख होतो, तिथूनच खरं सुरू होतं. जॉर्ज ऑरवेलची 'नाइन्टीनएटीफोर' ही कादंबरी अशाच कलाकृतीमध्ये जमा आहे. □


Welcome to the Treasure of the finest in Children's Wear.

**ROOPAM**

Sangli.

* METRO DRESSES

¤ GARMENT CENTRE



M/s. A. V. Limaye Tandulwale

Cocoanut & General Merchant
Ganapati Peth, SANGLI 416 416

*Stockiest :* Tata Oil Mill, Quality Biscuits
Laxmi Limited.

*Gram :* TANDULWALA

*Phone :* Off : 3082 Res : 3282
Miraj : 2271

## मिरज–इचलकरंजी वार्तापत्र : १

खैरातअलीची मरीयन, खतेजा, ताहिरा सरफुद्दिन, गौसियाबेगम मिर्झा ... खलिदाबेगम मोहंमद, लईकबेगम या आणि अशा असंख्य अल्पवयीन मुलींचं भविष्य मिरजेतल्या अरबांच्या वास्तव्यानं अवेळी झाकोळून गेलं आहे. या मागं आहे एक गुंतागुंतीची यंत्रणा. अरबांनी फेकलेल्या पैशांवर उभी असलेली ... मिरजेतलं जीवन भ्रष्ट करणारी...

# मिरज-दुबई दुष्टचक्रात निरपराध मुलींचे बळी !

सुभाष काळे

दिनांक ४ जून १९८३. सायंकाळचे साडेसहा वाजून गेलेले. हैद्राबाद शहरातील मोगलपुरा भागात राहणारा खैरातअल्ली 'जाफ्री' मज्जिदीकडे वेगाने चालला होता. त्याची नमाजाची नेहमीची वेळ टळून गेली होती. मजुरी वेळेवर हातात न पडल्याने त्याला आज थोडा उशीर झाला होता. दिवसभराचे लाकूडफोडीचे काम संपताच मजुरीचे पैसे उचलून प्रथम सरळ जाफ्री मज्जिदीत जाण्याचा त्याचा परिपाठ होता. खैरातअल्लीने चांगली पासष्टी गाठली होती. तरी त्याच्या गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून हा नियम अखंडपणे चालू होता. मज्जिदीत प्रवेश करताच समोर असलेल्या पाण्याच्या हौदापाशी तो गेला. सवयीने नळ सोडून त्याने हातपाय स्वच्छ धुतले आणि डोक्याला गुंडाळलेल्या लुंगीने पुसून नमाजाच्या ठिकाणी तो गेला.

अल्ला ऽ हो ऽऽ अकबर लाह इलाह इल्लील्लाह मुहमद रसुलल्लाही !

नमाज संपली. आज तो काहीसा अस्वस्थ होता. नेमके काय होते आहे हे त्यालाही कळत नव्हते; पण अस्वस्थतेची जाणीव मात्र तीव्रतेने होत होती. नाही तरी त्याचे आज सकाळपासूनच गाडे बिघडले होते. कधी नव्हे तो सकाळी उठायला उशीर झाला. त्यामुळे कामावर जायलाही थोडा उशीर झाला. गेल्या–गेल्या मालक रागावला. संध्याकाळी परतताना मजुरी वेळेवर मिळाली नाही त्यामुळे नमाजला उशीर.

झपझप पावले टाकीत तो घरी आला. तसे त्याचे घर अगदी मज्जिदीसमोरच होते. घर बंद पाहून तो चकीत झाला. नेहमी खैरात अल्ली कामावरून परतत असे त्या वेळी त्याची बायको दारासमोर टाकलेल्या खाटल्यावर बिडी ओढत बसलेली असायची, तर पोरं आजूबाजूला खेळत असलेली. हे दृश्य त्याच्या सवयीचे होते. घर बंद पाहून तो अधिकच अस्वस्थ झाला. असे पूर्वी कधी घडले नव्हते. नेमके आजच असे का घडावे याचे त्याला राहून राहून आश्चर्य वाटत होते. त्याने शजारी-पाजारी चौकशी केली; पण कोणीच काही माहिती न दिल्याने तो अधिकच नाराज झाला. काय करावे असा विचार त्याच्या डोक्यात घोळत असतानाच अब्दुल्ला–त्याचा पुतण्या समोरून धावत येताना दिसला. अब्दुलने जवळ येताच घाबऱ्या आवाजात म्हटले– 'आब्बाजान, आब्बाजान, अपनी मरीयन का सबेरेसे पता नही. हम सब उसको धूंड रहे है।'

'अरे, कहाँ जानेवाली है ? गेली असेल सिनेमाला नाही तर एखाद्या मैत्रीणीकडे. नाही तरी पोर जरा नटखट आहे. फिक्र मत करो. शामतक आजायेगी' त्याने अब्दुल्लाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला खरा; पण मनातून मात्र तो घाबरला होता. सकाळपासून असेच चालल्याने त्याच्या मनात अशुभ शंकेची पाल चुकचुकत होती. आपली अस्वस्थता लपविण्यासाठी त्याने दरवाजापुढे टाकलेल्या खाटल्यावर अंग टाकले.

मरीयन-त्याची सोळा वर्षांची लाडकी बेटी. नुकत्याच उमलू लागलेल्या गुलाबाच्या कळीसारखी मासूम. गेल्या दोन वर्षांपासून तो तिच्या लग्नाच्या खटपटीत होता. दिवसभर कष्ट करून लग्नासाठी एकेक पैसा कनवटीला लावत होता. खैरातअल्लीच्या कुटुंबकबिल्यात चागली सहा-सात माणसे होती. घरात अठरा विश्वे दारिद्र्य ! कधी रोटी आहे तर दाल नाही आणि दाल आहे आहे तर रोटी नाही. निव्वळ हातावरचे पोट. दिवसभर मिळवावे तेव्हा कुठे रात्री सर्वांच्या तोडात घास पडायचा. गेली तीस–चाळीस वर्षे तो परिस्थितीशी झगडत होता आणि परिस्थिती त्याला हातोहात फसवीत होती, त्याच्याशी लपंडाव खेळत होती. परिस्थिती कितीही खराब असली तरी पोरीचे लग्न तर उरकणे भागच होते. त्यासाठी तो दिवस–दिवस काबाडकष्ट करीत होता.

खाटेवर पडलेल्या खैरातअल्लीने उठून बसत हाताने खुण करून अब्दुल्लाला शेजारच्या घरातून पाणी आणायला लावले. चागले ग्लासभर पाणी सपवून त्याने भांडे खाली ठेवले. खरे तर ही त्याची रोजची चहाची वेळ; पण आज त्याला आपली चहाची तहान पाण्यावरच भागवावी लागली. अब्दुल्लाजवळ निरोप ठेवून तोही मरीयनला शोधायला बाहेर पडला. त्याच्या परिच यातली एक–दोन घरे त्याने धुडाळली. शोधता शोधता आठ वाजले, नऊ वाजले, घड्याळाचा

काटा वेगाने पुढे पुढे पळत होता. होता होता शेवटी अकरा वाजले. दिवसभराच्या परिश्रमाने व भटकंतीने थकून त्याने परतण्याचा निर्णय घेतला. घरची सर्व मंडळी परतली होती! पण मरीयन काही सापडली नव्हती. रात्रीही ती आली नाही हे पाहून खैरातअल्ली मनातल्या मनात चांगलाच हबकला. कशीबशी त्याने पाण्याच्या घोटाबरोबर एक रोटी संपवली व बिछान्यावर अंग टाकले. रात्री झोप लागलीच नाही. पहाटेच्या सुमारास थोडा डोळा लागला.

भल्या पहाटेच उठून त्याने मज्जिदीत जाऊन नमाज पढली व कामावर न जाता सरळ मरीयनला शोधायला बाहेर पडला. मरीयनच्या मैत्रिणींची घरे, जवळपासच्या पाहुण्यांची घरे त्याने धुंडाळली आणि इतर बऱ्याच ठिकाणी शोधून रात्री उशीरा परतला.

एकेक दिवस उलटत होता. जून संपला, जुलैही संपला. ऑगस्टची एक तारीख उजाडली आणि अचानक खैरातअल्लीच्या डोक्यात ट्यूब पेटली. मेच्या शेवटच्या आठवडचात मिरजेहून कोणी तरी एक काळी धिप्पाड बाई आली होती व तिने भावजयीमार्फत मरीयनला घरकामासाठी आखाती देशात पाठवितोस का म्हणून विचारले होते. प्रथम पाच हजार रुपये रोख अॅडव्हान्स, नंतर दर महिन्याला दोन हजार रुपये पगार. शिवाय तुम्हाला तिकडच्या 'हाज'ला जाण्याचीही व्यवस्था होऊ शकेल असेही ती म्हणाली होती.

हे सर्व आठवते न आठवते तोच खैरातअल्लीने त्या बाईविषयी वाटलेला संशय झटकून टाकला. छे. छे. ती असे कशाला करेल ? तिला काय कमी आहे ? नेहमी स्वतःच्या गाडीतून फिरणारी, अंगाखांद्यावर किंमती दागदागिने घातलेली, उंची वस्त्रे ल्यालेली. ही खानदानी मुसलमानाची बाई आपल्या मरीयनला कशाला नेईल ? एखाद्या स्त्रीवर असा संशय घेणे देखील पाप आहे. नाही तरी आपली 'गलती' आहे. त्या वेळी तिला होकार दिला असता तर आज कशाला ही आफत ओढवली असती ? मरीयनच्या आयुष्याचे कल्याण झाले असते. आजपर्यंत आपल्या घरात उपाशी–तापाशी दिवस काढलेली गरिबाची पोर सुखी झाली असती; पण आपणच तिला नकार देऊन तिच्या आयुष्याचे वाटोळे केले. असा खैरातअल्लीने मनातल्या मनात स्वतःला दोष दिला. संकटकाळात सापडलेल्या माणसाचे मन विचित्र असते. त्याचे एक मन स्वतःला दोष देत होते तर दुसरे मन त्याला त्या बाईविषयी गप्प बसू देत नव्हते.

'असलीयत क्या है यह तो पता चलेगा', प्रयत्न न करता गप्प बसलो असे तर होणार नाही, असे म्हणून त्याने आपल्या मनाची परत एकदा समजूत घातली व मिरजेला जाऊन प्रत्यक्ष पाहण्याचे त्याने मनातल्या मनात ठरविले.

## घरावर अचानक छापा

मिरजेला जाण्याचा त्याने निर्णय घेतला खरा; पण त्या बाईचे नाव कुठे ठाऊक होते ? शिवाय पत्ता देखील ठाऊक नव्हता. त्याने पुतण्यामार्फत भावजयीकडून विचारून घेतले. त्याचे व भावजयीचे पटत नव्हते. भावजयीने नाव सांगितले पण पत्ता काही दिला नव्हता. माहीत नाही असे सांगून तिने अब्दुल्लाला पिटाळले होते. 'खैरुन्निसा' या एका नावाच्या आधारावर त्याने मरीयनला शोधण्यासाठी मिरजेला प्रयाण केले.



¤

खैरुन्निसा–
चाकूवाली म्हणून ही कुप्रसिद्ध आहे.
सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या चार जिल्ह्यांतून नुकतंच तिला हद्दपार केलं आहे.

¤

मिरजेच्या रेल्वेस्टेशनवर थोडीफार चौकशी करताच खैरातअल्लीला खैरुन्निसाचा पत्ता समजला. एका रिक्षावाल्याने त्याला थेट हिराहॉटेल चौकातील तिच्या घरासमोरच आणून उभे केले. दरवाजा बंद होता. सकाळची वेळ असूनदेखील दरवाजा बंद असल्याबद्दल त्याला आश्चर्य वाटले. त्याने दारावरची कडी ठोठावली. दरवाजा उघडला गेला. 'मैं ख्वाब तो नही देख रहा हूँ ना ?' खैरातअल्लीने स्वतःलाच प्रश्न केला. तहान–भूक विसरून गेल्या दोन महिन्यांपासून जिच्यासाठी तो धडपडत होता ती त्याची लाडकी मरीयन दारातच उभी होती. त्याने स्वतःला चिमटा काढून खात्री करून घेतली.

'आब्बाजान, मैं पूरी बरबाद हो गयी !' म्हणत मरीयनने खैरातअल्लीला आवेगाने मिठी मारली. त्या वेळी तो भानावर आला. एका हाताने स्वतःचे डोळे पुशीत त्याने 'नही बेटी ऐसा नही हो सकता' म्हणत तिच्या पाठीवर त्याने हात टाकला व तिचे सांत्वन करू लागला.

तेवढचात 'अरे ये हरामजादी किसके साथ बात करती है ?' म्हणत एक धिप्पाड बाई पुढे आली. तिने खसकन् मरीयनला बाजूला ओढले व फाडकन् मुस्काडात मारून तिला आतल्या खोलीत ढकलले आणि दरवाजा बंद करून घेतला.

खैरातअल्लीने ओळखले, हीच ती बाई मरीयनला नोकरीसाठी मस्कतला पाठविण्याची विनंती करायला आली होती. खैरातअल्लीने तिला नीट निरखून पाहिले; पण तेव्हाचा तिचा नूर आणि आताचा तिचा नूर यात जमीन-अस्मानाचा फरक होता. 'ये मेरी बेटी है, मुझे मेरी मरीयन वापस करो' म्हणत खैरातअल्लीने त्या धिप्पाड बाईला ढकलून पुढे घुसण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर तिने त्याच्याही खाडकन् तोंडात ठेवून देऊन त्याला मागे ढकलले व भिंतीवरचे एक बटन दाबले. तीन–चार सेकंदात चार–पाच धिप्पाड माणसे खैरातअल्लीभोवती येऊन उभी राहिली.

'बाप असलास तरी आता पोरीवरील तुझा हक्क संपलेला आहे. तू आता येथून बऱ्या बोलाने चालता हो नाही तर तुझी बोटी बोटी करीन. समजलास का !' परत एकदा खैरुन्निसा गरजली.

खैरातअल्लीला मरीयनची असहाय्य स्थिती पाहवली नाही.

भोवळ येऊन तो मटकन् खाली बसला. त्या चार–पाच धटिंगणांनी त्याच्या हातापायाना धरून उचलले व बाहेर नेऊन टाकले आणि खाडकन् दरवाजा बंद करून घेतला.

बिच्चारा खैरातअल्ली ! पोटच्या पोरीला देखील तो भेटू शकला नाही. नाव खैरातअल्ली असले तरी त्याच्यावर अल्लाने दु:खाच्या खैरातीखेरीज अन्य कशाची खैरात केलेली नव्हती. वाटघाला आलेल्या इन्साफाचा विचार करीत तो बऱ्याच वेळाने हळूहळू कसाबसा रेल्वेस्टेशनवर आला. तिकिट काढले व काहीही न खाता-पिता तो हैद्राबादला जाण्यासाठी गाडीत बसला. ४ ऑगस्टला हैद्राबादेत पोचल्या पोचल्या त्याने प्रथम सरळ मोगलपुरा पोलीसस्टेशनकडे धाव घेतली. तेथे एक हवालदार त्याच्या चागल्या ओळखीचा होता. खैरातअल्लीने त्याच्या कानावर सर्व हकीकत घातली. हवालदाराला खैरातअल्लीची दया आली. तो त्याला वरिष्ठाकडे घेऊन गेला. हैद्राबाद पोलिसानी ४ जून १९८३ पासून मरीयन बेपत्ता असल्याची खैरातअल्लीची तक्रार इडियन पिनल कोड ३६३ व ३६६–३४ प्रमाणे नोदवून घेतली. ५ ऑगस्टला संध्याकाळी हैद्राबाद स्टेट क्राइम सी. आय. डी. इन्स्पेक्टर शेख महंमद इसा याच्या मार्गदर्शनाखाली इन्स्पेक्टर चित्तरंजन दास मिरजेला रवाना झाले. सहा ऑगस्टला सायंकाळी मिरजेत पोचताच त्यानी मिरज शहर पोलीस स्टेशनवर जाऊन तेथील वरिष्ठांची भेट घेतली व येण्याचा हेतू स्पष्ट केला.

रात्री ९–३० वाजता मिरज पोलीसस्टेशनचे पोलीसइन्स्पेक्टर श्री. गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सबइन्स्पेक्टर जी. एस. मिराशी, सबइन्स्पेक्टर पी. व्ही. काळे, हेडकॉन्स्टेबल कसबे, हवालदार गावडे, हवालदार गायकवाड आणि हैद्राबादचे इन्स्पेक्टर चित्तरंजन दास यांनी संयुक्तपणे हिराहॉटेलसमोरील खैरुन्निसाच्या घरावर अचानक छापा घातला. छाप्यात खैरातअल्लीची मरीयम तर सापडलीच; पण त्याशिवाय–(१) खतेजा सैय्यद गौसुद्दिन छोटेसाब, राहणार हैद्राबाद, वय–१७, (२) ताहीरा महंमद सरफोद्दिन, रा. हैद्राबाद, वय–१६, (३) लईकबेगम अब्दुल्ला हकम, रा. हुमनाबाद, जिल्हा बिदर, (४) गौसियाबेगम मिर्झा मज्जिदबेग, रा. सिकंदराबाद, वय–१६, (५) खलीदाबेगम मोहम्मदअली शेख, रा. हैद्राबाद, वय–१६. या हैद्राबादेहून पळवून आणलेल्या १४ ते १६ वयोगटातल्या पाच मुलीही सापडल्या. पोलिसांनी लगेच तातडीने हालचाल करून चाकूवाली खैरुन्निसा सुलेमान सैय्यद, लग्ने लावणारा काझी मौलाना हमीद, हमीद अब्दुल्ला करीम खाँ, दोन अरबांचे दलाल व खैरुन्निसाचा नवरा सुलेमान सैय्यद. अशा पाच लोकांच्या टोळीला अल्पवयीन मुलीना त्याच्या मनाच्या विरुद्ध पळविणे, फूस लावून व थापा मारून पळविणे, कोंडून ठेवणे, इच्छेविरुद्ध लग्ने लावणे, जबरदस्ती करणे, मारहाण करून गुलामाप्रमाणे राबविणे या व इतर गुन्ह्यांखाली अटक केली.

खैरातअल्लीची 'मरीयम' कुमारिका राहिली नव्हती. खैरुन्निसाने तिचा 'निकाह' १२ जून ८३ रोजी म्हणजे हैद्राबादहून पळवून आणल्यानंतर अवघ्या आठच दिवसात, रमजान ईदच्या पवित्र दिवशी 'फैसा' नावाच्या सत्तरी उलटलेल्या म्हाताऱ्या अरबाबरोबर लावून दिला होता. मरीयम होती सोळा वर्षांची तर फैसा तिच्या बापापेक्षा–खैरातअल्लीपेक्षा पाच वर्षांनी बुढ्ढा ! सत्तरी उलटलेला जख्ख म्हातारा ! लग्न खैरुन्निसाच्या घरात पार पडले होते व मधुचंद्र नावाचा अत्याचारसोहळा एका दवाखान्यात पार पडला होता. हा तिचा पहिला 'निकाह', त्याबरोबर 'तलाख'–देखील पहिलाच ! अवघ्या पाच दिवसात मिळालेला ! त्यानंतर ६ ऑगस्टपर्यंतच्या दोन महिन्यांच्या काळात तिला 'निकाह'च्या नावाखाली अनेक म्हाताऱ्या अरबाची शेज सजवावी लागली. त्यांच्या अनैसर्गिक व विकृत चाळधांसाठी आपला देह मुकाटपणे स्वाधीन करावा लागला होता.

पोलिसांबरोबर आलेल्या आब्बाजानला पाहताच मरीयमला आपले दु:ख आवरता आले नाही.

## कागदपत्रे ताब्यात घेतली

'आब्बाजान, आप बहोत देरसे पहुँचे. मैं बरबाद हुई. पूरी बरबाद !' असे म्हणत तिने खैरातअल्लीला मिठी मारली व मोठ्याने रडायला सुरुवात केली. इन्स्पेक्टर चित्तरंजन दास यांना तिचे अनावर दु:ख पाहून राहवले नाही. त्यांनी मरीयमच्या पाठीवर हात फिरवून तिचे सांत्वन केले.

जे मिरजेच्या पोलिसांना पधरा वर्षांच्या काळात करता आले नाही ते हैद्राबादच्या पोलिसांनी एका दिवसात करून दाखविले. हैद्राबादच्या पोलिसांकडे तक्रार आली तशी मिरजेच्या पोलिसांकडे आली नाही असे नाही. अनेक तक्रारी आल्या; पण खैरुन्निसाने खालपासून वरपर्यंत पेरलेल्या पैशाने त्या केराच्या टोपलीत फेकल्या गेल्या. उलट तक्रार करणारालाच पोलिसांकडून दमदाटया होत होत्या. जनतेचे रक्षक म्हणून कायदा व सुव्यवस्था राखणारी ही मंडळी खैरुन्निसाच्या ताटाखालची मांजरे होऊन लाचारपणे जगत होती. अन्याय करणारांच्या आदेशानुसार न्याय मागणाऱ्यांनाच चिरडीत होती. हैद्राबाद पोलिसाच्या धाडीने खैरुन्निसाच्या अनैतिक कृत्याचा जाहीर पंचनामा झाला, तसा मिरज पोलिसांच्या अब्रूची लक्तरेही वेशीवर लटकली गेली ! हैद्राबादचे पोलीस मिरजेच्या पोलिसाची नुसती नाचक्कीच करून थाबले नाहीत तर ते त्यांच्या मानगुटीवर येऊन बसले. त्यामुळे नाइलाजास्तव का होईना, मिरजेच्या पोलिसांना हालचाल करणे भाग होते. रात्री पोलीससबइन्स्पेक्टर मिराशी यांनी हालचाल करून बुरनखाँ मेहबूबखाँ पठाण व नूरजहाँ बुरनखाँ पठाण या दापत्याला ताब्यात घेतले. तसेच फसवून आणलेल्या मुलींचे विवाह बळजबरीने अरबांबरोबर लावण्याच्या आरोपावरून एका काझीला ताब्यात घेतले. त्याच्या घरातील झडतीत पाच रुपये किमतीचे रेव्हेन्यू स्टॅम्प्स, अंगठे उठविलेले कोरे स्टॅम्प्स, कोरे 'निकाह' फॉर्म, विवाहापूर्वीच तयार ठेवलेले 'तलाक–नामे', अरबांची लग्न लावलेली रजिस्टर्स व अन्य अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे पोलिसांनी हस्तगत केली.

७ ऑगस्ट १९८३ ला पोलिसांनी पुढे चालू ठेवलेल्या तपासात अनेक भयानक प्रकार उघडकीला आले. खैरुन्निसा (बडी माँ), तिची बहीण रहीमतबी मोमीन अहमद शेख (छोटी माँ) तिला मदत करणारे तिचे भाऊ, अरबाचे दलाल आणि त्यांच्या लांच्छनास्पद कृष्णलीला या कोणा एका धर्माच्या नावाला नव्हे तर

माणुसकीलाच काळिमा फासणाऱ्या होत्या, स्त्री-जातीची विटंबना करणाऱ्या होत्या.

खैरुन्निसाच्या घरात सापडलेल्या खतेजाचे लग्न एका आंधळ्या अरबाबरोबर लावण्यात आले होते. खतेजा होती १७ वर्षांची तर तो आंधळा होता ६८ वर्षांचा ! विजय लॉजमधील खोलीक्रमांक ८ मध्ये बिचारी खतेजा आपल्या शरिराशी हिडिस-चाळे करणाऱ्या ६८ वर्षांच्या अंध नवऱ्याकडे डोळ्यांत अश्रू आणून पहात होती !

ताहीरा सरफुद्दिन शेख हिचे लग्न एका अशाच अरब म्हाताऱ्याबरोबर लावण्यात आले होते. ती होती १६ वर्षांची व तो होता ७१ वर्षांचा ! लग्नाचे प्रमाणपत्र न मिळाल्याने ती त्या म्हाताऱ्या नवऱ्याबरोबर एका खाजगी जागेत राहत होती. तो देईल ते खात होती, सांगेल ते नेसत होती.

गौसियाबेगम मिर्झा मज्जिद हिचे लग्न अद्याप लावले गेले नव्हते; पण तिला एका अरबाबरोबर राहावे लागत होते.

खलीदाबेगम मोहंमद अली शेख हिला एका अरबाबरोबर अशोक लॉजमध्ये ठेवण्यात आले होते.

सर्वांत वयाने कमी असलेली, दिसायला एखाद्या नटीसारखी सुंदर दिसणारी चौदा वर्षे वयाची लईकबेगम हिचे लग्न एका साठीच्या अरबाबरोबर निश्चित करण्यात आले होते; पण तत्पूर्वीच त्या अरबाने तिचा ' पाणिग्रहणविधी ' लॉजच्या भिंतीआड उरकला होता.

दिनांक ९ ऑगस्ट ८३ ला पळवून आणलेल्या मुलींच्या संदर्भात तपासासाठी खैरुन्निसाची मुलगी ताहेराबी महंमद जुम्मा अब्दुल्ला व तिच्या घरातील मल्लेकाबी अलीहुसेन सय्यद, फरिदा मुरुबा ओबेदमघवी आणि सावेदा सालम या चार स्त्रियांना मिरज शहर पोलीससबइन्स्पेक्टर मिराशी यांनी अटक करून ताब्यात घेतले.






## मिरज–दुबई यंत्रणा !

पळवून आणलेल्या सहाही मुलींची वैद्यकीय तपासणी मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये ९ ऑगस्टला करण्यात आली. डॉक्टरांच्या रिपोर्टमध्ये सहाही मुली १४ ते १६ वयोगटातल्या असल्याचे नमूद करण्यात आले असून या सर्व मुलींना शरीरसंबंधाची सवय असल्याचे म्हटले आहे. या मुलींच्या घरचे वातावरण आणि त्यांची वयं पाहता त्या वेश्याव्यवसाय करीत नसाव्यातच. शिवाय पोलीसतपासातही तसे कुठे निष्पन्न झालेले नाही. याचा स्पष्ट अर्थ हाच की, खैरुन्निसाने या मुलींना पळवून आणून घरी ठेवल्यानंतर दोन महिन्याच्या काळात त्यांना शरीरसंबंध करणे भाग पाडले. यातल्या चार मुलींचे तर ' निकाह 'च लावण्यात आले होते. दोघी–तिघींची तर तीन–तीन, चार–चार लग्ने लावली गेली. तेव्हा अशा परिस्थितीत त्या कुमारिका असणे कसे शक्य आहे ? बाकीच्या ज्या दोघी आहेत त्यांच्या लग्नाची नोंद नाही. याचा अर्थ निकाह नाही. निदान त्यांचा तरी कौमार्यभंग झालेला नाही असा मेडिकल रिपोर्ट यायला हवा होता. आज तो आला नाही याचा अर्थ अधिकृतपणे अक्षदा टाकल्या नसल्या तरी त्यांना वापरण्यात आले होते, हाच निघतो. डॉक्टरांच्या रिपोर्टबद्दल मी एका तज्ज्ञ डॉक्टरांशी चर्चा केली. त्यांचे म्हणणे असे की, प्रथम झालेली बळजबरी किंवा बलात्कार दोन–तीन दिवसांच्या तपासणीत प्रथम शरीरसंबंध स्पष्ट करतो; पण सातत्याने सात–आठ दिवस ही प्रक्रिया पुढे घडत राहिल्यास त्या मुलीला शरीरसंबंधाची सवय आहे असा निष्कर्ष तपासणीत निघतो· तिला कधीपासून किंवा किती दिवसांपासून तशी सवय आहे याचा निश्चित कालावधी स्पष्ट होत नाही. हा सवयीचा काळ कमीत कमी आठ दिवसांचा पण असू शकतो.

पोलिसतपासात या सर्व मुलींना त्यांच्या पालकांना निरनिराळ्या थापा मारून व फसवून आणल्याचे निष्पन्न झाले. मरीयनला कामासाठी नोकरी देण्याचे आश्वासन देऊन आणले होते. तिला तिच्या काकूने म्हणजेच खैरातअल्लीच्या भावजयीने खैरुन्निसाच्या स्वाधीन केले होते. दुसऱ्या मुलींना, चल तुझे चांगल्या श्रीमंत अरबाबरोबर लग्न लावते, चांगला संसार उभा करून देते अशा भूलथापा देऊन आणले होते. साधारणतः ज्यांच्या घरी दारिद्र्य नांदते आहे, गरिबीने ज्यांची मुले–मुली उपाशी आहेत अशांच्याच घरी खैरुन्निसा किंवा त्यांचा एजंट संपर्क साधतो. सहजासहजी कोणीही आपल्या पोटचा गोळा त्यांच्या स्वाधीन करीत नाही. कोणी तरी नातेवाईक बरोबर येतोच अशा वेळी. त्याला पैसे देऊन किंवा हाणून-मारून परत पाठविले जाते असे स्पष्ट झाले आहे.

तपासात निष्पन्न झालेली सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे एका मुलीचे एकाच अरबाबरोबर लग्न लावले जात नाही, तर एकाच मुलीचे एकाच वेळी वेगवेगळ्या अरबांबरोबरही लग्ने लावली गेली आहेत. दोन महिन्यांच्या काळात या सहांपैकी चार मुलींची तीन–तीन चार–चार लग्ने लावली गेली आहेत. ' निकाह ' लावतानाच ' तलाक 'नामा तयार ठेवलेला असायचा. सात–आठ दिवसांत एका मुलीचा कंटाळा येताच अरब त्या पोरीला तलाक देऊन दुसरीशी




**मिरज एस. टी. स्टँडकडून मिशन हॉस्पिटलकडे जाणाऱ्या शिवाजी रोडवरील एका दवाखान्यासमोर आरबी भाषेत लावलेला बोर्ड–एका डॉक्टराचा.**

¤

निकाह लावीत असे. तलाक मिळालेली ही मुलगी खैरुन्निसा व तिच्या दिमतीला असलेल्या 'नकली' काझीतर्फे नूतन वधू बनून नव्या अरबाला नजर केली जायची. लग्नाच्या वेळी दलाली करणारेच सदर मुलींचे पालक बनल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांना माहिती सांगताना या मुलींनी बडी माँ–खैरुन्निसा आणि छोटी माँ– रहीमतबी मोमीन अहमद शेख या दोघींनीही मारहाण केली असल्याचे व गुलामगिरीने वागविल्याचे म्हटले आहे. या छाप्यात ही छोटी माँ पोलिसांच्या हातून निसटली होती; पण नंतर तिला हैद्राबादेत अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले.

सारी नीतिमूल्ये गुंडाळून ठेवून स्वार्थासाठी निरपराध बालकांच्या आयुष्याचे मातेरे करणाऱ्यांनी मिरजेपासून थेट दुबईपर्यंत एक जबरदस्त यंत्रणा उभी केली आहे. त्यामार्फत ते बिनधास्तपणे धुमाकूळ घालून लाखो रुपये कमवीत आहेत. या यंत्रणेचा फायदा लुटणारे, यंत्रणेला चालू ठेवणारे, सहकार्य करणारे, पूरक ठरणारे जाळे–उपजाळे शोधून काढणे हे काही एक दिवसाचे काम नाही. गेल्या मार्च–एप्रिलमध्ये वॉन्लेसवाडीच्या रिहॅबिलिटेशन सेंटरमधील गैरव्यवहाराची माहिती घेण्यासाठी म्हणून मी काही दिवस मिरजेत मुक्काम ठोकला होता. त्या वेळी सहज भटकण्यासाठी म्हणून शिवाजीरोडवर–म्हणजे सध्याच्या दुबईरोडवर दोन–तीनदा गेलो होतो. तेव्हा तिथे जे काही पहायला मिळाले तेव्हापासून अरबांच्या मिरजेतील वास्तव्याबद्दल लिहिण्याचे माझ्या डोक्यात सारखे घोळत होते. या विषयावर माझी श्री. ग. माजगावकर यांच्याशी अनेक वेळा चर्चाही झाली होती; पण वेळ सापडत नव्हता.

दरम्यान खैरुन्निसाच्या अड्डयावर सहा ऑगस्टला पोलिसांनी घातलेला छापा हिंदू एकताचे 'अरब हटाओ' आंदोलन, त्याला काही मुस्लीम विचारवंतांनी दिलेला पाठिंबा व सो. मुनादीने चढविलेला हल्ला या घटनांनी विषय अधिकच तापत गेला. दोन नोव्हेंबर त्र्याऐंशीला सकाळी मी मिरजेत पाऊल ठेवले.

## एजंटांचा आधार कोणाकोणाला ?

पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वेजंक्शन म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिरजेची तंतुवाद्यासाठीही बरीच ख्याती आहे. मिरजेचे हवामान हृदयरोग्यांसाठी विशेषतः क्षयरोग्यांसाठी अतिशय उत्तम आहे. हा हवेचा गुणधर्म प्रथम ओळखला तो ख्रिस्ती मिशनऱ्यांनी. भारतात १९ व्या शतकात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी जी अनेक रुग्णालये नावारूपाला आणली त्यातले 'मिरज मिशन हॉस्पिटल व सर विल्यम वॉन्लेस चेस्ट हॉस्पिटल' ही दोन सर्वपरिचित आहेत. साधारणतः ७५ वर्षांपूर्वी ही दोन्ही रुग्णालये अस्तित्वात आली. त्यांचा विस्तार मेडिकल कॉलेज व सेंटर, मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, रिचर्डसन लेप्रसी हॉस्पिटल असा होत गेला. या वैद्यकीय सुविधांच्या निमित्ताने १९२० च्या आसपास पहिला अरब मिरजेत येऊन धडकला. स्वातंत्र्यपूर्व संस्थानी काळात मिरजेतील वैद्यकीय सेवेत उत्तरोत्तर प्रगती होत गेली तसतसा मिरजेतील अरबांचा ओघही वाढत गेला आणि स्वातंत्र्यानंतर गेल्या ३६ वर्षांच्या काळात तर तो एकदमच वाढला. प्रारंभीचा जो ओघ वाढला तो वैद्यकीय सेवेच्या सुविधांमुळे आणि अलीकडचा ओघ मात्र जागतिक व्यापारपेठेत पेट्रोलचा भाव वाढत गेला तसतसा वाढत गेला. हा फरक लक्षात घेण्याजोगा आहे. १९७० नंतर तेलउत्पादक अरब राष्ट्रांनी पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत जी अपूर्व वाढ केली त्यानंतरच्या काळात मिरजेत येणाऱ्या अरबात झालेली वाढ लक्षणीय आहे. १९७२ ते ७७ या काळात साडेचौदा हजार अरब मिरजेत येऊन गेल्याची महाराष्ट्र शासनाची अधिकृत नोंद आहे. म्हणजे वर्षाकाठी सरासरी तीन हजार अरब मिरजेत येतात. ही वाढ १९८२ लाही टिकून होती; पण १९८३ च्या मोसमात मात्र घट झालेली आहे. त्याचे कारण खैरुन्निसाच्या घरावरील छापा, हिंदु एकताचे अरब हटाव आंदोलन व त्यानंतर उद्भवलेली परिस्थिती असे सांगता येईल.

सर्वसाधारणपणे वर्षभर अरब मिरजेत असले तरी त्यांचा खरा सिझन जुलै ते सप्टेंबर हाच असतो. या काळात सर्व लॉजेस 'फुल्ल' असतात. मी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात मिरजेत होतो. त्या वेळी मला सुमारे साडेतीनशे अरबांच्या वास्तव्याची नोंद मिळाली. त्यांचा तीन महिन्यांचा व्हिसा असतो. आल्यानंतर परकीय चलनाचे रूपांतर, पासपोर्टतपासणी या व अन्य कारणांनी ८–१५ दिवस अरब मुंबईत काढतात व बाकीचा दोन–अडीच महिन्यांचा काळ ते मिरजेत काढतात.

आखाती देशांतून परदेशांत जाणाऱ्या अरबांचे तीन गट पडतात. सर्वांत श्रीमंत असलेला, अनेक रिफायनरींचा मालक वा भागीदर असलेला अरब हा आर्थिकदृष्ट्या प्रथम वर्गात मोडणारा. तो इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी किंवा पूर्वेकडे जपानला जातो. औषधपाणी–मौजमजा करतो. दुसरा वर्ग, जो तिथे मिडलक्लास म्हणून ओळखला जातो तो साधारणतः चीन, पाकिस्तान वगैरे देशातही जात असला तरी प्रामुख्याने भारतात येतो. यातले सर्वजण मुंबई, बंगलोर, हैद्राबादला जातात आणि त्यांच्यातला तिसरा वर्ग म्हणजे हमाल, ड्रायव्हर, कामगार, वेटर हे मिरजेत येतात. मिरजेत येणारा नव्याण्णव टक्के वर्ग हा आहे. पासपोर्टवर इतर जे अनेक उल्लेख असतात त्यात त्यांच्या व्यवसायाचाही उल्लेख असल्याने ही माहिती उपलब्ध होते. भारत सरकारने 'मिरज' हे मेडिकल सेंटर जाहीर केलेले आहे. त्या दृष्टीने या तिसऱ्या वर्गात मोडणाऱ्या अरबांना मिरज फारच स्वस्त व परवडणारे न वाटले तरच नवल.


मिरजेत येणाऱ्या अरबांच्या वयाची पाहणी केली असता त्यात तरुण फार कमी आढळले. बहुतेक सर्व अरब साठी ओलांडलेलेच होते. याबाबत मी अनेकांकडे विचारणा केली असता त्यांनीही मिरजेत येणारा अरब हा वृद्धत्वाकडे झुकलेला अधिक प्रमाणात असतो हे मान्य केले. साधारणतः साठ टक्के अरब हे पन्नाशीच्या पुढचे. पंचवीस टक्के अरब तीस ते पन्नाशीच्या दरम्यानचे आणि अवघे पंधरा टक्के तिशीच्या आतले असतात. पासपोर्टवर वय लिहिलेले असतेच. शिवाय लॉजवरदेखील वयाची नोंद असते. त्यावरून ही आकडेवारी काढण्यात आली असल्याने त्यात चूक असण्याची शक्यता फार कमी!

मुंबईत आल्या आल्या प्रथम अरबी माणूस कॉन्सुलेटमधील अधिकाऱ्यांच्या मदतीने भारतीय बँकांत जाऊन अरबी डॉलरचे रूपांतर भारतीय चलनात करून घेतो. मुंबईहून देखील ते रोख बरोबर आणण्याच्या भानगडीत पडत नाही. कारणे काहीही असोत तो प्रवासी चेक घेऊन येतो व मिरजेच्या बँकांत वटवितो. प्रारंभी, मिरजेत परकीय चलनाचे व्यवहार चालतात असे मला समजले होते. म्हणून मी मुद्दाम बँकांशी संपर्क साधला; पण त्यात फारसे तथ्य नसल्याचे आढळून आले. मिरजेतील अरबांच्या आर्थिक व्यवहारांशी अत्यंत निकट संबंध असलेल्या एका मारवाडी व्यापाऱ्यानेही यास दुजोरा दिला आहे. परकीय चलनाचे व्यवहार चालतच नाहीत असे नाही; चालतात पण अगदी थोड्या प्रमाणात.

मिरजेत येणारा अरब प्रथम कोणते काम करीत असेल तर ते दवाखान्यात नाव नोंदविण्याचे. पासपोर्टवर येण्याचा हेतू लिहिलेला असतो त्यामुळे धडधाकट अरबाला देखील कोणत्या तरी दवाखान्यात नाव हे नोंदवावेच लागते. नंतर तो आपला मुक्काम एखाद्या लॉजवर हलवितो. अरबांनी नाव नोंदविल्यानंतर इतरत्र कोठे राहण्यास जाऊ नये म्हणून बऱ्याच डॉक्टरांनी आपल्या दवाखान्याचे रूपांतर 'क्लिनिक कम लॉज' मध्ये करून ठेवलेले आहे. ते त्यांना व्ही. आय. पी. ट्रिटमेंटही देतात.

मिरजेतील दोन ते अडीच महिन्याच्या वास्तव्यात एक अरब कमीत कमी ५० हजार रुपये आणि जास्तीत जास्त ५ लाख रुपये खर्च करतो. बँकांकडून उपलब्ध झालेल्या आकडेवारीवरून वर्षाकाठी १० कोटी रुपये अरब लोक एकट्या मिरजेत उधळतात. हा सर्व पैसा प्रामुख्याने १) दवाखाने, औषधखरेदी २) विवाह, बायको ठेवणे वगैरे ३) लॉजिंग, जेवण, खाणे–पिणे ४) मज्जिदीसाठी दिलेल्या देणग्या, बांधकामे, दानधर्म या चार कारणासाठी केला जातो. ते भारतात याव्यतिरिक्त खरेदी वगैरे मात्र काही करीत नाहीत.

पूर्वी या सर्वांना भरपूर पैसा मिळत असे. पण या सर्व क्षेत्रात आता एजंटांचा शिरकाव मोठ्या प्रमाणात झालेला असल्याकारणाने वरील संबंधितांच्या मिळकतीत बरीच घट झालेली आहे. अरबांच्या वाढत्या लोंढ्यांकडे बघून ज्यांनी मोठमोठ्या योजना आखल्या, शेखमहंमदी स्वप्ने पाहिली ते डॉक्टर्स, लॉजवाले, लग्ने लावणारी मंडळी, किराणा दुकानदार, मेडिकल स्टोअर्सवाले ही मंडळी या एजंटांच्या शिरकावामुळे बरीच अडचणीत सापडली आहेत. पूर्वी मिरजेत येणारा अरब सरळ येऊन लॉजमध्ये उतरे, दवाखान्यात नाव नोंदवी. एक रिक्शावाला व दुभाषा सोडला तर त्या 'मिडिएटर' कोणी नसे. आता असे नाही. 'अरब' दुबईच्या विमानतळावर येताच. भारतीय एजंट तयारीतच असतो. तो नवागत अरबाला मुंबईत कुठे जायचे ते सागतो व मुंबईला फोन करून 'गिन्हाईक' पाठविल्याचे कळवितो. तो अरब सहारा विमानतळावर उतरतो न उतरतो तोच हा मुंबईतला एजंट त्याला गाठतो व मिरजेत कुठे जायचे–रहायचे, कोणाला भेटायचे वगैरे सूचना देतो व मिरजेतल्या आपल्याही माणसाला कळवितो. अरबाने रेल्वेतून खाली पाय टाकण्यापूर्वीच हा मिरजेतला एजंट त्याला गाठतो व एका विशिष्ट ठिकाणी नेऊन त्याला ठेवतो, एजंट प्रथम निरनिराळ्या लॉजमालकांकडे, डॉक्टरकडे जाऊन कमिशन ठरवितो व जास्तीत जास्त कमिशन देणाऱ्या डॉक्टर व लॉजवाल्याकडे त्याची व्यवस्था करतो. हे करीत असताना 'सेवा' म्हणून अरबाकडून मिळालेले पैसे व डॉक्टर व लॉजवाल्याकडून कमिशन म्हणून मिळालेले पैसे यातला ठराविक हिस्सा आपल्या मुंबईतल्या एजंटाला देत असतो. ही एजंटसिस्टीम एवढ्यापुरतीच मर्यादित नाही तर बायका, रिक्शावाले, मेडिकल स्टोअर्सवाले, किराणा-दुकानदार, भाजीवाले यांनाही त्याच माध्यमातून धंदा करावा लागतो, किराणा दुकानदार, लॉजवाले, रिक्शावाले यांनी एजंटचा आधार घेणे एक वेळ समजू शकते; पण डॉक्टरांनी देखील एजंटाचे पाय धरावेत हे कितपत योग्य? ही वस्तुस्थिती आहे. पूर्वी दवाखान्याच्या निमित्ताने अरब आले. आता अरबांच्या निमित्ताने दवाखाने उभे राहात आहेत. हे गेल्या ३६ वर्षांतले स्थित्यंतर!



**मयूर लॉज समोरील रस्त्यावरून एजंट बरोबर खुषीत निघालेला अरब.**
**दुसऱ्या छायाचित्रात अल्पवयीन तब्बक–अरबांच्या लैंगिक चाळवांना खतपाणी घालणाऱ्या गोष्टी.**

¤

### मध्यवर्ती अड्डा–मिरज

औषधाच्या निमित्ताने येणाऱ्या अरबांचा 'निकाह', 'तलाक', 'तब्बक' आणि वेश्या असा प्रवास होत राहिला. प्रारंभीच्या काळात येणारे अरब औषधोपचारासाठी येत. निरनिराळ्या कारणांनी मुक्त हस्ते पैशाची उधळण करीत असत. सहाजिकच ही चांगली. 'गब्बर' माणसे आहेत हे मिरजेतल्या लोकांनी हेरले. हळूहळू अरबांचा लोंढा वाढत गेला तसतसा त्यांच्या दिमतीला राबणाऱ्यांचा एक गट अस्तित्वात आला. अरबांच्या राहण्याची, खाण्या-पिण्याची, त्यांना बाहेर नेण्या-आणण्याची व्यवस्था बघणाऱ्यांनी अरबांची शारीरिक अस्वस्थता हेरली. त्यांना स्त्रीसुख मिळवून देण्यासाठी प्रयत्न झाले. सुरुवातीला हे प्रकार तुरळकच होते; पण अरबांनी भरमसाठ पैसा ओतायला सुरुवात केल्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात–१९६२ नंतर वाढ झाली आणि १९७० नंतर तर कळसच झाला!

अरबांचे वास्तव्य दवाखान्यात आणि लॉजवर असायचे. त्या ठिकाणी वेश्या अगर 'बाई' पोचविणे अवघड असायचे. भारतीय दंडविधानाप्रमाणे एखाद्या पुरुषाने स्त्रीकडे जाणे हा गुन्हा नाही त्याचप्रमाणे एखाद्या स्त्रीने वेश्याव्यवसाय करणे हादेखील गुन्हा नाही; परंतु सार्वजनिक ठिकाणी वेश्याव्यवसाय करणे हा मात्र गुन्हा आहे. या कायद्यानुसार गुन्हा करणारी व्यक्ती, करायला लावणारी, सहकार्य करणारी, भाग घेणारी, प्रोत्साहन देणारी सर्वच मंडळी गुन्हेगार समजली जातात. एखादा भारतीय माणूस वेश्येला घेऊन लॉजमध्ये गेला व त्याने आपली पती-पत्नी अशी नोंद केली तर ती दोघे पती–पत्नी नाहीत हे सिद्ध करण्याची जबाबदारी लॉजमालकावर असते. तसे सिद्ध करणे फार अवघड. शिवाय त्या व्यक्तीबरोबरची बाई ही वेश्या आहे हे सिद्ध करणे तर त्याहूनही अवघड. त्यामुळे सर्रास लॉजेसवर हे प्रकार चालतात. संशयाचा हा फायदा भारतीयांना मिळतो, तसा अरबांना मिळणे कठीण. त्यामुळे वासनापूर्तीसाठी वेश्यांचा उपयोग अरबांना करता येत नसे. त्यांची अजागळ राहणी व ओंगळ स्वरूपामुळे भारतीय माणूस त्याला या कामासाठी घर देत नसे. वेश्यांच्या घरी जाणे सोयीचे नसे, हा एक भाग व दुसरा भाग म्हणजे संबंधित दलालांनी, लग्न केल्याशिवाय भारतीय स्त्रीशी संबंध ठेवता येत नाही अशी करून दिलेली समजूत, स्त्रीसंबंधाचा राजरोस मार्ग म्हणजे 'निकाह' हे या दलालांनी अरबांच्या पद्धतशीरपणे गळी उतरविले आणि 'निकाह'ला प्रारंभ झाला. हा 'निकाह' म्हणजे मुली विकत घेण्याचा कायदेशीर मार्ग आणि आता अरब अगदी उघडपणे या मुली खरेदी करण्यासाठीच येतात. कोंबड्या–बकऱ्या खरेदी कराव्यात तशा खरेदी करतात!

भारतात अरबांशी संबंधित असलेली चार ठिकाणे आहेत. ती म्हणजे मुंबई, बंगलोर, हैद्राबाद आणि मिरज; परंतु मुलींच्या बाब-

तीत जे काही घडते त्याचे मध्यवर्ती केंद्र आहे मिरज; सुरुवातीला लग्न लावणारे लोक, मुली आणणारे दलाल स्वतंत्रपणे काम करीत असत. नडल्या-अडल्या गोरगरिबांच्या अल्पवयीन मुली आणून, त्यांच्या आई-वडिलांना भरपूर पैसा देऊन ही लग्ने लावली जात; परंतु पंधरा वर्षांपूर्वी या क्षेत्रात खैरुन्निसाचा उदय झाला आणि तिने हळूहळू त्यावर कब्जा प्राप्त केला.

हा झाला 'निकाह्'. मुली कशा आणल्या जातात हे पहाणे आवश्यक आहे. मुली पुरविणाऱ्या एजंटाचे मुंबई, बंगलोर, हैद्राबाद, मिरज या भागात अक्षरशः जाळे विणले गेले आहे. बहुतेक मुली कर्नाटक आणि आंध्रातून आणल्या जातात. १) हे एजंट साधारणतः गोरगरिबांची घरे बघून त्यांच्या आई-वडिलांकडे जातात. त्यांना तुमच्या मुलीचे श्रीमंत अरबाबरोबर लग्न लावून देऊ, तुम्हालाही पैसे मिळतील वगैरे सागतात. समजावण्यासाठी इतर स्त्रियांचीही मदत घेतली जाते. २) विवाहाला तयार नसलेल्या मुलींना भरपूर पगाराची, कामधंद्याची, परदेशी पाठविण्याची वगैरे आश्वासने दिली जातात. ३) साधारणतः चंचलवृत्तीच्या मुलीना गाठून, त्यांना प्रलोभने दाखवून, फूस लावून, पैशाचे आमीष दाखवून किंवा तुझ्या प्रियकराबरोबर तुझे लग्न लावून देऊ असे सांगून या मुली ताब्यात घेतल्या जातात. ४) घरी भांडून बाहेर पडलेल्या, अडचणीत आलेल्या, भीक मागत असलेल्या मुली ताब्यात घेतल्या जातात. ५) या पाचव्या प्रकारात मुलीवर पाळत ठेवून त्यांना पळविले जाते. या सर्व मुली १२ ते १६ वयापर्यंतच्या असतात. क्वचित प्रसंगी १८ ते २० पर्यंतच्याही असतात.

## "मला दहा वर्षांत पंधरा जणांना विकलं"

एखाद-दुसरा अपवाद वगळता यांपैकी बहुतेकीना शरीरसंबंधाची माहिती नसते. त्यासाठी त्याना व्हिडीओ कॅसेटवर 'ब्ल्यू फिल्म' दाखवून मद्यपान करायला लावून शरीरसंबंधासाठी प्रवृत्त केले जाते.

वय आणि ठेवण यावर मुलीची किंमत ठरलेली असते. मुलगी २० वर्षांची किंवा १८ वर्षांची असल्यास १० हजार रुपये, १६ वर्षांची असेल तर १५ हजार रुपये आणि १४ किंवा त्याहीपेक्षा कमी असेल तर २० हजार-प्रसंगी पंचवीस हजारदेखील! १२ ते १४ वर्षांच्या मुलींसाठी अरब वाट्टेल तेवढा पैसा खर्च करायला तयार असतो.


मुलगी पसंत केल्याबरोबर त्या दराप्रमाणे रोख रक्कम दिली जाते. मग 'काझी', 'गवाहदार' या सर्वांना बोलावून 'निकाह्' लावला जातो. या 'निकाह्'च्या वेळीच 'तलाक' नाम्यावर सह्या झालेल्या असतात. मग हा अरब त्या मुलीला त्याच्या सोयीनुसार-आवडीनुसार आठ दिवस, पंधरा दिवस, महिना, दोन महिने जवळ ठेवतो. जाण्यापूर्वी किंवा कंटाळा आल्यास त्यापूर्वीच 'तलाक' देऊन दुसरा निकाह् करतो. मग ही मुलगी पुन्हा नव्या अरबापुढे उभी केली जाते.

सर्वसाधारण 'अरबी' माणूस शरिराने धिप्पाड असतो. भरपूर साडेसहा-सात फूट उंची. त्याचे प्रमाणात रुंदी. एकंदर दिसायला भव्य असतो; पण या अरबांना कोणत्याही मुली चालत नाहीत. १३ ते १४ वयाच्या आणि 'विदाउट टच' च्या मुलीसाठी अरबी माणूस अक्षरशः हपापलेला असतो. यावरून त्यांच्या विकृत कल्पना समजू शकतात.


'निकाह्' आला; त्याबरोबरच धर्माचाही प्रश्न आला. अरब धर्माने मुस्लिम म्हणून साहजिकच वधूही मुस्लिम आवश्यक असायची. अरबांनी भारतीय मुस्लिम मुलीबरोबर निकाह् लावले तरी त्यांच्याकडे पत्नी म्हणून कधीही पाहिले नाही. दासी, वासनापूर्तीचे तात्पुरते साधन हाच त्यांचा दृष्टिकोन. त्यामुळे लग्ने लावल्यानतर बरोबर नेण्यासाठी पासपोर्ट-व्हिसाची कोणतीच तरतूद नसते. भारतात विवाह केलेल्या ७५ टक्के मुलीना अरबलोक 'तलाक' देऊन किंवा मुंबई, बंगलोर, हैद्राबादेत सोडून जातात. कधीकधी बरोबर नेऊन स्टेशनवर तर कधी लॉजेसवरच सोडून निघून जातात, तर काही अरब त्या मुलीना सरळ मुंबईच्या कुंटणखान्यात विकून टाकतात.

जे पंचवीस टक्के अरब आपल्याबरोबर मुलीना घेऊन जातात त्यापैकी अगदी फार थोडे त्या मुलींना जवळ ठेवतात. बहुतेक जण सहा-सात महिन्यानंतर तिला विकून टाकतात. मग दुसऱ्याकडून, तिसऱ्याकडे असे ते दुष्टचक्र चालू राहते. लिहिता-वाचता येत नसल्याने त्या भारतीय तरुणीचे जिणे अक्षरशः पोतेऱ्यासारखे होते. मायदेशीची वाट बंद झालेली, तारुण्य संपलेले मग अशा वेळी त्यांना भीक मागण्याशिवाय पर्याय नसतो. अशा अनेक स्त्रियांना मिरजेतील एक प्रतिष्ठित श्रीमंत जी. बी. ऊर्फ बाळासाहेब शिंदे सरकार नारवाडकार यांनी आखाती देशात पाहिल्याचे मला सांगितले. त्यांनी सागितलेली एक हकीकत त्यांच्याच शब्दांत देतो.


दुसऱ्या महायुद्धानतर काही दिवस आखाती देशात गेलो होतो. लष्करातील एका मोठ्या हुद्द्यावर काम करीत होतो. सर्वसाधारणपणे 'स्त्री' ही बाब लष्करी जवानांना अप्रूपच वाटते. वर्षोनवर्षे घरातील बायकांचे दर्शन न घडल्याने लष्करातला माणूस, मग तो कोणत्याही देशाचा, जातिधर्माचा असो, तो थोडा 'त्या' बाबतीत 'लूज' असतो. ते नैसर्गिकही आहे. लष्करी लोकांची ही मनोवृत्ती लक्षात घेऊन अनेक स्त्रिया-वेश्या लष्कराच्या छावणीभोवती घिरट्या घालीत असतात. जेरुसलेममध्ये असताना रात्री मी एका हॉटेलातून ड्रिंक घेऊन बाहेर पडत असताना एक स्त्री दिसली. तिने माझ्या गाडीच्या जवळ येऊन चक्क हिंदीत 'भाईसाहब, मैं कलसे भूकी हूँ कुछ पैसा हो तो दे देना' असे म्हटले. मला तिची दया आली. गाडीतून उतरून मी तिला हॉटेलात घेऊन गेलो. भरपूर जेवायला घातले व वर काही पैसे देऊन तिची पाठवणी केली. जेवताना तिने जी स्वतःबद्दलची माहिती दिली ती अत्यंत हृदयस्पर्शी आहे. तिने सांगितले- मी भारतीय आहे. वयाच्या तेराव्या वर्षी एका अरबाने माझ्या आई-वडिलांना पैसे देऊन येथे आणले. त्यानंतर त्याने मला घरातली धुणी-भांडी करायला लावली. दिवसभर काम करायचे आणि रात्री त्याची शेज सजवायची असे त्याने मला सहा महिने जवळ बाळगले. त्या सहा महिन्यांच्या काळात त्याच्या कुटुंबातल्या प्रत्येक पुरुषाबरोबर मला झोपावे लागले. सात महिन्यानंतर त्याने मला परत दुसऱ्याला विकले. त्यानेही तोच प्रकार केला. दहा वर्षांच्या काळात मला १० ते १५ जणांना विकले. प्रत्येक अरब सहा-सात



श्री. नारायण कदम
अध्यक्ष–हिंदू एकता–महाराष्ट्र



श्री. प्रभाकर चौगुले
अध्यक्ष–मिरज हिंदू एकता



श्री. शंकर परशुराम तथा
बापूराव साठे

महिन्यांपेक्षा अधिक काळ माझा उपभोग घेत नसे. सध्या मला दोन मुले आहेत. मी आज अवघी पंचविशीतली आहे; पण माझ्या शरीरातले सर्व त्राण संपले आहे. जगण्यासाठी आता माझ्यापुढे एकच मार्ग आहे तो म्हणजे भीक मागण्याचा !'

काळे, तुम्हाला सांगतो ती तरुणी अक्षरशः एखाद्या चिपाडासारखी झालेली होती !

अरबांनी भारतातून नेलेल्या शेकडा नव्व्याणव तरुणींच्या नशिबाला यापेक्षा वेगळे जीवन जगता येत नाही हे नरवाडकर सरकार म्हणतात ते शब्दशः खरे आहे.

हिंदु एकता आंदोलनाचे अखिल भारतीय संघटक व सामाजिक कार्यकर्ते, एके काळचे धडाडीचे क्रांतिकारक सांगलीचे श्री. बापूराव साठे यांना भेटलो. त्या वेळी त्यांनी सौदीअरेबियात जाण्याची इच्छा नसलेल्या एका मुस्लिम तरुणीला मदत करताना त्यांचेही डोळे कसे पाणावले याची एक घटना सांगितली. हा प्रसंग बापूंच्याच शब्दात देतो.

## नसीम का रडत होती ?

: १९७५– जुलै–ऑगस्टचा महिना. आणीबाणी नुकतीच लागू झालेली. एक दिवस दुपारच्या वेळी राम जाधव व शिंदे हे शिवसेना कार्यकर्ते माझ्याकडे आले.

' बापू, तुमच्याकडे एक महत्त्वाचे काम आहे, ते करणार का ?'

त्यावर मी त्यांना सांगितले सर्व माहिती मिळाल्याखेरीज मी काही करणार नाही.

त्यावर त्यांनी सांगितले की, एका मुस्लिम तरुणीचा विवाह अरबाबरोबर लावण्यात आलेला आहे. तिची बाकी सर्व काही करायची तयारी असली तरी सौदीअरेबियात जाण्याची तिची इच्छा नाही. तेव्हा तुम्ही मदत केली तर तिची सुटका होऊ शकेल.

' मी या कामात मदत अवश्य करीन; पण त्या मुलीने स्वतःच्या तोंडाने तिची इच्छा सांगितली पाहिजे.'

असे त्यांना सांगताच ते परत मिरजेला गेले व दुसरे दिवशी त्या मुलीला घेऊन आले. त्या मुलीने स्वतःची सर्व हकीकत सांगितली. तिचे लग्न अरबाबरोबर झाले होते. वय १५ च्या आसपास; पण तिची जाण्याची इच्छा नव्हती. तिची इच्छा काय आहे याची खात्री करून घेतल्यानंतर पोलीसइन्स्पेक्टरना मी भेटलो; पण त्यांनी काहीच केले नाही. नंतर मी त्या वेळचे डी. एस. पी. वेंकटाचलम् यांची भेट घेतली. त्यांना सर्व हकीकत सांगताच ते म्हणाले, ' साठे, तुम्ही या लफड्यात विनाकारण कशाला पडता ? 'तेव्हा मी त्यांना सांगितले, ' साहेब, हा जातीधर्माचा प्रश्न नाही. ही मुलगी भारतीय आहे. आमचे जे काही मतभेद असतील किंवा आहेत ते येथे आमचे आम्ही सोडवू. कोणाही स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने परदेशात नेले जात असेल तर त्यास आपण प्रतिबंध केलाच पाहिजे'

माझी भूमिका ऐकून वेंकटचलम् चटकन उभे राहिले. ' बेटी, तुम डरो मत ' म्हणून तिच्या पाठीवरून हात फिरवला व तिचे सांत्वन केले आणि लोकल इंटेलिजन्स ब्रँचचे श्री. वझे व डिटेक्टिव्ह ब्रँचचे जगतापना त्वरित तपासाचा त्यांनी आदेश दिला.

दुसरे दिवशी तो अरब, काझी व बाकीच्या संबंधित मंडळींना पोलिसांनी अटक करून श्री. वेंकटाचलम् यांच्यासमोर हजर केले. परदेशी जाण्याचे संकट टळल्यानंतर माझे व श्री. वेंकटाचलम यांचे आभार मानण्यासाठी दुसरे दिवशी ती मुलगी आम्हाला भेटली. त्या वेळी तिचे अश्रू पाहून आमच्या डोळ्यांतही पाणी तरळले.

ही झाली बापूंनी सांगितलेली घटना. 'नसीम नावाच्या तब्बकने' पैसा, तारुण्य शरीरउपभोग व अन्य सुखे पायाशी लोळण घेत होती तरी


आई-वडील, बहीण, भाऊ, शेजारी-पाजारी आणि गावाकडील आठवणीने आपण कसे बेचैन होत होतो, रात्र-रात्र कसे रडत होतो हे डोळ्यांत पाणी आणून सांगितले. 'नसीम' इचलकरंजीजवळील एका खेड्यातली. आजूबाजूच्या हिंदू कुटुंबांत वावरलेली. सर्व मुस्लिम सणांबरोबरच दिवाळीत फटाके उडविलेली. श्रावणातल्या पंचमीत फेर धरून नाचलेली, हिंदू मैत्रिणींबरोबर रात्र-रात्र झोक्यावर खेळलेली, सहावी-सातवीपर्यंत शाळेत असताना पंधरा ऑगस्ट-२६ जानेवारीच्या प्रभातफेऱ्यांतून मिरवलेली, 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत' ही प्रतिज्ञा पाठ असलेली. तिने सांगितले की 'निकाह'नंतर पैसा आणि बाकीची सर्व सुखे पायाशी लोळण घेत होती तरी मी रात्रंदिवस रडत होते. फटाक्यांचे आवाज ऐकल्याबरोबर मला दिवाळीची आठवण होत होती. लाडू-करंज्यांचा वास नाकात दरवळायचा, श्रावणातल्या पंचमीची आठवण व्हायची, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी झेंडावंदनाची आठवण व्हायची. तीन वर्षे मी मस्कतला अक्षरशः रडत काढली व संधी साधून इकडे निघून आले. माझ्यावर 'तब्बक'चा शिक्का लागलेला आहे. गावी जाता येत नाही. 'तलाक' घेऊन पळून आले म्हणून घरचे नाराज आहेत. जगण्यासाठी म्हणा किंवा अंगवळणी पडले म्हणून म्हणा आता वेश्याव्यवसाय करणार; पण कितीही पैसे मिळाले तरी येथून जाणार मात्र नाही!

### तब्बक आणि वेश्याव्यवसाय

मिरजेत वर्षाकाठी अरब किती येतात किंवा गेल्या दहा वर्षांत किती आले याची आकडेवारी मिळवली; पण माझ्यापुढे मुख्य प्रश्न होता तो वर्षाकाठी किती लग्ने होतात? गेल्या दहा वर्षांत किती झाली? आणि आतापर्यंत एकूण किती लग्ने झाली असावीत? त्या दृष्टीने शासकीय माहिती काही उपलब्ध होती का ते पाहिले. १।६।८१ ते ७।१२।८१ या सहा महिन्यांच्या काळातील 'सँपल सर्व्हे'चा रिपोर्ट जिल्हाधिकारी कार्यालयात पाहायला मिळाला. त्यात या सहा महिन्यांत अवघे ८४ विवाह झाल्याची नोंद सापडली. तसेच १९७७ ते ८१ या पाच वर्षांच्या काळात ८४१ विवाह झाल्याची नोंद आहे; पण माझ्या निष्कर्षाप्रमाणे हा आकडा पूर्णपणे चुकीचा आहे. परदेशांतून भारतात येणाऱ्या, त्याचप्रमाणे मुंबईतून मिरजेत येणाऱ्या अरबांच्या पासपोर्टची ठिकठिकाणी काटेकोर तपासणी होत असल्याकारणाने येणाऱ्यांचा आकडा बरोबर मिळू शकतो; पण अरबांच्या बाबतीतला निकाह हा प्रकारच लबाडीचा असल्याकारणाने त्याची माहिती बरोबर मिळू शकली नाही. मुळात शासकीय अधिकाऱ्यांनी तपासलेले काझींचे रेकॉर्डच बनावट आहे, तर खरी माहिती कशी मिळू शकेल? हैद्राबाद पोलिसांनी ६ ऑगस्ट ८३ ला खैरुन्निसाच्या घरी जो छापा घातला त्यातल्या चार मुलींचे एकंदर १४ विवाह झाल्याचे स्पष्ट असताना, सहा महिन्यात एवढे कमी-८४ विवाह-कसे असू शकतील?

अरब 'निकाह' नंतर 'बिबीला' घेऊन लॉजमध्ये राहतो त्या वेळी त्याची नोंद लॉज-रजिस्टरमध्ये असते. त्यावरून तपास केला असता शासनाची विवाहाची आकडेवारी किती बोगस आहे हे लक्षात येऊ शकेल. १ नोव्हेंबर ८३ ते २० नोव्हें. ८३ या काळातील निरनिराळ्या लॉजच्या नोंदी मी पाहिल्या तर त्यात मला विवाहाची पस्तीस नावे सापडली. नोव्हेंबर हा काही अरबांचा सिझन नाही. त्या काळात एवढी नावे सापडतात तर वर्षात किती मिळतील?

शासकीय आकडेवारीनुसार १९७२ ते ७७ मध्ये १४५०० आणि १९७७ ते ८१ या काळात १५२२५ असे एकूण २९७२५ अरब आले. मिरजेत येणाऱ्या अरबांपैकी निम्म्यापेक्षा जास्त अरब विवाह करतात. वस्तुतः निकाह करणाऱ्या अरबांची टक्केवारी यापेक्षाही जास्त आहे. आणि अनधिकृत विवाहांची संख्या तर त्यापेक्षा कितीतरी जास्त आहे; पण वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी कमीत कमी पन्नास टक्के विवाह धरले तरी ७२ ते ८२ या दहा वर्षांच्या काळात



या विषयाच्या निमित्त अरब वस्तीत पत्रकार सुभाष काळे

सुभाष काळे हे मराठवाड्यातले. उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील. सोनारी हे त्यांचे गाव. गेली दहा वर्षे विद्यार्थी असल्यापासून ते वृत्तपत्रक्षेत्रात आहेत. औरंगाबाद व पुण्यातील नामवंत दैनिकांत त्यांनी वृत्तसंपादक, उपसंपादक, वार्ताहर म्हणून काम केलेले आहे. मराठवाडा विद्यापीठात एम. ए. (राज्यशास्त्र) ला असताना त्यांची कॉमनवेल्थ पार्लमेंटरी अभ्यासक्रमासाठी निवड झाली होती. दैनिक केसरीच्या सोलापूर विभागीय कार्यालयात काही काळ वृत्तसंपादक म्हणून काम केल्यानंतर गेल्या सहा-सात महिन्यांपासून ते स्वतंत्रपणे (फिलान्स) वृत्तपत्रीय लिखाण करीत आहेत. 'माणूस'मधील त्यांच्या 'पण अजूनही लढा संपलेला नाही' या पहिल्याच लेखाला, मुंबई मराठी पत्रकार संघाने आयोजिलेल्या 'डहाणूकर पत्रकरिता पारितोषिक' स्पर्धेत-विशेष लेखाचे 'लोकहितवादी देशमुख' पारितोषिक नुकतेच जाहीर झालेले आहे.

**—अभिनंदन**

१५ हजार विवाह तरी झाले असावेत. म्हणजे वर्षाकाठी १५०० लग्ने होतात. या विवाहांची संख्या एवढी भरमसाठ वाढल्यानेच त्यातले गैरप्रकार वाढले. नसता वर्षाकाठी शंभर लग्नांसाठी मुली पळविणे वगैरे करण्याच्या फंदात कोण पडले असते ?

निरनिराळ्या कारणांनी 'तलाक' कमी होत गेले. गेल्या सहा महिन्यांपासून–खैरुन्निसावरील धाडीपासून–तर जवळपास बंदच आहेत, परंतु मागच्या 'निकाह'तून प्रचंड संख्येने 'तलाक' झाले आहेत· या 'तलाक' पीडित अबलांतून 'तब्बक'ने जन्म घेतलेला आहे. तब्बक हा गेल्या आठ–दहा वर्षांतील प्रकार आहे. 'तब्बक'चा अर्थ 'स्वयंपाकीण.' पूर्वी अरबांशी 'निकाह' लावलेल्या अरबांचे खाणे–पिणे व अन्य सवयी माहीत असलेल्या या तरुणी आहेत. अरबांना भारतीय पद्धतीचे तिखट व चरचरीत जेवण चालत नाही. त्यासाठी स्वतःच्या पद्धतीचा स्वयंपाक करून खाऊ घालण्यासाठी ही 'तब्बक' ! अरबांच्या या स्वयंपाकाचे फॅड आणि 'तब्बक'चे लाड फक्त मिरजेतच चालतात. इंग्लंड, अमेरिका इतकेच कशाला मुंबई, हैद्राबाद, बंगलोर येथे अरब झक मारत हॉटेलमध्ये जेवतो. तर ही स्वयंपाकीण याने की 'तब्बक' हा 'निकाह', 'तलाक' तसेच अन्य कटकटींपासून मुक्त असणारा पण कधीही स्त्रीसुख उपलब्ध करून देणारा, कायदा, समाज, जबाबदारी यापासून संरक्षण देणारा प्रकार. लॉजमध्ये वेश्या नेता येत नाहीत; पण 'तब्बक'साठी कायदा नाही. शासनाला घटनेत दुरुस्ती करून 'तब्बक'साठी कायदा करण्याची पाळी या अरबांनी आणली आहे. तेव्हा त्यांना अडाणी कसे म्हणता येईल ?

सध्या मिरजेत 'तब्बकांची' संख्या तीनशे ते चारशेच्या दरम्यान आहे. 'तब्बक' होण्यासाठी 'निकाह', 'तलाक' याच्या भानगडीत जावे लागत नाही किंवा धर्माचाही प्रश्न येत नाही. शिवाय अरबांशी सलगी साधून पैसेही मिळवता येतात. त्यामुळे अनेक 'ख्रिश्चन', 'हिंदु' वेश्यांनी यात आपला शिरकाव करून घेतला आहे. मुळात 'तब्बक' हा वेश्याव्यवसायच आहे. अरब आहे तोपर्यंत 'तब्बक' स्वयंपाकीण त्याची भोगदासी. तो परत गेला की, वेश्याव्यवसाय, अशा या 'तब्बकां'ची मोठी वस्ती डॉ. गायकवाड यांच्या दवाखान्यासमोरील कॉन्व्हेंट स्कूलच्या मागे आहे. त्या वस्तीचे नावही मोठे गंमतीशीर आहे. त्याला 'इस्रायलनगर' म्हटले जाते. हे नाव कसे पडले ? कधी पडले ? खरोखरच तेथे 'ज्यू' लोक राहात होते का ? याचा मी शोध घेण्याचा बराच प्रयत्न केला; पण काही समजू शकले नाही. या 'इस्रायल'नगर नावामागची कारणे काहीही असोत इस्रायलीं'च्या पराक्रमापुढे शेपूट घालून पळणाऱ्या अरबांचे हे एक मानसिक समाधानच असावे.

---

पोलिसांनी खैरुन्निसावर घातलेल्या छाप्यात काही 'निकाहनामे' जप्त केले. त्यातील एका 'निकाहनाम्यावर' पालक म्हणून सही केलेल्यांची वये पाहण्याजोगी आहेत. 'निकाह' लावून घेणारी वधू आहे १६ वर्षांची व पालक म्हणून स्वाक्षरी करणारा इसम आहे अवघा १९ वर्षांचा ! एवढ्या कमी वयात एका विवाहयोग्य कन्येचे पालन करणारा हा इसम अनेक मुलींचा पालक बनल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

---



**सय्यद लंगडा–अल्पवयीन मुलगी त्याच्या फासात अडकली**

¤

अरबांना फक्त मुलीच लागतात असे नाही. त्यांना मुलेही लागतात. एक दिवस शिवाजीरोडवरील एका डॉक्टरांना भेटायला गेलो असताना एक मुलगा साधारणतः ११–१२ वर्षांचा फेंगडत बाहेर पडताना दिसला. त्याच्या हातात शंभर रुपयांची कोरीकरकरीत नोट होती. बाहेर रिक्शावाला तयार होता, तो त्याला घेऊन निघून गेला. दवाखान्यात बरेच अरब राहत होते. डॉक्टरांचा पत्ता नसल्याकारणाने त्यांची भेट झाली नाही; पण पाहिलेल्या घटनेचा छडा लावायचे मी ठरविले. मिरजेतील वीस दिवसांच्या वास्तव्यात मात्र तसा प्रकार परत कुठे आढळून आला नाही. तरी घडतात हे मात्र अनेकांनी मान्य केले. बाळासाहेब शिंदे नरवाडकर सरकार यांनी अशी एक घटना ऐकल्याचे व त्या मुलाला टाके घालावे लागल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी श्री. रत्नाकर वाघ यांनीदेखील आपण असे प्रकार घडतात असे ऐकल्याचे सांगितले. याबाबत एका रिक्शाड्रायव्हरला विचारले असता, 'साहेब, त्याला 'नास्ता' म्हणतात' एवढेच सांगून त्याने अधिक भाष्य करण्याचे टाळले. निकाह लावणारे जसे एजंट आहेत, तसे अरबांना मुले पुरविणारेदेखील एजंट आहेत असे मला सांगण्यात आले. अरबांच्या वास्तव्याच्या ठिकाणी दहा–बारा वर्षांच्या मुलांचा जो घोळका नेहमी असतो त्यामागचे कारण कदाचित हेही असावे.

अरबांच्या रंगेल वृत्तीची अशीच एक थक्क करणारी हकीकत एका पोलिसाने सांगितली. एका सत्तरी उलटलेल्या अरबाचे दोन्ही पाय अपघातात गेले होते. डॉक्टरांनी ते गुढघ्यापासून तोडून टाकले. असा हा दोन्ही पायांनी लंगडा असलेला अरब दुबईहून दोन एजंटांच्या मदतीने मिरजेत आला. कोणतीही गोष्ट करताना त्याला मदत लागायची. अशा परिस्थितीतदेखील त्याचे बायकांचे वेड सुटलेले नव्हते. तो दोन्ही एजंटांच्या मदतीने 'तब्बक'च्या घरी जात असे.

मिरजेत येणारे सर्वच्या सर्व अरब रंगेल असतात असे मात्र नाही. काही अरब येताना आपल्या बायकामुलांनाही घेऊन येतात; पण त्यांचे प्रमाण इतके अल्प आहे की, ते या विषयाचा संदर्भात विचारात देखील घेता येणार नाही. काही काही बायकोला बरोबर घेऊन येतात; पण मिरजेच्या वातावरणात बिघडतात. अशाच एका अरबाची बायको मिरज शहर पोलिसांकडे 'तब्बक' व नवऱ्याला घेऊन आली होती. आम्हाला 'तब्बक' नको. त्यामुळे माझा नवरा बिघडला आहे. मी स्वतः स्वैपाक करू शकते. तुम्ही मला मदत करा आणि तब्बकला मज्जाव करा!' असे ती पोलिसांना सांगत होती. खुद्द पोलिसांच्या तोंडूनच हे मी ऐकले असल्याने साहजिकच मग तुम्ही काय केले ? असा प्रश्न मी पोलिसांना विचारला. काय करणार ? तक्रार न घेता तिला परत पाठविले--पोलीस.

परत पाठविले ! का ? येथे तर 'आपल्याला मदत हवी काय ? म्हणून चक्क बोर्ड लावलेला आहे. असे असताना तुम्ही मदत न करता तिला परत कसे काय पाठविलेत ?'– मी. 'दुसरे' कोणते कारण असणार ? मुस्लिम पर्सनल लॉ. त्यात आम्हाला काहीच हस्तक्षेप करता येत नाही--पोलीस.

( क्रमशः )



अरब-हटाव आंदोलनात हिंदू एकताचे कार्यकर्ते.

¤


अरबांच्या मिरजेत चाललेल्या गैरकृत्यांना मुस्लिमांनी विरोध करून त्याचा निषेध केला पाहिजे. हिंदू एकताच्या आंदोलनास सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे व अशी गैरकृत्ये थांबविली पाहिजेत असे स्पष्ट मत एस. टी. इंटक युनियनचे आटपाडी आगाराचे सेक्रेटरी श्री. आय. एम. शेख यांनी दै. 'प्रतिध्वनी'च्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले.

त्याबाबत अधिक बोलताना त्यांनी सांगितले की, भारतीय भगिनींची आज मिरजेत अरबांकडून चाललेली विटंबना कोणताही भारतीय नागरिक, मग तो कोणत्याही जातीधर्मांचा असो, तो ते सहन करणार नाही. त्यांची मिरजेत चाललेली गैरकृत्ये थांबलीच पाहिजेत ! १६ ऑगस्ट १९८३ पासून सुरू झालेल्या 'अरब हटाव' मोहिमेस आपला जाहीर पाठिंबा तर आहेच, उलट आपण वेळ पडलीच तर या मोहिमेत सक्रिय भागही घेणार आहोत असे त्यांनी म्हटले आहे.

मिरजेत चाललेल्या या गैरकृत्यांना कोणताही मुस्लिम पाठिंबा देणार नाही आणि अशा प्रकारची गैरकृत्ये रोखण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना केली पाहिजे असेही त्यांनी म्हटले आहे.

–'दैनिक प्रतिध्वनी'
मिरज
दिनांक १०।८।८३

**[ या लेखातील छायाचित्रे सायंदैनिक ललकार आणि दै. नवसंदेश यांच्या सौजन्याने. ]**



आजचे कवी

कवठेकरांच्या व्यक्तिमत्त्वाला व त्यांच्या कवितेलाही समंजसपणाचा, काहीशा अलिप्तपणे अनुभवाला न्याहाळण्याचा अत्यंत अवघड असा तोल लाभलेला आहे व तो त्यांच्या एकूण कविप्रकृतीतला फार महत्त्वाचा घटक आहे...

लेखांक सहा

अविनाश सहस्रबुद्धे

# वाचणाऱ्याला समृद्ध करणारी कविता

नारायण कुलकर्णी कवठेकरांच्या 'हे माझ्या गवताच्या पात्या' या कवितासंग्रहावर लिहिताना सुरुवातीलाच आवर्जून सांगितले पाहिजे ते हे की, कवठेकरांची कविता वाचणे हा वाचकालाच समृद्ध करणारा असा अनुभव आहे. वाचकाच्या संवेदनशक्तीला आवाहन करणारा व कविता आणि वाचक यांच्यातील संबंध निकटचे करणारा हा अनुभव आहे. शब्दांनीच ज्याला हाका माराव्यात असा हा कवी आहे. प्रातिनिधिक कविता ही जनसामान्यातील स्पंदनांना, प्रतिक्रियांना, विचारभावनांना जाहीर उच्चार देत असते असे आपण म्हटले तर कवठेकरांची कविता ही आजची प्रातिनिधिक कविता आहे असे म्हणता येईल.

कवठेकर त्यांना येणारे अनुभव तीव्रपणे घेत आहेत व त्यांचा अत्यंत प्रभावी, प्रांजळ आविष्कार आपल्या कवितेतून करीत आहेत हे त्यांची या संग्रहातील कविता वाचताच चटकन जाणवते. कवठेकरांच्या व्यक्तिमत्त्वाला व त्यांच्या कवितेलाही समंजसपणाचा, काहीशा अलिप्तपणे अनुभवाला न्याहाळण्याचा अत्यंत अवघड असा तोल लाभलेला आहे व हा तोल त्यांच्या एकूण कविप्रकृतीतला फार महत्त्वाचा घटक आहे.

कवठेकरांची कविता वाचताना मला तुर्की कवी 'नाजिम हिक्मत'च्या कवितेची आठवण होत होती. व्हियेतनामी कवी 'तो हू' ने त्याच्या कवितेबद्दल लिहिताना म्हटले आहे की, तो कोणत्याही घरात घुसतो. तो भोगतो, धगधगतो आणि प्रत्येक संवेदनशील हृदयात सहजपणे शिरतो. तो बोलायला लागला की, वाटतं आपल्यापैकी प्रत्येकाशी बोलतोय. कवितेतून आपल्याच रोजच्या संघर्षाला व्यक्त करतो तेही कुठलेही ढोल न बडवता. मोठमोठ्या शब्दांचे इमले न उभारता. कवठेकरांच्या कवितेच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. प्रस्थापित समाजरचनेविषयी वाटणाऱ्या तीव्र असमाधानाचा उद्रेक त्यांच्या कवितेत ठायी ठायी दिसतो; परंतु या उद्रेकामागे आहे ते संवेदनशील कविमन. बांधिलकीचा उद्घोष नुसता पुरेसा नसतो. बांधिलकी नेहमीच गंभीरपणे, जबाबदारीने स्वीकारावी लागते. हे गांभीर्य, जबाबदारीची ही जाणीव कवठेकरांच्या कवितेत आहे व म्हणूनच ती आततायीपणा व्यक्त करत नाही किंवा 'संघर्षाचे ढोल'ही बडवत नाही, पुरोगामित्वाच्या घोषणा करीत नाही. दुःख, अन्याय, विषमता व दारिद्र्य ह्यांनी मानवी जीवनाला आणलेल्या अवकळेच्या चिंतनातून आलेली ही बांधिलकी, वैचारिकता आहे. त्यामुळे आजच्या दलित अथवा पुरोगामी कवितेतल्यासारखा पोकळ बंडाचा वगैरे आविर्भाव तिच्यात नाही. दलित कवींसारखे ते इथले सांस्कृतिक व वाङ्मयीन संस्कारही नाकारताना दिसत नाहीत. संस्कृतीत जे मुरलेले आहे त्याच्याकडे कानाडोळा करण्याची, पाठ फिरवण्याची त्यांच्या कवितेची वृत्ती नाही. म्हणूनच समकालीन कविता व कवठेकरांची कविता यांच्यातील संबंधांचा शोध घेतला तर तो काही प्रमाणात नारायण सुर्व्यांच्या कवितेशी आहे असे म्हणता येईल. बांधिलकी स्वीकारूनही सुर्व्यांच्या कवितेवर जसे अभिनिवेश आणि अतिशयोक्ती यांचे वर्चस्व आपल्याला दिसत नाही, तसेच ते कवठेकरांच्या कवितेवरही दिसत नाही. त्यामुळेच चांगल्या कवितेचा जो विशुद्ध व आदर्श परिणाम व्हायला हवा तो तिच्यातून होताना दिसतो.

प्रत्येक कवीला स्वतःच्या परिसरात, अवतीभवतीच्या समाजवास्तवात काही अनुभव येत असतात व त्याच्यावर काही संस्कारही होत असतात. त्यातूनच त्याची जडणघडण होत असते. कवठेकरांच्या बाबतीतही हे झालेले दिसते. कवठेकरांच्या अनुभवविश्वाचा परिसर हा प्रामुख्याने खेड्यापाड्यांतील पिचलेले जनसामान्यांचे जीवन हा आहे. त्यांच्या अवतीभवतीचे समाजवास्तव हे स्वातंत्र्योत्तर पिढीने पाहिलेले, अनुभवलेले मोहभंगाचे, दारुण निराशेचे वास्तव आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर ध्येयनिष्ठेचे युग संपले आणि सत्तास्पर्धेचे, सत्तासंघर्षाचे युग सुरू झाले. जीवनातील सर्व विसंगतींचा उद्रेक होऊन भारतीय जीवनाचे चित्रच पालटले. विषमतेची दरी अधिकच रुंदावत गेली. खेड्यापाड्यांतील दारिद्र्य, बेकारी, अन्याय वाढतच गेले. स्वातंत्र्योत्तर काळात जन्माला आलेली पिढी हे सगळं उघड्या डोळ्यांनी पहात होती; परंतु तत्त्वप्रणालीवर आधारलेल्या संघटित चळवळींचाही अभाव असल्यामुळे काय करावे हेच तिला कळत नव्हते. हतबलतेची अवस्था व न फुटणारी आर्थिक कोंडी यांच्यात ही तरुण पिढी अडकलेली होती. कवठेकरांच्या कवितेतून याच तरुण पिढीच्या स्पंदनांना-विचार-भावनांना जाहीर उच्चार मिळालेला आहे. कवठेकर हेही स्वातंत्र्याचे दशक उजाडल्यानंतर याच खेड्यापाड्यांच्या परि-

सरात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले कवी आहेत. तरुण पिढीचे हे दुःख, हे अनुभव कवठेकरानी भोगलेले आहेत. ते त्यांच्या मनात खोलवर झिरपलेले आहेत. म्हणूनच त्यांच्या कविताना भोगलेल्या परिस्थितीचे तर संदर्भ आहेतच; परंतु या सदर्भातही सार्वत्रिकतेची बैठक आहे. त्यांची मुळे इथल्या मातीत, खेड्यापाड्यातील दैनंदिन जीवनसंघर्षात रुजलेली आहेत म्हणूनच या कवितेचे उद्‌गार उसने वा परके वाटत नाहीत. कवठेकरांची कविता अंतःकरणाला भिडते ती त्यामुळेच. खेड्यातील जीवनाशी, सुखदुःखांशी एकरूप झालेलं हे मन आहे. त्यामुळेच हे मन 'मी'च्या भाषेत कधी बोलले तरी त्याभोवती संदर्भ असतात ते 'आम्ही'चेच. त्यातूनच मग

मी खदखदतोय या धरतीच्या उरात,
धग उभ्या विश्वाची तळहातावर घेऊन
मी अशांत
प्रसादाच्या निऱ्या उस्कटायच्या नाहीत
मला,
मला शोकेसेसमधील आत्मे मोकळे
करायचेत.

हे 'एका सामान्याचे स्वगत' या तरुण पिढीचेच स्वगत होते. इथेही 'प्रासादाच्या निऱ्या उस्कटायच्या नाहीत मला' असे जेव्हा कवठेकर म्हणतात तेव्हा त्यांचे या संघर्षातही शाबूत राहिलेले विवेकशील मनच दिसते.

अगाराला शेज करून पेज पिणाऱ्या
आयाची शपथ—
मी त्याच्या गर्भांना औरस बनवीन सारे
श्लेष उध्वस्त करून
मी लिहीन एक निलंकारी गाणे, मी
डोळ्यांच्या भाषेला लिपी देईन.

असे म्हणणारे हे मन आहे. पहिल्या ओळीत कवठेकरांनी खेड्यातील धगधगते वास्तव उघडे केले आहे. दुसऱ्या ओळीत हे वास्तव उध्वस्त करण्याची आकांक्षा आहे. कवठेकरांचे वैशिष्ट्य हे की, उध्वस्त करण्याची ही आकांक्षा व्यक्त करूनच ते थाबत नाहीत तर नव्या जीवनाचे निलकारी गाणे लिहिण्याची प्रेरणाही ते या तरुण पिढीला देतात.

कवठेकराच्या या अनुभवविश्वातूनच एक वृत्ती निर्माण झालेली दिसते व तिची परिणती एकंदर जीवनाविषयीच काही प्रतिक्रिया व्यक्त होण्यात झाली आहे. 'शेजारधर्म', 'एका सामान्याचे स्वगत', 'आवाहन', 'रंग', 'सुरुंग', 'गवत', 'उपदेश', 'नंदीबैल', 'डरपोक', 'गढी', 'अखेर', 'शिक्षण', 'संकेत' या कवितांमधून जीवनविषयक अशाच अनेक प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत·

'एका सामान्याचे स्वगत' या कवितेत कवठेकरांनी सामान्य माणसाच्या आजच्या लढ्यातून उदयाला येणाऱ्या उद्याच्या भविष्याचा वेध घेतला आहे. सामान्य माणसाचा हा लढा 'पाऊलवाटेकडून राजपथाकडे' जाणारा आहे. 'आवाहन' या कवितेतही या सघर्षाचेच चित्रण आहे आणि कवी संघर्षशील या मनाला, 'हे माझ्या गवताच्या पात्या, तुडवल्यानतर पुन्हा मान उचलायचे तू विसरू नकोस!' असे बजावून सांगतो. 'रंग' या कवितेत कवीने राष्ट्रध्वजातील तीन रंगांचे व अशोकचक्राचे वर्णन करून त्यातून स्वातंत्र्योत्तर काळातील समाजवास्त-

## नंदीबैल

आता या नदीबैलांमध्ये उरला नाहीय बैलाचा कुठलाही गुणधर्म बाकी.
पाठीवर माती टाकताच थरारण्याइतकी कातडी नाही राहालीय संवेदनशील,
यांच्या आता पितळेच्या कड्या लावून अलंकारलेल्या शिंगांना
उरली नाहीय हौस चिखलाचे घोस तुऱ्यासारखे मिरवण्याची
आणि घट्या अडकवलेले गळे विसरलेत समोर आपल्या
गायीचा यार दिसताच डरकाळणे
आणि आता यांना आठवतही नाही मेघांच्या गडगडाटाला प्रत्युत्तर म्हणून
नागाच्या फण्यासारख्या शेपट्या उंचावून उंडारणे.
मानेवर जू न ठेवण्याचे आश्वासन
आणि आयत्या खळ्यात तोंड खुपसण्याचे प्रलोभन
यामुळे बैल झालेत मवाळ–आड न ठेवताच.
आता कुठल्याही दारी हे बेलाशक उभे राहतात,
बायाबापड्यांकडून हळदकुंकू वाहून घेतात.
झुलीमधल्या झोळीत पसाभर पडले की खूष होतात
आणि गुबूगुबू असे वाजताच तडफेने मान हलवून
धन्याच्या भरभराटीची ग्वाही देतात.

## आयुष्य

आयुष्य कसे उद्‌ध्वस्त होत गेले चरितार्थाच्या प्रश्नांबरहुकूम.
जुळवत आणलेले धागे तुटत तुटत गेले कारण नसताना.
कुठल्याच गोष्टीचे लगाम हाती नव्हते–स्वतःचेसुद्धा
कधीमधी येणारे प्रामाणिक आक्रोशही गोठून गेले
नकली विस्मरणप्रयोगांच्या गर्तेत. सुपाएवढे मन करून
जगण्याचे सारे प्रयोग हास्यास्पद झाले
आणि पावले पिंजून काढणाऱ्या रस्त्यांची जवळीक वाढतच राहिली.
मैनेची साद–एक भुलावण, पाखरांचे थवे एक हुलकावणी
साऱ्या क्षणांचे चेहरे वायुरूप...अशा कित्येक आठवणी.
देहाच्या हाका आणि मनाचे पापुद्रे तलम सांधताना
उगीच विझून बदनाम झाल्या चार डोळ्यांच्या कथा.
सांगूनही खरी वाटणार नाही आपलीच कथा आपल्याला.
आज ओळख नाकारेल आरसाही आणि प्राक्तन ?
हा शब्द तर काही कारण नसताना लगडलाय प्रत्येक मुजोर क्षेपेला
आणि क्षेपा रोखणे तर प्राक्तनाच्याही अधिकारात नाही.

वाचे कठोर दर्शन घडविले आहे. आपल्या राष्ट्रध्वजात जे तीन रंग आहेत त्यांचा कवीला अभिप्रेत असलेला अर्थ अगदी वेगळा आहे. कारण या रंगांच्या द्वारे तो आजचे भेसूर वास्तव पाहू शकतो. ह्या रंगांचे त्याग, शांतता आणि समृद्धी हे प्रच-लित अर्थ आता कुचकामी ठरले आहेत. अशोकचक्राला आरे आहेत ते विविध झाडांचे. आजच्या समाजव्यवस्थेत नव्या रक्ताला वाव नाही आणि तीन रंगांवर म्हणजेच प्रस्थापित व्यवस्थेवर हक्क सांगणारी माणसं अशोकचक्रातील आऱ्यांनीच आपसात यादवी करीत आहेत. ती लढताहेत, परंतु मरत नाहीत ही वास्तवतेची प्रखर जाणीव देऊन शेवटी कवी म्हणतो, 'आऱ्यांच्या धारा बोथट होत चालल्याहेत आणि तिन्ही रंग माझ्या डोळ्यांसमोर भडक लाल–काळ्या संभ्रमात विरत आहेत.' 'सुरुंग' कवितेत कवीने अन्यायाविरुद्धची प्रतिक्रिया प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली आहे. ही कृती सर्व शोषितांनी शोषकांविरुद्ध एकत्र येण्याची व त्यातूनच 'जिवंत सुरुंग' पेटवण्याची आहे. कवी म्हणतो की–

आता आहे वेळ की सोडून आपापल्या ढोल्या
आक्रमावी एकच दिशा दमदारपणे अन् उक्तीतला
आवेश न दवडता आणून मनगटात टिपत जावा एकएक
सनातन तंबू, घेरावी एकएक सुखवस्तु राहुटी.

'गवत' कवितेत कवठेकरांनी शहरी संस्कृतीतील कृत्रिमतेला आणि दिवसेंदिवस खचत जाणाऱ्या माणुसकीला शब्दबद्ध केले आहे. 'डरपोक' कवितेत त्यांनी आजच्या असहाय, अगतिक, दमलेल्या माणसाचे चित्र रेखाटले आहे.

त्याच्या अंगाला कोणी हात लावीत नाही.
कारण त्याच्या डोळ्यांत ठाम आश्वासन असते
वाहतुकीचे नियम न मोडण्याचे
आणि कुठलाही नवा नियम त्याच्यासाठी सवय होऊन जातो
कालांतराने
जसे गाईच्या गळ्याला
ओझे वाटेनासे होते लोढण्याचे.

असा हा मनुष्य आहे. त्याच्याविषयीची कवीची प्रतिक्रिया, 'मला वाटते, तोच माणसांमध्ये खरा आहे, अंधारात स्वतःवरच थुंकणाऱ्या तुमच्यापेक्षा बरा आहे.' या शब्दांमधून व्यक्त झाली आहे. 'गढी' ही रूपक कविता आहे. गढीच्या रूपकातून कवीने सरंजामशाहीतील चिवट मूल्ये, परंपरा, अंधश्रद्धा, जातीयता, धार्मिक कर्मकांड अशा अनेक गोष्टींनी तयार झालेल्या आजच्या वास्तवाचे चित्रण केले आहे व ही 'भक्कम गढी' कोसळण्याची आवश्यकता सांगितली आहे. 'गढी' खोदण्यासाठी अडथळा कुठून येतो ह्याचेही भान कवीला आहे. 'प्रभात' कवितेत 'मस्तवाल गेंड्यांच्या' प्रतीकातूनही कवीने प्रस्थापित समाजव्यवस्थेवरील प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. 'नंदीबैल' ही रूपक कविता आहे आणि ही संग्रहातील सर्वाधिक समर्थ कविता आहे. बैलामध्ये मूळची असलेली थरथर, त्याचे डरकाळणे, नागाच्या फण्यासारखे शेपटचा उंचावून उंडारणे केव्हाच नाहीसे झाले आहे. संवेदनशील कातडीही आता बोथट झाली आहे. सत्तेच्या दारात बांधलेल्या ह्या बैलांचा पुरुषार्थच आंड न ठेचताच खच्ची झाला आहे. आता मानेवर जू न ठेवण्याचे आश्वासन त्यांना पुरते. आयत्या खळ्यात तोंड खुपसण्याचे प्रलोभन त्यांना पुरेसे वाटते. झुलीमधल्या झोळीत पसाभर पडले की ते खूष होतात. सत्तेच्या 'गुबुगुबू' घोषणेला मान हलवतात आणि धन्याच्या भरभराटीची ग्वाही देतात. सत्तेत रुतलेल्या स्वार्थी, पंढ पुढारीवर्गा-संबंधीचा उपहास कवितेच्या प्रत्येक शब्दातून अत्यंत भेदकपणे व्यक्त झाला आहे. हा उपहास वा उपरोधच तिला विलक्षण असे सामर्थ्य प्राप्त करून देतो. कवठेकरांच्या इतरही काही कवितांमधून हा उपहास डोकावताना दिसतो. वैयक्तिक अनुभवातून अथवा भ्रमनिरासातून अवतर-णारा उपरोध मराठी कवितेला नवा नाही. कवठेकरांची वृत्ती नेमकी ह्याउलट आहे. त्यामुळेच अनुभवाची उत्कटता तिच्यातून जाणवते; परंतु तिच्यात व्यक्तिपरता बहुधा जाणवत नाही. अनेक वेळा व्यक्तिगत सुख–दुःखही समाष्टिमनाशी एकरूप होऊनच अवतरतात. 'माझा बाप पुढे सरकारी इमारतीच्या बांधकामासारखा ढासळत गेला' अथवा 'डोळ्यांत मिरचीची पूड तशी आईच्या पिचत मरण्याची आठवण' असे जेव्हा कवी म्हणतो तेव्हा इथल्या समाष्टिमनालाच तो अभिव्यक्ती देतो. कुसुमाग्रजांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'कवी सामाजिक मन प्रकट करतो असं आपण म्हणतो तेव्हा तो वस्तुतः स्वतःचेच



**नारायण कुलकर्णी, कवठेकर**

कवठा (खुर्द) येथे ३०–९–१९५१ रोजी जन्म. शिक्षण : एम्. ए., बी. एड. नंतर काही दिवस शेती हा व्यवसाय. गेल्या दोन वर्षांपासून जळगाव (जामोद) येथल्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयात मराठीचे अध्यापन.
सत्यकथा, प्रतिष्ठान, युगवाणी, अस्मितादर्श, अनुष्टुभ इत्यादी नियतकालिकांतून कवितांना प्रसिद्धी.
'कविता दशकाची' संग्रहातील एक कवी.
'राजस'च्या कथास्पर्धेत पहिले पारितोषिक. 'हे माझ्या गवताच्या पात्या' हा कवितासंग्रह मौज प्रकाशनातर्फे गेल्या वर्षी प्रकाशित. संग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे १९८२ चे सर्वोत्कृष्ट कवितासंग्रहाचे पारितोषिक.
पत्ता : कवठा (खुर्द) ता. वाशीम, जि. अकोला. ४४४५०९

मनोगत प्रकट करीत असतो. ते मनोगत समाजात मोठ्या प्रमाणात प्रसूत झालेलं असतं एवढंच.. समाजात प्रसूत झालेली ही मनोगतं एखादा कवी अधिक प्रमाणात आत्मसात करू शकतो. स्वतःच्या मनात मुरवू शकतो.' सुर्व्यांची कविता जशी या अर्थानेच सामाजिक आहे, तशीच कवठेकरांचीही आहे. म्हणूनच अशा वेळी कवीची मनोगते ही केवळ त्या कविमनाची रहात नाहीत, तर समष्टिमनाची मनोगते होतात. व्यक्तिमन आणि समाजमनाची एकरूपता आपल्याला तिथे पहायला मिळते. उदाहरण म्हणून पुढील ओळी पहाण्यासारख्या आहेत –

हात माझे थकलेले
घरून एका प्रदीर्घ कालखंडाचा नांगर
आणि पाय चिरून गेलेले
चालून चालून त्या प्रदेशात जेथे
टाचण्यांनी
टाचून ठेवलेली असतात फुले
रस्त्यारस्त्यावर
आणि वाहनांच्या गर्दीत जेथे नसते
फुर्सत
न्याहळून बघण्याची रस्ता
जेथे घडलेत कडाक्याच्या थंडीत ठेच
लागून बोट रक्ताळावे असे
प्रसंग कित्येक
लागावा धक्का टचकन फोडावर बऱ्या
होत आलेल्या अशा
कैक घटना

जेथल्या आठवणी जणू भेसूर किंकाळ्या विषण्ण मध्यरात्रीतल्या. 'अगम्यही तितकेच जितके बंद दगडाच्या पोकळीत बेडकीचे जिवंतपण' या एका ओळीतूनही कवठेकरांनी आजच्या मानवी जीवनावर प्रकाश टाकला आहे. इथे मरण आणि आत्महत्या क्षणाक्षणाला होताहेत. म्हणूनच कवी म्हणतो, 'मरणाच्या रात्री मोजाव्यात तरी किती आणि दिवसातील आत्महत्यांचा ठेवावा कसा हिशोब.' हे जीवनच दुःखाच्या सावटाखाली दडपलेले आहे, याचा प्रत्यय कवठेकर काळवाचक प्रत्ययांतूनही काही वेळा देतात. उदाहदणार्थ–

भूतकाळ : 'भूतकाळ विहिरीसारखा
जीत पडलीत खूप पाने.
पाने सडत चाललीत
आणि पाणी पिवळे पडत
चाललेय.'

वर्तमानकाळ : 'शंभर कावळ्यांसारखा
अक्षरांची वर्तमान लिपी'

भविष्यकाळ : 'आणि डोळे हरवून
गेलेले सावळ्या गंधाच्या
लोटात नाहीत पाहू शकत
भविष्यातले काही.'

'गाव' या कवितेत कवीने खेड्यातील भकास जीवनाचे चित्र रेखाटले आहे. 'नांगराने भसाभसा ऊर फोडीत जावे तसा आजूबाजूचा प्रदेश विव्हळ होऊन पडतो आहे' या ओळीतूनही खेड्यातील दुःख, शोषणालाच कवीने अभिव्यक्ती दिली आहे.

जिला सामान्यतः प्रेमकविता, निसर्गकविता म्हटली जाते अशी एकही कविता या संग्रहात नाही. कवठेकरांचा तो पिंडच नाही. 'तर पुन्हा' कवितेला 'तिच्या हट्वादी आठवणींचे' संदर्भ आहेत तर 'ओहोटीचा खेळ' ही सबंध कविताच 'ती' ला संबोधून लिहिलेली आहे; परंतु ही 'ती' रूढार्थाने जिला प्रेयसी म्हणावे अशी स्त्री नाही तर या समाजव्यवस्थेने जिच्यापाशी शिल्लक ठेवल्या आहेत फक्त 'काटक्या मोळ्या आणि फाटक्या चोळ्या' अशी शोषित स्त्री आहे. कवितेतील स्त्री व पुरुष दोघांचीही शरीरं परिस्थितीच्या रेट्याखाली खचलेली आहेत. 'दोन ओहोटचा भरतीचा आव आणीत आहेत' हे त्यांच्यामधील शारीरवास्तव आहे. 'सावळी' या कवितेतील 'तू' ही

तू नाहीस तन्वंगी
तू नाहीस प्रमदा
आहेस एक प्रचंड झोत एक धो धो
खळाळ.

अशी आहे. या कवितेत कवीने दोघांच्या आयुष्याचा जीवघेणा आलेखच मांडला आहे. 'सासूच्या धाकात वाकलेल्या गर्भार बाईच्या केविलवाण्या चालीसारखे हे आयुष्य' आहे.

कवठेकरांच्या कवितेतून घडणारे स्त्रीदर्शन हे आजच्या कवितेत सहसा न आढळणारे आहे. चहूबाजूंनी होणाऱ्या शोषणाखाली दडपलेली ही स्त्री आहे. ग्रामीण समाजातील या स्त्रीविषयी कवठेकरांना आत्मभाव आहे व त्यामुळे ते तिच्याविषयी अलिप्त राहून बोलूच शकत नाहीत. ह्या स्त्रीचे अवघे जीवनच कसे उध्वस्त झाले आहे हे पुढील काही ओळींमधून पहाता येते.

१. डोईवरला पदर आणते खांद्यावर
आणि येते बाहेर झोपडीच्या
दुष्काळाच्या चवचाल हवेला
सामोरी जात. (सामोरी)

२. आणि कपडे फेडण्याआधी क्षणभर
ओठ दाबून
मेलेल्या आईची आठवण काढणाऱ्या पोरी...

दुष्काळाने उध्वस्त केलेल्या जीवनात स्त्रीला जगण्यासाठी कोणती किंमत द्यावी लागते हे कवठेकरांनी 'चवचाल' या एकाच शब्दातून सुचवले आहे.

कवठेकरांच्या काही कवितांमधून निसर्गप्रतिमा येतात; परंतु या निसर्गप्रतिमांमध्येही सामाजिक जाणीव मिसळलेली दिसते. झाड ही प्रतिमा वारंवार येते; पण तिचा उपयोग कवठेकर उध्वस्त मानवी जीवनाचे चित्र रेखाटताना माध्यम म्हणूनच करतात.

नंतर झाडाची पाने झाली सुरकुतलेली
आणि फांद्या वाकड्या
वारा वाहला तर त्यातून येतो आवाज
पोकळ हाड फुंकल्याचा.

इथ झाड हे पिचलेल्या मानवी जीवनाचे प्रतीक म्हणूनच पुढे येते. कवठेकरांची कविता वाचताना सर्वप्रथम जाणवते ते शब्दार्थाचे वजन आणि त्यातूनच मग उमटत रहाते ते नाद व लयीचे सौंदर्य. खेड्यातील मातीचा, जीवनाचा गंध, रंग, स्पर्श घेऊन येणारी ही कविता वाचकाला एक नवे जीवनदर्शनच घडवते.

पुस्तके

# एका नवीन टप्प्यावर घडलेली कलाकृती

वि. शं. पारगावकर

**ही** एक कादंबरी,

'हे ईश्वरराव,... हे पुरुषोत्तमराव...' लेखक श्याम मनोहर. या लेखकाची ही कितवी कादंबरी? पहिलीच. चालू दशकातली ही पहिली कादंबरी. या लेखकाचं वय काय असेल? उगीच कुतूहलापोटी आणि साहित्यापोटीही. साहित्याच्या परंपरेपोटी हे कुतूहल. म्हणजे ह. ना. आपटे आणि भालचंद्र नेमाडे या दोघांच्याही वयाचा हा लेखक नसावा.

श्याम मनोहर यांची ही कादंबरी वाचली की मराठीतील कादंबरीलेखनाच्या परंपरेची आठवण व्हावी एवढी महत्त्वाची ही कादंबरी वाटते. ह. ना. आपटे, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, वा. म. जोशी, केतकर, फक्त 'बळी'वाल्या विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, तसेच फक्त 'माचीवरला बुधा' वाले गो. नी. दांडेकर, विश्राम बेडेकर, नंतर 'चक्र', 'काळोखाचे अंग', 'वासूनाका', 'चानी', हा एक सरळ प्रवास. आणखी एक वेगळा प्रवास म्हणजे 'स्वामी', 'झेप', 'आनंदी गोपाळ', 'दुर्दम्य' असा. या दुसऱ्या प्रवासात कादंबरीच्या मुख्य प्रवाहाची बीजं नाहीत. मनुष्याच्या सामाजिक जीवनाविषयीचं एक कुतूहल. वास्तवाचे भान पक्के ठेवून अनंत पातळयांवरून घेतलेला जीवनाचा वेध. त्यात कोणाला जीवन किती सापडलं, कसं सापडलं आणि कलात्मकतेच्या चौकटीत त्याला ते कितीसं यशस्वी करणं जमलं याचाही एक इतिहास या निमित्ताने डोळयापुढे उभा राहतो.

परंपरा कुठे मोडल्या जातात, कुठे त्या आपोआप तयार होतात, नवीन मानदंड कुठे निर्माण केले जातात आणि ते मानदंड जुनाट कुठे ठरातात? या कादंबरीलेखनाच्या संदर्भात भाषेचं स्थान (किंवा नेमकं कार्य) काय? भाषा आणि शैली यांचं नातं काय? भाषा आणि शैली यांना व्यापून उरणारं कादंबरीलेखकाचं व्यक्तिमत्त्व. फक्त कलेचा निर्माता म्हणून. कादंबरीमध्ये कलेचं रूप घेणारा जीवनानुभव, तो जीवनानुभव व्यक्त होण्यासाठी निमित्त होणाऱ्या निरनिराळ्या व्यक्ती. त्या व्यक्तींमधील चैतन्य आणि त्या चैतन्याचा साक्षात्कार घडवून आणणारे शब्द, वाक्य, परिच्छेद, संवाद, संबोधन, उद्गारचिन्हे इत्यादी सर्व. या सर्वांमधून कादंबरी साकार झालेली असते. तिचं साकारणं आणि साकारल्यानंतर आस्वादकाच्या मनाला जाऊन भिडणं हे कादंबरीचं किंवा कुठल्याही कलेचं कार्य असतं असं समजलं जातं. येथे आपण कादंबरीविषयीच विचार करणार असल्यामुळे इतर कलाकृतींविषयी विचार येणार नाहीत आणि हे विचारदेखील श्याम मनोहर यांच्या 'हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव...' या कादंबरीच्या निमित्ताने जेवढे येतील तेवढीच त्यांची मर्यादा असणार!

ही कादंबरी मला आवडली; पण ती नेमकी कशासाठी आवडली? तिच्यात काय नवीन वाटलं, वेगळं काय वाटलं? जुन्या कादंबरीचा पदर हिने कुठे सोडला, अंगावरून नवीन पदर कुठे घेतला? तिच्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनाचं काय? त्याने आपल्या पूर्वपरंपरांची नाळ कुठे कापली आहे? काही नवीन परंपरा निर्माण केल्या असतील तर त्यांचं स्वरूप काय वगैरे अनेक प्रश्न निर्माण होतात. येथे कादंबरीची अशी निश्चित व्याख्या करता येणार नाही असे दिसते. कारण पेंडसे यांची 'लव्हाळी', चिं. त्र्यं. खानोलकर यांची 'अजगर', ग. प्र. प्रधान यांची 'साता उत्तराची कहाणी' जिला मौजेने अलीकडच्या जाहिरातीत राजकीय बखर म्हटलेलं आहे, तसेच विजय हर्डीकर यांची 'जनांचा प्रवाहो चालिला' या पुस्तकास प्रा. स. शि. भावे यांनी कादंबरी म्हटलेले आहे. अशा काही ललितकृतींमुळे आणि तिच्यामागील विचारवंतांच्या दृष्टिकोणामुळे जुनी परंपरावादी कादंबरीची व्याख्या आता फारच अपुरी पडू लागलेली आहे.

ह. ना. आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीतील जीवनानुभवाला त्या वेळचे तिचे तंत्र आणि शैली यांचा जाच वाटला नाही. आज तो वाटतो. ना. सी. फडके यांच्या सर्वच कादंबऱ्यांना त्यांच्या तंत्र आणि शैलीचा जाच झालेला आहे. अनुभवांचं निवेदन करण्याऐवजी निवेदनासाठी अनुभव अशा काही तरी कृत्रिम तंत्राच्या चौकटीत त्यांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या अडकून पडल्या होत्या.

## सामाजिक आकांक्षांचं गुदमरलेपण

श्याम मनोहर यांची 'हे ईश्वरराव...' अशा तंत्राचा अवलंब करताना दिसत नाही. तिची सुरुवात जितक्या सहजतेनं होते तेवढाच तिचा शेवट या कादंबरीला एका भक्कम पायावर उभा करतो. तिच्या शेवटच्या या काही ओळी...

उसळून काणे म्हणाला, 'ती अंधश्रद्धा आहेच. म्हणे मृत्यू असतो. असतोच. त्यात काय? मृत्यूचं दुःख सगळेच पचवतात. तूही पचवलंस किंवा चुकून पचलं म्हण. अजून तुला चान्स आहे म्हणून पचलं, दुःख पचवलं, पचवलं असं रेडिओतल्यासारखं कशाला सारखं मी मी करतोयस?'

संतापून यार्दी म्हणाला, 'काण्या ऽ—'

संतापत काणे म्हणाला, 'ओरडतोयस कशाला? त्यासाठी आलायस का?'

हा शेवट जेवढा साधा तेवढाच कादंबरीतील मुख्य जीवनानुभवाला भक्कम मूळ देणारा आहे आणि म्हणूनच तो तितकाच खोल आणि प्रत्ययकारी, एकंदरीने हृदयाशी थेट जाऊन भिडणारा आहे.

या कादंबरीचा विषय तसा तथाकथित

ज्वलंत सामाजिक अथवा राजकीय विषयावर आधारलेला असा नाही. एखाद्या प्रश्नाची उकल करण्याची प्रतिज्ञा कोणतीही कलाकृती करीत नसते. ती एक आकृतिबंध निर्माण करण्याचाच सदोदित प्रयत्न करीत असते. असा एक आकृतिबंध 'हे ईश्वरराव' या कादबरीत अगदी सहजतेने निर्माण झालेला आहे कलाकृतीला विषय असतोच. तसाच या कादबरीलाही एक विषय आहे. त्याप्रमाणे या विषयाला कलाकृतीच रूप कसं लाभलेल आहे हे समजावून घेण्यासारख आहे.

या कादबरीचा विषय थोडक्यात सांगण्यासारखा आहे तो असा :

'सुखदेव सुखी होऊ दे, पलीकडच्या बोळातला काणे सुखी होऊ दे. भोसले सुखी होऊ दे. जालिंदर सुखी होऊ दे. चाळ सुखी होऊ दे. ऑफिस सुखी होऊ दे. किती जण सुखी होऊ दे? सगळेच. सगळ्याच्या सुखावर सुख उठून दिसू दे !

'सुखदेव सुखी व्हायचा असला तर कसा सुखी होणार ? त्याला मुलगीच हवी. त्याला आता प्रोमोशनच हवे. जालिंदरलाही प्रोमोशनच हवे. मग सुखदेवचं कसं ? आं ? मग सुखदेव सुखी होणार नाही. असं कसं ? दोघही सुखी व्हायच असं फिसकटतय ?

असे हे सघर्ष आहेत. लेखकाच्या भाषेत घर्षण आहे. साऱ्या कादबरीभर विषय हा घर्षणाचा आहे. आपसातील नात्यांच्या निश्चितीचा आहे. आपापल्या जीवनातील छोटया अस्तित्वाचा आहे तसाच भवितव्याचाही आहे.

काणे, खामकर, यार्दी, सुखदेव, भोसले, जालिंदर वगैरे लोक एका आडगावातल्या शेतकी कचेरीत नोकरीला आहेत. त्याचे वरिष्ठ ईश्वरराव आणि पुरुषोत्तमराव. आणखी एक विश्व. त्याच नात तेच अस्तित्व तेच आणि जीवनही तेच आहे. प्रत्येकाला बायको आहे, मुल आहेत म्हणून ससारही आहे. मात्र या संसाराचं एक टोक शेतकी कचेरीशी बाधलेलं आहे. जीवनाच सूत्र तेथून सुरू झालेल आहे. ताण तेथूनच सुरू होतात आणि शेवटच्या टोकापर्यंत थरथरत राहतात. कधी हे ताण अगदी साधे असतात. त्याना थोडी ओढ असते; पण ती फक्त गुतवणुकीची, फक्त निबद्ध असल्याची जाणीव यावी एवढेच. कधी हे ताण फार ओढले जातात. भोसलेच्या हातून काही वियाण्याची खरावी होते, भोसलेला कचेरीत वेळेवर येण्यास एखाद्या दिवशी उशीर होतो आणि ईश्वरराव पुरुषोत्तमरावाच्या थोबाडीत देतात. हा या कादबरीतला सर्वात मोठा प्रसग. मध्यवर्ती घटना. मग सुखदेव आणि आत्माराम यांचं बिनसण आणि सर्व कचेरीभर निरनिराळ्या ताणाची थरथर. एका विशिष्ट प्रकारे निर्माण झालेल्या नात्याची उलथापालथ. रुखरुख, बेचैनी, संशय, अबोले तिरस्कार. आपापल्या आकांक्षाना बसणारे हादरे. त्या साऱ्या अस्थिरतेत, बेचैनीत ढवळून निघणारं जीवन. वैयक्तिक अभिलाषा आणि सामाजिक आकांक्षा यांचं गुदमरलेपण. दम कोडणं, जीवन कुठित होणं ही अवस्था. पुन्हा पूर्वपदावर येण्याची धडपड, सार काही सांधून घेण्यासाठीचा आटापिटा. त्यातून उमटून वर येणारे मनुष्यस्वभावाचे निरनिराळे आविष्कार, मनुष्या-मनुष्यात निर्माण झालेल्या नात्याचं स्वच्छ दर्शन. त्यातून क्वचित प्रसंगी आणि अतिशय क्षीण स्वरूपात दु.ख पचविण्यासाठी चालू असलेली अध्यात्माची धडपड.

मग काण्याची गिऱ्हाइकाला चांगलं दूध घालण्याची धडपड, यार्दीनं आपलं नवजात मूल मेल्यानंतर पचविलेलं दुःख, सुखदेवनं आत्मारामशी सांधून घेण्यासाठी दाखविलेली तत्परता.

श्याम मनोहर याच हे सार जगच अतिशय छोटं आहे त्या जगाच्या आजूबाजूचं जगही छोटसच आहे आणि त्याही जगाच्या पलीकडे काही तरी फक्त जागतिक असल्याची चाहूल आणि या साऱ्यांच्यामधून कधी कधी अत्यत स्पष्टपणे डोकावणार अध्यात्म. या साऱ्यांच्या जाणिवाचा परिघ अतिशय मर्यादित; पण प्रत्येकाच्या जीवनातलं चैतन्य मात्र अगदी लखलखीत, रसरशीत. या मर्यादित जीवनप्रवाहाच चित्रण निरखीत असताना अमर्याद जीवनाचंही दर्शन सहज घडाव अशी शक्ती या कलाकृतीला लाभलेली आहे.

कादंबरीचं कथानक असं हे थोडक्यात. तसे पाहिले तर कोणत्याही ललितकलेला कथानक अस नसतच. निदान ते सुटसुटीतपणे सागावं असं असत नाही· कलाकृती ही खऱ्या अर्थाने वाचली जात नसते, ती भोगावी लागते. कथानकातच अडकून पडलेल्या कलाकृतीशी वाचक भिडू शकत नाही. कथानकातील कृत्रिमता, निवेदनातील एकसुरीपणा आणि त्यासाठी वापरलेल्या शब्दाचा, भाषेचा खडबडीतपणा या गोष्टी तादात्म्याच्या आड येतात.

श्याम मनोहर याच्या 'हे ईश्वरराव...' ला निवेदन नाही. त्यामुळे भाषेत असलेला सामाजिकपणा इथे जाणवत नाही. ती फक्त चित्रण करते आणि कुठे कुठे फक्त संधी जुळवून घेण्यापुरतेच ती निवेदन करते. तसेच त्यानी आपल्या ललितकृतीसाठी निवडलेली भाषा ही साडेतीन टक्क्याचीही नाही आणि साडेशहाण्णव टक्क्याचीही नाही. ती कादबरीतील स्वभावचित्राची ज्याची त्याची भाषा आहे. शेवटी कुठलाही मनुष्य हा शुद्धही बोलत नाही आणि व्याकरणही बोलत नसतो. तो आपल्या आनुवशिकतेप्रमाणे आपली स्वत.चीच एक भाषा बनवीत असतो आणि तीच तो बोलत असतो. जसे 'मी तुझ्याशी आहे, भोसलेशी आहे' (पान ७९) 'ते मला त्यात विशेष कायी नायी' माझं आणखीन विजचं चागली नायीय तरी तुझ्या दृष्टीनं बघायला पायज्ये तू...' (पान ९१) इत्यादी.

भाषा ग्रामीण असते, नागरी असते, कोकणी असते, विदर्भी असते-विदर्भी नागरी असते तशीच विदर्भी ग्रामीण असते. कोल्हा-


M/s. Govindram Shobharam & Co.
General Merchant & Commission Agent
Ganapati Peth, Post Box No. 42
SANGLI 416 416

*Telex :* REMEMBER
*Telex No* : GITA-0193-201
*Phone :* Off : 4985, 3065
Res : 2519

पुरी ग्रामीण असते तशीच माणदेशी ग्रामीणही असते. मराठवाडा ग्रामीणमध्ये परभणी-पूर्णेकडील ग्रामीण वेगळी आणि उस्मानाबादकडील ग्रामीण वेगळी. पैठण-नेवासाकडील ग्रामीण वेगळी तशीच बीड-आंबेजोगाईकडील ग्रामीण वेगळी. भाषा ही अनंत छटा आणि अनंत लकबींमधून विचार आणि भावना व्यक्त करणारे माध्यम आहे. कोकणस्थामध्येही गंगाधर गाडगीळ यांची बोलीभाषा वेगळी, श्री. ना. पेंडसे यांची वेगळी. तसेच महादेवशास्त्री यांची बोलीभाषा जशी वेगळी तशीच गो. नी. दांडेकर यांचीही वेगळी. भाषा ही जशी समूहातून उदय पावते तशीच ती व्यक्तीच्या आविष्कारातूनही जडत-घडत जाते.

### स्वच्छ, पारदर्शक चित्रण

त्यामुळे भाषा हे माध्यम कोणत्याही ललितकृतीसाठी वापरणे तसे फार जोखमीचे काम असते. व्यक्तीच्या मनातील भावभावनांचा आविष्कार तिच्या बोलीभाषेतून झाला पाहिजे. त्यामुळे साडेतीन टक्के आणि साडेशहाण्णव टक्के हे विश्लेषण गावढळपणाचे आणि अशास्त्रीय आहे.

श्याम मनोहर यांच्या कादंबरीतून जी भाषा येते ती त्या त्या व्यक्तीच्या आविष्काराची भाषा आहे. म्हणून कलाकृतीला यशस्वी करण्यात ती आपला फार मोठा वाटा उचलते. भाषा हे ललितकृतीसाठी वापरावयाचे माध्यम तसे एरवीदेखील फार फसवे आहे. कारण एका शब्दातून एकच एक अर्थ व्यक्त होत नाही, हे जसे खरे; तसेच अनेक शब्दांना अनेक व्यक्तींच्या पूर्वस्मृतीचे अर्थही चिकटलेले असतात. यासाठी एक उदाहरण देता येईल. 'निळा आणि पिवळा मिळून हिरवा रंग होतो' हे एक विधान आहे आणि यात एक निष्कर्ष आहे; परंतु निळा शब्द उच्चारल्याबरोबर त्या शब्दातून व्यक्त होणारा तेवढाच एक अर्थ वाचकाच्या मनात येणार नाही. निळे आकाश येईल, निळा मोर येईल. आपल्या बायकोने नेसलेली पहिली निळी साडी आणि तीमधील तिचे रूप येईल. तसेच अनेक शब्दांच्या साह्याने एक भावना व्यक्त करावयाची झाली तरी एकच एक नितळ भावना त्या त्या शब्दातून. व्यक्त होईलच असे नाही. इंद्रधनुष्यासारखे अनेक भावरंग त्यातून व्यक्त होण्याची भीती आहे. म्हणून मोठा कलावंत जेव्हा आपल्या कलाकृतीसाठी एखादी भाषा वापरतो तेव्हा आपल्या भावाभिव्यक्तीसाठी तो भाषेवर आपली हुकुमत गाजविण्यासाठी फार धडपडत असतो. श्याम मनोहर यांची भाषा तशाच जिद्दीने येथे आलेली आहे असे घडीघडी प्रत्ययाला येत राहते. 'असं कळूनही सुखदेवला थोडा काम झाला', 'त्याच्या मनात घर्षण झालं', 'आवाज आतून साफ आला.' अशी छोटी छोटी वाक्ये एक वेगळीच घडण घेऊन येतात आणि आशय त्यांना घट्टपणे चिकटून बसलेला असतो. जी भावाभिव्यक्ति अभिप्रेत आहे तिला श्याम मनोहर यांची भाषा अगदी जखडून ठेवते. आस्वादकाला इकडे तिकडे हलायला सवड देत नाही, हे एक वैशिष्ट्य इथे प्रकर्षानं दिसतं.

कादंबरी वाचून संपविल्यावर वाटतं ही कलाकृती कादंबरीच्या एका नव्या वळणावर उभी आहे. साऱ्या पारंपारिकतेला तिनं बाजूला सारलेलं आहे. इथे प्रतिमा फारशा येत नाहीत; पण ज्या येतात त्या आशयाचा नवीन कंद फुलवितात. श्याम मनोहर यांची ही कादंबरी ग्रेट आर्ट नक्कीच नाही; पण ती गुड आर्ट मात्र आहे. कारण तिच्यातील आशय जसा फारसा नवीन नाही तशीच जीवनाची एक थक्क करणारी प्रचंड खोलीही ती दाखवू शकत नाही. तरीही ज्या जीवनाचं ती चित्रण करते ते अगदी स्वच्छ आणि पारदर्शक आहे, हा तिच्या यशाचा एक ठळक टप्पा म्हणता येईल आणि याच टप्प्यावरून यापुढील नवीन कादंबऱ्यांची मार्गप्रतीक्षा करण्यात आनंद आहे. □

'हे ईश्वरराव ..हे पुरुषोत्तमराव...'
लेखक : श्याम मनोहर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : १९४. मूल्य : ४५ रुपये


रंगभूमी

## ड्रॉपर्सचे 'माणूस नावाचे बेट'

वि. भा. देशपांडे

ड्रॉपर्स ही पुण्यातली एक हौशी-प्रायोगिक स्तरांवर नाट्यप्रयोग करणारी, आपल्या कार्याने बऱ्यापैकी परिचित झालेली नाट्यसंस्था. राज्यनाट्यस्पर्धेत काही ना काही पारितोषिके ह्या संस्थेने मिळवलेली. अशा काही नाट्यप्रयोगामध्ये 'एक असतो राजा' 'क्रांती' ही नाटके आवर्जून लक्षात राहावीत अशी. अलीकडे 'आवर्त' नावाचे मुक्तनाट्य निरनिराळ्या वस्त्यामधून केलेले काहींना आठवत असेलच. नाट्यप्रयोगाच्या बरोबरीने नाट्याला पूरक अशी नाट्यवाचनाची आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा सातत्याने आयोजित करून एक महत्त्वपूर्ण कार्य जाणतेपणाने करणारी ही संस्था.

अशा या ड्रॉपर्सने या वर्षीच्या राज्यनाट्यस्पर्धेच्या निमित्ताने विजय तेंडुलकरांचे 'माणूस नावाचे बेट' हे नाटक प्रयोगरूपाने रंगमंचावर आणले. तेंडुलकरांच्या नाट्यलेखनात-विशेषतः पहिल्या उमेदीच्या लेखनात-ज्या नाटकाचा उल्लेख आवर्जून केला जातो त्यामध्ये 'माणूस नावाचे बेट' हे एक असते. वास्तविक या नाटकाला प्रयोगयश मोठ्या प्रमाणात लाभलेले नाही; पण त्यातल्या विषयआशयामुळे आणि मांडणीच्या साधेपणामुळे ते नाटक लक्षवेधी ठरले. मध्यमवर्गीय माणसे आणि त्यांचे नि:श्याचे जीवन हा तेंडुलकरांच्या नाट्यलेखनातला महत्त्वाचा विषय अनेक वर्षे आहे. विशेषतः त्यांचे आरंभीचे एकांकिका-लेखन, 'श्रीमंत-' सारखे नाटक याला साक्षी आहेत. 'माणूस नावाचे...' मध्येही ते अशाच मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनाचा शोध घेत त्याचे दर्शन आपल्याला घडवतात. काशिनाथ, आप्पा, वसंता आणि मालू ह्या चौघांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या प्रसंगातून हे नाट्य उलगडत जाते. मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनात उदाहरणार्थ काशिनाथच्या जीव-



**'माणूस नावाचे बेट' : अंजली आगाशे – श्रीधर कानिटकर**

नात राहण्याची जागा, जागेतले फर्निचर आदी सामान, नोकरीची किंवा व्यवसायाची अनिश्चितता, अशा अडचणीतच प्रेमाला येणारा बहर, ह्या परिस्थितीतले मित्रांचे वागणे, त्यांची माणुसकी, अशा अनेक अनुभवांनी नाटकाची वीण तयार होते. हे सारे सांकेतिक पद्धतीने न येता अगदी सहजपणाने घडल्यासारखे वाटते. त्यामुळे 'घडीव' नाटचाची सवय असलेल्या प्रेक्षकाला यातले संथपण किंवा दर्शनी जाणवणारे आळणीपण त्रासाचे वाटते.

अशा संहितेमुळे अनेक आव्हाने निर्माण होतात. ती आव्हाने कलाकार आणि दिग्दर्शक यांनी स्वीकारायची असतात. तशी ती ड्रॉपर्सच्या कलाकारांनी स्वीकारली आणि यथाशक्ती ती पेललीही. कलाकारांच्या आव्हानामध्ये स्वभावरेखेचे तपशील अभिनयातील सहजतेने अभिव्यक्त करण्याचे आव्हान महत्त्वाचे होते. यासाठी अभिनयातील संयतपण ध्यानपूर्वक राखावे लागते, ते श्रीधर कानिटकर, सुधीर मुंगी, राहूल सोलापूरकर ( आता दिलीप कोल्हटकर ते काम करतो ), शाम साठे आणि अंजली आगाशे ह्या कलाकारांनी राखले होते. तरीही सुधीर मुंगीचा आवाज इतका वरचा असायचे कारण नाही, तसेच श्रीधर कानिटकरच्या आवाजाचे हळूपणही काही वेळा त्रासाचे होते. हा समतोलपणा राखणे आवश्यक होते.

कलाकारांचे व्यक्तिगत अभिनयाचे कसब हे जितके आणि जसे महत्त्वाचे तसेच दिग्दर्शक म्हणून सुहास कुलकर्णीची कामगिरी तितकीच अवघड आणि लक्षवेधी होती. त्याने आपले दिग्दर्शनाचे कौशल्य गेल्या वर्षीच्या पुरुषोत्तम करंडकस्पर्धेत 'सुनीला पारनामे...' या एकांकिकेच्या संदर्भात पहिल्या क्रमांकाने सिद्ध केले आहेच. निदान पुण्यात तरी तरुण, नव्या उमेदीच्या दिग्दर्शकात त्याच्याकडून अपेक्षा कराव्यात असा हा दिग्दर्शक आहे. या नाटकाचे नेपथ्य आनंद लागूचे होते. घराचे जुनेपण, फर्निचराविना भासणारे भकासपण त्यातून आवश्यक तेवढे व्यक्त झाले. तेंडुलकरांच्या लेखनातील पहिल्या दशकातले नाटक म्हणून आणि एका वेगळ्या बाजाचे नाटक म्हणून ज्यांना कुतूहल असेल त्यांनी हा नाट्यप्रयोग आवर्जून पाहावा. ◻

## अभिनंदन

श्री. दत्ता भट यांना १९८३ सालचा संगीत–नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला. या निमित्ताने एका गुणी, अनुभवी नट, नाटककार, दिग्दर्शक अशा त्रिविध कामगिरी करणाऱ्या कलाकाराचा सन्मान झाला. अभिनंदन !

# बहुरूपीची दोन बंगाली नाटके

गेल्या काही वर्षांत पुण्यामध्ये मराठीतेतर भाषांतील नाटकांचे प्रयोग अधूनमधून येत असतात. अगदी याच वर्षापुरते बोलायचे तर सत्यदेव दुबेंचे हिंदी नाटक 'संभोग से संन्यासतक' झाले. जगदीश शहांचे 'हुं स्वर्गनो प्रधानमंत्री बन्यो' हे गुजराथी नाटक झाले. दिवाळीनंतर ब्रिटिश कंपनीने दोन इंग्लिश नाटके पेश केलीच होती. नुकतीच कलकत्त्याच्या 'बहुरूपी' या नाट्यसंस्थेने दोन बंगाली नाटके पेश केली. त्यातले एक होते 'राजदर्शन' आणि दुसरे 'धर्माधर्म'!

'बहुरूपी' ही कलकत्त्यातली एक नामांकित नाट्यसंस्था. शंभू मित्र हे या संस्थेचे संस्थापक आणि सर्व काही. त्यांनी आपल्या अभिनय आणि दिग्दर्शन यांच्या कुशलतेने या संस्थेचे नाव केवळ बंगालमध्येच नव्हे तर भारतातही मोठे केले. शंभू मित्र, तृप्ती मित्र आणि आता त्यांची मुलगी सावली, तिचे पती कालीप्रसाद घोष हे सारे कुटुंब रंगभमीशी संबंधित आहे. शंभू मित्र वयपरत्वे आता नाटकातून भूमिका करीत नाहीत; पण दोन वर्षांपूर्वी त्यांनी पुण्यात केलेली 'पुतुलखेला' आणि 'राजा इडिपस' हे दोन नाट्यप्रयोग ज्यांनी पाहिले असतील त्यांना शंभूदांच्या अभिनयगुणांची ताकद नक्कीच जाणवली असेल. तितक्याच ताकदीने उभ्या राहिलेल्या तृप्ती मित्र 'पुतुलखेला', 'रक्तकरबी' या नाटकांतून आणि 'अपराजितो' या एकपात्री प्रयोगातून अनेकांनी पाहिलेल्या आहेत. आता सावली मित्राही 'नाथवती अनाथवत' हा एकपात्री प्रयोग करते.

अशा ह्या गुणी कलावंतांच्या 'बहुरूपी' संस्थेने पुण्यात २७ आणि २८ डिसेंबरला दोन नाटके पेश केली. 'राजदर्शन' हे नाटक मनोज मित्र कथासरित–सागरमधल्या एका कथेवरून रचलेले आहे. मनोज मित्र हे कलकत्त्यातील आजचे तरुण नाटककार म्हणून ओळखले जातात. त्यांनी कथासरितसागरमधील नंदराजाची एक कथा घेतली.

हा राजा आणि त्याची प्रजा यांचे संबंध, तसेच राजाचे आजारपण, मृत्यू आणि त्याच्या पुन्हा जिवंत होण्याने घडणारे नाटक छोटचा छोटचा प्रसंगांतून व्यक्त झाले आहे. तसे पाहिले तर दर्शनी परीकथेसारखी काहीशी अद्भुत असलेली ही कथा तेवढचाच स्तरावर राहात नाही तर ती त्यातला आशय आजच्या काळापर्यंत आणून भिडवते. राजाचे पालटलेले रूप किती आणि कसे पोकळ, भ्रष्ट आहे, ते 'राजदर्शन' आपल्याला वास्तवाला भिडवून विचार करायला लावते. याचे दिग्दर्शक होते कुमार रॉय. या प्रयोगात सर्वांत लक्षात राहिला तो नंद-महाराजाची भूमिका करणारा अमर गांगुली या नटाने केलेला मुद्राभिनय, एकूणच शरीर-हालचाली भूमिकेतला तपशील नेमकेपणाने पोहोचवीत होता.

'धर्माधर्म' हे महाभारतातील युद्धनीतीवर परिचित कथानकावरचे नाटक. त्याचे लेखक होते श्यामल सेनगुप्त आणि दिग्दर्शक अमर गांगुली. हे नाटक आपल्याकडच्या कोणत्याही पौराणिक नाटकासारखेच होते. विशेष वेगळे असे काही वाटले नाही. हे दोन्हीही प्रयोग पाहताना प्रयोगातली सुविहितपण त्यातल्या प्रयोगतंत्रामुळे अधिक जाणवत होते. अभिनेते आपल्या आवाजाचा योग्य तो वापर करून माइकशिवाय शब्दाचे वजन घेऊन कसे नेमकेपणाने पोहोचवतात ते अनुभवण्याजोगे होते. बंगाली नाट्यप्रयोगात प्रकाशयोजनेचा वापर पाहण्यासारखा असतो, त्यातली योजना आपल्यासारखी स्थिर नसते, तर ती काही वेळा स्थिर आणि बऱ्याचदा कलाकाराच्या रंगमंचीय हालचालीनुसार हालती, गतिमान असते. हा एक वेगळा अनुभव असतो. □

# नाट्यपंढरी



## □ गवसला ग चिंतामणी

खरे म्हणजे, किर्लोस्कर संगीत मंडळीने मिरजेचा मुक्काम घेतला होता, तो कंपनीचे विसर्जन करावे याच हेतूने. कारण भाऊराव गेल्यापासून कंपनीची गाडी घसरगुंडीला लागली होती. नटवर्य नानासाहेब जोगळेकर नि कृष्णराव गोरे यांची हिरो–हिरॉइनची जोडी सुरेख जमत होती, तोच गोरे कंपनी सोडून गेले नि 'स्वदेशहितचिंतक'मध्ये सामील झाले. त्यामुळे तर फारच बिकट परिस्थिती झाली. खेळ लावण्याचीच पंचाईत झाली. 'स्वदेशहितचिंतक'चे पारडे जड झाले. सौभद्र लिहिताना अण्णासाहेबांचे गाडे असेच अडले होते; पण त्यांना स्फटिकाची गणेशमूर्ती पावली नि अण्णांच्या हातून सर्वांगसुंदर सौभद्र पुरे झाले. अगदी तसेच नवल इथे घडले.

जोगळेकर, मुजुमदार आदी 'किर्लोस्कर'-ची मालक-मंडळी, चांगल्या हिरॉइनच्या शोधात होती; पण भाऊरावांची जागा घेईल, निदान थोडीफार तरी बरोबरी करील असा माणूस मिळेना. श्रीमंत शाहूमहाराजांचा किर्लोस्कर-मंडळीवर पहिल्यापासून लोभ. त्यांनी मुजुमदारांना निरोप पाठविला. नारायण नावाचा मुलगा अल्लादिया खाँसाहेबांकडे गाणे शिकण्याच्या हेतूने नि औषधोपचारासाठी इथे आला आहे. नायिकेच्या कामासाठी तो योग्य आहे. तरी आपण या नि पहा! शंकरराव लगेच कोल्हापूरला आले. महाराजांच्या भेटीला गेले. सर्व बोलणे झाल्यावर, त्यांनी तावडतोब चिंतोबा गुरवांना (दिवेकर) बोलावून घेतले. शाहूमहाराजांसमोर नारायणचे गाणे झाले. चिंतोबांना नारायणचे गाणे आवडले. मग महाराजांनीच नारायणाची समजूत घातली. 'तू किर्लोस्कर मंडळीत उतर. तिथे तुझी उत्तम सोय होईल. ही मंडळी औषधपाण्याची व्यवस्थाही करतील.' अशा तऱ्हेने खुद्द शाहूमहाराजांनीच बालके नारायणाची मिरजेत रवानगी केली.

त्याआधी पुण्यात लोकमान्य टिळकांनी त्याचे गाणे ऐकून 'अरे, हा तर बालगंधर्वच!' असे उत्स्फूर्त उद्गार काढून, कौतुकाने त्याची पाठ थोपटली होतीच. सुजनहो, हा नारायण म्हणजेच–नारायण श्रीपाद राजहंस. रसिकांचे लाडके बालगंधर्व!

बालगंधर्व मिरजेत कंपनीत आले. सर्व मंडळी त्यांना पहायला उत्सुक होतीच. कारण हिरॉइनच्या कामासाठी, एक अत्यंत देखणा मुलगा कंपनीत येणार आहे अशी कुणकुण त्यांना लागलीच होती. सर्वांबरोबर चहा झाला मग त्याची चाचणी घेण्याच्या हेतूने देवलमास्तरांनी (गोविंद बल्लाळ देवल) त्याला आपल्या खोलीत नेऊन, गाणे म्हणण्यास सांगितले. गाणे म्हटले की, नारायण एकदम खूष! त्याने, लगेच गाणे म्हणायला सुरुवात केली. एकापुढे एक अशी तीन-चार पदे म्हटली. शेवटी 'धन्य जाहला तुम्ही माझा राम पाहिला' हे पद होताच, देवलांनी 'बाळ, पुरे!' असे म्हणताच गाणे थांबले. देवलांनी शाबासकी दिली. 'मुलगी पसंत आहे' या चालीवर हिरॉइन पसंत करून ठेवली असेल. मग रात्री अण्णासाहेब किर्लोस्करांचा प्रसाद (रात्रीचे जेवण) होऊन मंडळी आपआपल्या पथारीकडे वळली.

## □ रंगदेवतेचं दर्शन घडलं

आवाजाच्या चाचणीवरून सहज आठवले की, पूर्वी किर्लोस्कर नाटक मंडळीत, चाचणी घेतली की, तो नट कसा आहे हे चाचणी घेणारी मंडळी सांकेतिक शब्दाने (CODE WORD) सांगत. ज्याची वाणी चांगली असेल, पण गाणे यथातथाच असेल, तर त्याचा उल्लेख 'शेणवी' म्हणून होई; पण वाणी नि गाणे दोन्हीही उत्तम असेल, तर त्याला 'ब्राह्मण' म्हणून संबोधीत.

म्हणतात ना की, नाटक मंडळीतली दोन ओगराळी (दोन वाटचा म्हणा) आमटी पोटात गेली की, नाटकावाचून दुसरे काही सुचत नाही. तेच नारायणाचे–बालगंधर्वांचे झाले. दिवेकर–परचुरे–बोडस यांच्या भुलभुलय्यात नि कंपनीच्या वातावरणात ते रमले! गंमत अशी, तोपर्यंत आपण कंपनीत 'नट' ('नटी' म्हणा हवे तर) म्हणून रहायला आलो आहो याची त्यांना अजिबात जाणीव नव्हतीच!

मग एके दिवशी सुमुहूर्ती 'शारदा' नाटकाच्या नटी-सूत्रधार प्रवेशात (फक्त तेवढाच प्रवेश खास पाच-पंचवीस निमंत्रितांच्या उपस्थितीत मिरजेच्या सरकारी थिएटरात आयोजिला होता.) नटी म्हणून रंगभूमीवर आले. एंट्रीलाच कडकडून टाळ्या पडल्या. रसिकांना साक्षात् रंगदेवतेचे दर्शन घडले! डोळ्यांचे पारणे फिटले. अण्णांची, भाऊरावांची पुण्याई फळाला आली. किर्लोस्कर मंडळीला नारायणाच्या–बालगंधर्वांच्या रूपाने 'सोनियाच्या शिंपल्यात चिंतामणी गवसला!'

MANOOS WEEKLY ( Licensed to post without perpayment of postage-No. 11 ) Regd. No. PNCW-28

# मिरजेतील अरबांचा प्रश्न आणि भारतीय मुसलमान

प्रति,

मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी सांगली, जिल्हा सांगली.
विषय :- मिरजेतील परदेशी (अरब) लोक
मा. महोदय,

आम्ही खाली सह्या करणारे लोक धर्माने मुसलमान असलो तरी प्रथम भारतीय आहोत. आणि मिरजेतील येणारे अरब हे धर्माने मुसलमान असले तरी ते बाहेरच्या कोणत्या तरी देशाचे नागरीक आहेत.

मुसलमान मुसलमान म्हणून भारतीय मुसलमान व परदेशातील मुसलमान याचे लग्न होणेस कोणतीही धर्माची आडकाठी नसली तरी दोन राष्ट्रांमधील संबंध म्हणून व्हिसा आदीची आडकाठी ही येतेच. आणि ही आडकाठी दूर झाल्याशिवाय याचेशी लग्ने होणे म्हणजे ती लग्ने परत मोडणे, तलाख मिळणेच होय.

मिरजेत येणारे अरब पैशाच्या जोरावर येतात, लग्ने करतात; पण त्या सर्वांना, आपल्या बायकाना त्या देशात घेऊन जाणे शक्य नसते आणि यामुळें या स्त्रियांना येथेच रहावे लागते. व त्याचेपुढे त्यामुळे निरनिराळे प्रश्न निर्माण होतात.

या अरब प्रश्नामुळे मुसलमान समाजातील अनैतिकता वाढत आहे. याचा मुसलमानाचे जीवितावर परिणाम होत आहे म्हणून आपणास नम्र विनंती अशी की, जे अरब येथे येऊन लग्ने करू इच्छितात त्यांनी प्रथम आपल्या होणाऱ्या बायकोचा व्हीसा काढावा. शासनाला दाखवावा व नतर लग्ने करावीत. अशा प्रकारे जर झाले तर मुसलमान समाजावर होणारे दुष्परिणाम टळतील.

पैशाचे जोरावर भारतीय मुसलमान समाजाला विकत घेता येते ही भावना भारतीय राष्ट्राचे दृष्टीने अपमानास्पद आहे. तीही त्यामुळे टळेल असे वाटते.

आपले,

१) डॉ. ए. बेग, पंचरत्न कारखाने जवळ, कोल्हापूर रोड, सागली
२) मुसा राज शेख, कोल्हापूर रोड, सागली.
३) अ. रसीद इस्माईल शेख, बॉम्बे वॉच क. स्टे. रोड, सागली.
४) हबीब मन्सुर अहमद साहेब-इमाम मदिना मस्सीद, सागली.
५) नुरोद्दिन हाजी अब्दुल गणी-बिडीवाले, ११६४ खणभाग पोलीस चौकीजवळ, सागली.
६) आब्बास आ. रहिमान उमरीवाले, नळभाग, ६१६ सागली.
७) अब्दुल रसीद अ. अजीज शिलेदार, शिलेदार टेलर्स, नळबजार सागली.
८) अब्दुल रझाक दस्तगीर नदाफ, पंचमुखी मारुती रोड, सागली.
९) इक्बाल अ. रेहमान शेख, हिरा सायकल शॉप, नळबाजार सागली.
१०) अमन निजाम मुजावर-अमन सायकल शॉप, कडलस्कर गल्ली, सागली.
११) प्रा. महमद इसहाक गुलाबखान, स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट ७४ केसरी गल्ली, सागली.
१२) कु. शमशाद बेगम अ. गनी शेख (नाईकवाडी) S. S. C. खणभाग, कडलस्कर गल्ली, घ. न. ८८२
१३) हलीमखान नुरमहमद जमादार, घ. नं. ६३५ नळभाग, बदाम चौक सागली.
१४) एम. ए. बिडीवाले, खणभाग चौकीजवळ, सागली

-१९७८ मधले मुस्लिमाचे एक निवेदन.

---

## देशाची अब्रूची लक्तरे वाचवावी

आपल्या ८ ऑगस्टच्या अकात निष्पाप भगिनीचे अब्रूचे धिंडवडे काढणारी बातमी वाचून अगावर अक्षरशः शहारे आले. खुर्चीच्या मोहात अडकलेल्या राजकीय पक्षाना याबाबत काहीच कसे वाटत नाही ? सर्वच पक्ष मौन पाळून का आहेत ? भगिनीची अब्रू वेशीवर टागली जात असताना कुणाचाच स्वाभिमान जिवत कसा होत नाही ? आपण खरेखुरे भारतीय नागरिक असाल तर या भगिनीची अब्रू पैशाच्या जिवावर लुटणाऱ्या या अरबकपूला, या मोहिमेत सहभागी होऊन, धडा शिकवावा व देशाच्या अब्रूची लक्तरे आज जी बाहेर जात आहेत ती आपण वाचवावीत.

एक मुस्लिम भगिनी
मिरज.
दिनाक १३।८।८३
दै. प्रतिध्वनी, मिरज
वाचकांची पत्रे